CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शनिवार, ३१ जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३३१ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



आज संघाचे कार्य संपूर्ण भारतभर पसरले असतानाच भारतातील सर्व प्रांत, प्रांतांतील सर्व जिल्ह्यांत, जिल्ह्यांतील सर्व तहसील आणि प्रखंड आणि प्रखंडांतील मंडळे, गावांपर्यंत संघाचे कार्य विस्तारले आहे आणि यामुळेच संघाचा हिंदुत्वाचा विचार देशाबाहेर विभिन्न देशांमध्ये राहणाऱ्या आपल्या हिंदू बांधवांपर्यंत पोहोचवून त्यांच्यातही स्वाभिमान आणि आपल्या जीवनाच्या उद्देशाचे स्मरण करून देण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यरत आहे.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## आज श्री विश्वकर्मा जयंती



# सुनेत्रा पवार होणार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री!

### ● पद स्वीकारण्यास सुनेत्रांचा होकार ● राष्ट्रवादी काँग्रेसची आज महत्त्वाची बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ३० जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री पदावर कोण बसणार, अशी चर्चा सुरू झाली असून यात सुनेत्रा पवारांच्या नावावरच शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्यास होकार दिला असल्याचे समजते. तसेच उद्याच सायंकाळी ५ वाजता शपथविधी देखील पार पडणार असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाची शनिवारी सकाळी ११ वाजता महत्त्वाची बैठक होणार असून या बैठकीत उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे बोलले जात आहे. शनिवारी होणाऱ्या बैठकीत सगळ्यांचे एकमत झाले तर उद्याच शपथविधी होऊ शकतो, असे सूचक विधान छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना केले होते. त्यामुळे सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, तर त्या महाराष्ट्राच्या पहिल्या उपमुख्यमंत्री ठरतील. तसेच नरेश आरोरा हे सुनेत्रा पवारांचा निरोप घेऊन मुंबईकडे रवाना झाल्याचे देखील समोर आले आहे. राजकीय गोष्टींची चर्चा करण्यासाठी सुनेत्रा पवारांनी नरेश आरोरा यांना बारामती येथे बोलावले असल्याची माहिती आहे. त्यानुसार नरेश आरोरा आणि सुनेत्रा पवार यांच्यात चर्चा झाल्यानंतर त्यांचा निरोप घेऊन आरोरा मुंबईकडे रवाना झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

### पक्षाध्यक्ष पदाबाबतही निर्णय

अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाची उद्या ११ वाजता महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीत पक्षाध्यक्ष पदावर कोण असणार यावर देखील निर्णय घेतला जाणार आहे. सुनेत्रा पवारच पक्षाच्या अध्यक्षा असाव्यात, अशी लोकांची भावना आहे. त्यानुसारच पक्ष निर्णय घेईल, असे बोलले जात आहे. दरम्यान, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांचे देखील पक्षाध्यक्ष पदासाठी नाव चर्चेत असल्याचे समजते.

### धार्मिक विधी झाल्यानंतर ठरणार

सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यासंदर्भात बोलताना म्हणाले, आज मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली हे खरे आहे. सुनेत्रा वहिनी आणि कुटुंब धार्मिक विधीमध्ये आहेत. धार्मिक विधी झाल्यानंतर आम्ही सर्व चर्चा करणार आहोत. आणि त्यानंतर आम्ही ठरवू. जे काही जनतेच्या मनात आहे, कार्यकर्त्यांच्या मनात आहे त्यानुसार निर्णय घेऊ. आज आपण पाहत आहोत की संपूर्ण राज्य शोकात आहे. दादांचे सर्व पैलू संबंध महाराष्ट्राने अनुभवले आहेत. त्यातच आम्ही आहोत, असे तटकरे यांनी म्हटले आहे.

### छगन भुजबळ म्हणाले?

पत्रकारांशी बोलताना छगन भुजबळ म्हणाले, लोकांची जी मागणी आहे ती रास्त आहे. सुनेत्रा ताईंकडे पक्ष प्रमुख पद देण्यात यावे. अनेक लोकांची अशी मागणी आहे आणि त्यात काही चूक आहे, असे मला वाटत नाही. पण शेवटी याबाबत जो काही निर्णय होणार आहे तो सीएलपीमध्ये होईल. भुजबळ यांना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेविषयी विचारले असता, त्यांनी याबाबत मला फारसे काही माहित नसल्याचे स्पष्ट केले आहे.

## वालवड येथे तरुण शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० जानेवारी-**

तालुक्यातील वालवड येथील एका ३६ वर्षीय तरुण शेतकऱ्याने आपल्या शेतातील जनावरांच्या शेडमध्ये दि. २८ जानेवारी रोजी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी पहाटे उघडकीस आली. या घटनेमुळे वालवड परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत अशोक सुंदरराव जाधवर (वय ३६) हे आपले वडील, पत्नी आणि मुलांसह वालवड येथे राहतात. मंगळवार, २७ जानेवारी रोजी संध्याकाळी ६.३० च्या सुमारास अशोक यांनी आपल्या आई-वडिलांसोबत शेतातील घरी जेवण केले. त्यानंतर, 'मी गट नंबर ८१ मधील शेतातील जनावरांच्या शेडवर झोपायला जातो,' असे सांगून ते घरुन निघाले होते. बुधवारी पहाटेच्या सुमारास अशोक यांचे वडील सुंदरराव जाधवर हे जनावरांची धार काढण्यासाठी आणि गोठा साफ करण्यासाठी शेडवर गेले. त्यावेळी त्यांना आपला मुलगा शेडच्या वरच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकताना दिसला.

घाबरलेल्या वडिलांनी तातडीने दोरी सोडवून मुलाला खाली उतरवले, मात्र तोपर्यंत अशोक यांचे शरीर पूर्णपणे थंड पडले होते. त्यांनी तात्काळ आपले मोठे भाऊ विश्वनाथ जाधवर यांना बोलावले. मात्र अशोक यांचा मृत्यू झाल्याची खात्री पटल्यानंतर वडिलांनी पांगरी पोलीस ठाण्यात जाऊन या घटनेची खबर दिली. सुंदरराव राजाराम जाधवर (वय ६०) यांनी दिलेल्या जबाबावरून पांगरी पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे. अशोक जाधवर यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीआयडी चौकशी

**मुंबई -** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती येथे झालेल्या विमान अपघाताची सीआयडी चौकशी करण्याचा आदेश शुक्रवारी राज्य सरकारने दिला. आदेश जारी होताच काही तासांतच सीआयडीने तपास हाती घेतला आहे. विमान अपघाताची नोंद बारामती पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. 'ॲक्सिडेंटल डेथ रिपोर्ट'च्या अनुषंगाने पुढील तपास करण्यात येणार आहे. अपघातस्थळावर कुणालाही जाऊ न देण्याच्या सूचना सीआयडीने बारामती पोलिसांना दिल्या आहेत.

# शाळेत मुलींना मोफत सॅनिटरी पॅड देणे अनिवार्य

### ● सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ● सुविधा न देणाऱ्या शाळांची मान्यता रद्द होणार

**◆ नवी दिल्ली, ३० जानेवारी**

मासिक पाळीचा मुद्दा जितका महत्त्वपूर्ण तितकाच दुर्लक्षित असल्याने आता सर्वोच्च न्यायालयाने याविषयी एक ऐतिहासिक निर्णय दिला आहे. प्रत्येक शाळेत मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वाटणे अनिवार्य असेल. मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधावी लागतील, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी देशातील सर्व खाजगी आणि सरकारी शाळांना निर्देश दिला. ज्या शाळा हे करू शकणार नाहीत, त्यांची मान्यता रद्द केली जाईल, असा इशाराही देण्यात आला.

प्रत्येक शाळेत दिव्यांग-अनुकूल शौचालये बांधली जावीत, असा निर्देशही न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिला आहे. २०२४ मध्ये दाखल झालेल्या एका जनहित याचिकेवर सुनावणी केल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला. केंद्र सरकारच्या मासिक पाळी स्वच्छता धोरणाची देशभरात अंमलबजावणी केली जावी, अशी मागणी याचिकाकर्त्या जया ठाकूर यांनी केली होती.

**मुलींच्या शरीराला ओझे म्हणून पाहिले जाते**

हा आदेश केवळ कायदेशीर व्यवस्थेशी संबंधित लोकांसाठी नाही. हा त्या वर्गासाठीही देखील आहे, जिथे मुली मदत मागण्यास कचरतात. हा त्या शिक्षकांसाठी आहे, जे मदत करू इच्छितात, परंतु संसाधनांच्या कमतरतेमुळे बांधलेले आहेत. हा, त्या पालकांसाठी देखील आहे, जे कदाचित हे समजू शकत नाहीत की, मौनाचा काय परिणाम होतो, असे न्यायालयाने म्हटले. *(वृत्तसंस्था)*

### काय म्हणाले न्यायालय?



- शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालये नसतील, तर ते संविधानाच्या अनुच्छेद १४ (समानतेचा अधिकार) चे उल्लंघन आहे. मुलींना सॅनिटरी पॅड मिळत नसतील, तर त्या मुलांप्रमाणे समानतेने अभ्यास आणि इतर उपक्रमांमध्ये भाग घेऊ शकणार नाहीत.
- मासिक पाळीदरम्यान सन्मानजनक सुविधा मिळणे हे संविधानाच्या अनुच्छेद २१ (जीवन आणि प्रतिष्ठेचा अधिकार) चा भाग आहे. मुलींना योग्य सुविधा मिळाल्या नाहीत, तर त्यांची प्रतिष्ठा आणि गोपनीयता प्रभावित होते.

### निर्णयाचे मुख्य मुद्दे

**मोफत वितरण**
सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये प्रत्येक मुलीला सॅनिटरी पॅड मोफत दिले जातील.

**सुविधा सुधारणा**
शाळांमध्ये स्वतंत्र शौचालये, सुरक्षित सॅनिटरी पॅड विल्हेवाटीसाठी इन्सिनरेटर आणि स्वच्छतेसंबंधी सुविधा अनिवार्य राहतील.

**जागरूकता मोहीम**
मासिक पाळीच्या संदर्भातील भ्रांत आणि निषिद्धतेवर मात करण्यासाठी शाळांमध्ये व्यापक शैक्षणिक आणि जागरूकता कार्यक्रम राबविले जातील.

# माओवाद्यांचा शस्त्रसाठा हस्तगत

### गोंदिया पोलिसांची धडक कारवाई ● एके-४७ रायफल, स्फोटकांसह घातक साहित्याचा समावेश

**◆ गोंदिया, ३० जानेवारी**

माओवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने २००५ पासून राबविलेल्या आत्मसमर्पण योजनेला मोठे यश मिळाले आहे. या योजनेंतर्गत गोंदिया जिल्ह्यात १४ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केल्यानंतर त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी जंगलात लपवलेला प्रचंड शस्त्रसाठा हस्तगत करून माओवादी चळवळीला मोठा धक्का दिला आहे.

माओवाद्यांच्या एमएमसी झोनचा प्रवक्ता व एसझेडसीएम पदावर असलेला अनंत ऊर्फ विकास नागपुरे याने २८ नोव्हेंबर रोजी १० साथीदारांसह तसेच दरेकसा एरिया कमेटीचा कमांडर रोशन वेडजा याने १३ डिसेंबर रोजी दोन साथीदारांसह आत्मसमर्पण केले होते. जीआरबी डिव्हिजन अंतर्गत दरेकसा एरिया कमिटीतील १४ माओवाद्यांनी गोंदिया जिल्हा पोलिस दलासमोर शरणागती पत्करली होती. आत्मसमर्पित माओवाद्यांच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे २५ जानेवारी रोजी गोंदिया पोलिस दलाने मुरकुटडोह बेस कॅम्प अंतर्गत टाकेझरी-बेवारटोला डॅम परिसरातील जंगलात विशेष शोधमोहीम राबवली. या कारवाईत माओवाद्यांनी भूमिगत ठेवलेला शस्त्र व स्फोटकांचा मोठा साठा हस्तगत करण्यात आला. *(तभा वृत्तसेवा)*



आत्मसमर्पित माओवाद्यांनी पुरून ठेवलेले साहित्य

माओवाद्यांच्या डम्पमधून एके-४७ रायफल, दोन एसएलआर रायफल, एक कोल्ट ऑटोमॅटिक पिस्तूल, १२ बोअर रायफल, क्लेमोर माईन, तीन एके-४७ मॅग्झिन, ९ एसएलआर मॅग्झिन, एक इन्सास मॅग्झिन, एसएलआरची १८७ काडतुसे, एके-४७ ची ५८ काडतुसे, इन्सासची १५ काडतुसे, रायफलची १५ काडतुसे, ८ मिमी व्यासाची १२ काडतुसे, कोल्ट ऑटोमॅटिक पिस्तूलची ४५ काडतुसे, बीजीएल ४, सुरका शेल्स १०, सुरका लाँचर राऊंड १०, स्फोटक पदार्थ ८.५ किलो, डिटोनेटर, कॉर्डेक्स वायर, वॉकीटॉकी, सोलर प्लेट, बॅटऱ्या, कलर प्रिंटर व इतर महत्त्वाचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

### वरिष्ठांच्या मार्गदर्शनात कारवाई

ही कारवाई गडचिरोली परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, गोंदियाचे पोलिस अधीक्षक गोरख भामर यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक प्रमोद भातनाते, सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय नाईक, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे, हवालदार लक्ष्मण घरत, मुस्ताक सय्यद, शिपाई रमेश उईके, राजेश तावाडे, नक्षल सेल गोंदिया तसेच सी-६० पथकाने केली.



## महत्वाचे...

### बार्शी तालुका मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी विलास वळेकर

**बार्शी, दि. ३० जानेवारी-**

बार्शी तालुका मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज विद्यालय हायस्कूलचे मुख्याध्यापक विलास वळेकर, उपाध्यक्ष म्हणून न्यू हायस्कूल पिंपळवाडीचे मुख्याध्यापक अण्णासाहेब व्हळे तर सचिवपदी नागनाथ विद्यालय जामगावचे मुख्याध्यापक शक्तीकुमार संकपाळ यांची एकमताने निवड करण्यात आली. बार्शी तालुक्यातील सर्व प्राचार्य मुख्याध्यापक यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या निवडी जाहीर करण्यात आल्या. नियंत्रण समितीचे अध्यक्ष सुभाष माने व माजी अध्यक्ष राजकुमार पुजारी यांचे अध्यक्षतेखाली सुलाखे हायस्कूल येथे ही सभा झाली.



सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ यावर तालुक्यातून जिल्हा प्रतिनिधी म्हणून मुख्याध्यापक धन्यकुमार उर्फ अण्णासाहेब मोरे यांची निवड करण्यात आली. तर यशवंत विद्यालय शिराळेच्या मुख्याध्यापिका संगिता गोरे यांची जिल्हा महिला प्रतिनिधीकरिता एकमताने ठराव पास झाला. यावेळी बाजार समितीचे संचालक सुरेश गुंड यांनी महत्त्वाची भूमिका घेऊन सर्वांच्या निवडी केल्या. संघाचे उपाध्यक्ष व्हळे यांनी आभार मानले.



### युनियन उर्दू प्राथमिक शाळेत नजीर शेख यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

युनियन ऊर्दू प्राथमिक शाळेत नजीर मुन्शी, अय्यूब अहमद नल्लामंदू, नजीर अजीज शेख, महिबूब तांबोळी यांच्या प्रमुख उपस्थित क्रिडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबदल कै बाबुराव डिसले जीवन गैरव पुरस्कार मिळाल्या बदल शमा शिक्षण प्रसारक मंडळ व एपीजे अबुल कलाम शाळे तर्फे अय्यूब अहमद नल्लामंदू व महिबूब तांबोळी यांनी संस्थेचे नजीर अजीज शेख यांचा सत्कार केला. प्रास्ताविक अल्ताफ जकलेर तर पाहुण्याचे स्वागत नजीर शेख यांनी केले. सूत्रसंचलन जावेद काजी यांनी केले. आभार जावेद गढवाल यांनी केले. यावेळी फरहान नल्लामंदू, इंडीकर, अयाज चौकी उपस्थित होते. .

### प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत 'तो बहिर्जी होता' या कार्यक्रमाचे गुरुवारी आयोजन

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

प्रिसिजन वाचन अभियानाच्या वतीने गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडके सभागृह येथे 'तो बहिर्जी होता' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात बहिर्जी नाईक यांच्या पराक्रम ाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा कलात्मक मागोवा मांडला जााणार आहे.




शिवचरित्रातील एक परिचित, मात्र अनेकदा गृहीत धरले गेलेले व्यक्तिमत्त्व म्हणून बहिर्जी नाईक ओळखले जातात. त्यांच्या भोवती विणल्या गेलेल्या आश्चर्यकारक व कल्पनारम्य कथांमुळे त्यांच्या खऱ्या कर्तृत्वावर अनेकदा पडदा पडलेला दिसतो. बुद्धिमत्ता, पराक्रम, प्रशासकीय कुशलता, भाषा-प्रभुत्व, बहुरूपी स्वभाव आणि राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत भरलेला हा माणूस तपशीलांच्या अभावामुळे इतिहासाच्या धुक्यात हरवलेला आहे. हेच हरवलेले व्यक्तिमत्त्व ललित स्वरूपात, मात्र शक्यतांच्या चौकटीत अनुभवण्याचा हा प्रयत्न आहे. या कार्यक्रम ात ॲड. आनंद रा. देशपांडे लिखित तो बहिर्जी होता या संकल्पनेवर आधारित सादरीकरण होणार असून, कौस्तुभ गोडबोले यांची मुलाखत आणि आनंद देशपांडे व कौस्तुभ गोडबोले यांचे अभिवाचन होणार आहे.



### युवकांनी श्रम संस्कारीत, निर्व्यसनी असणे गरजेचे : डॉ. शिवाजी शिंदे

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

आपला भारत विकसित भारत म्हणून जगात उदयास येत आहे ही गोष्ट आपणास खूप अभिमानास्पद आहे. या विकसित भारतातील युवक हा श्रम संस्कारीत, कौशल्यभिमुख व निर्व्यसनी असणे गरजेचे आहे. असा युवक राष्ट्रीय सेवा योजनेच्या अशा विशेष शिबिरातूनच घडतील असा विश्वास आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रा. डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले. कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शास्वत विकासासाठी युवक शिबीर बक्षी हिप्परगा येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. शिवाजी शिंदे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बक्षी हिप्परगा येथील जेष्ठ महिला श्रीमती जयश्री पवार होत्या. याप्रसंगी प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी, सौ. पूजा माळी, महानंदा माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रदीप राठोड यांनी प्रास्ताविक करून शिबिराचा अहवाल सादर केले. सूत्रसंचालन प्रा. सोमनाथ स्वामी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. राहुल काळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिबिरार्थी जुबेर चौकी, महेश भासगी, सागर खंडाळकर यांनी परिश्रम घेतले.

# पंढरीसी येवोनिया धन्य झालो पंढरीनाथा...

### माघी यात्रा पोहचून भाविक लागले परतीच्या मार्गाला

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ३० जानेवारी-**

विठ्ठलाच्या दर्शनासाठी येथे आलेल्या लोखो वैष्णवांनी माघी एकादशीचा सोहळा डोळे भरुन अनुभवला. पंढरीसी येवोनिया आता .. धन्य झालो पंढरीनाथा या उक्ती प्रमाणे पुढच्या वर्षी पुन्हा विठुरायाच्या भेटीला येण्याची मनोमन इच्छा व्यक्त करुन मोठ्या जड अंत:करणाने भाविक आज पंढरीचा निरोप घेत होते. येथील बसस्थानकावर तसेच रेल्वेस्थानकावर पहाटे पासूनच भाविकांची परतीच्या प्रवासासाठी गर्दी झालेली होती.






दरम्यान एकादशी दिवशी रात्रभर शहर आणि परिसरातील विविध मठ, धर्मशाळा तसेच मंदिर परिसरातील गल्लीबोळांमधून असलेल्या घरे आणि मोठ्या वाड्यांमधून हरिजागर सुरु होता. येथील चंद्रभागा वाळवंटामध्ये भाविकांची व्दादशी दिवशी मध्यरात्री पासूनच स्नानासाठी गर्दी झालेली होती. चंद्रभागेचे स्नान, नगरप्रदक्षिणा करुन शहरातील अनेक मठ, धर्मशाळां मधून पहाटेपासूनच वारकऱ्यांची व्दादशीच्या न्याहारीची लगबग चाललेली दिसत होती. व्दादशी निमित्ताने मठ, धर्मशाळांमधून वारकऱ्यांच्या जेवणाच्या पंक्ती दिसत होत्या. यात्रा पोहच करुन परत जाताना घरातील मंडळींसाठी प्रसाद म्हणून चिरमुरे, बुदींचे लाडू, घरातील लहानग्यांसाठी खेळणी तसेच रोजच्या पुजेच्या वेळी लागणारं हळद, कुंकु, अष्टगंध, बुक्का आणि उदबत्तीपुडे, गोपिचंद आदी प्रासादिक वस्तुंची तसेच देवदेवतांच्या तांब्या, पितळेच्या मुर्ती, फोटोफ्रेम आणि सोलापूर चादरी घोंगडी आदी वस्तुंच्या खरेदीसाठी भाविकांची दुकानांमधून झुंबड उडालेली दिसत होती.

#### मंदिर परिसरात भाविकांची गर्दी

व्दादशी सोडून सामानांची बांधाबांध करुन वारकरी परतीच्या प्रवासासाठी मुक्कामाच्या ठिकाणांहून बाहेर पडत थेट विठ्ठल मंदिराचे कळस दर्शन करण्यासाठी मंदिर परिसरात दाखल होत होते. त्यामुळे पहाटे पासूनच मंदिर परिसरातील महाव्दार आणि पश्चिमव्दारामध्ये वारकऱ्यांची मोठी गर्दी झालेली होती.

### सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद आणि पक्षनेतृत्व द्यावे

**राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाबाबत चर्चा सुरू असताना त्यांच्या उत्तराधिकारी म्हणून राज्यसभेच्या खासदार सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व तसेच उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपवावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केली आहे.

उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे व माजी नगरसेवक गणेश पुजारी यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे तसेच शिवाजीराव गर्जे यांच्याकडे निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे. सुनेत्राताई पवार या बारामती व पुणे परिसरातील विविध शैक्षणिक व सहकारी संस्थांशी निगडित असून त्यांना संसदीय कामकाज व संघटनात्मक अनुभव आहे. पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी त्यांचे नेतृत्व स्वीकारतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पक्षाची ताकद अबाधित ठेवण्यासाठी सर्व ज्येष्ठ नेत्यांनी एकत्र येऊन सुनेत्राताई पवार यांच्याकडे नेतृत्व द्यावे, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे चंदनशिवे यांनी नमूद केले आहे.


### विठ्ठल मंदिर संवर्धनासाठी अजित दादांनी दिला होता ७३ कोटींचा निधी

**गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे प्रतिपादन**

**जतन आणि संवर्धनानंतर मंदिराचे रुपडे पालटले**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जानेवारी -**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन आणि संवर्धनाचे काम करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी ७३ कोटी रुपयांचा निधी दिला. त्या निधीतून मंदिराचे जतन आणि संवर्धनाचे काम पूर्णत्वाकडे आले आहे. त्यांचे हे आध्यात्मिक कार्य राज्यातील वारकरी भाविकांच्या कायम स्मरणात राहील. अजितदादा विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. ते नेहमी भेटले की, मंदिराच्या कामाची आपुलकीने विचारपूस करायचे, अशी आठवण विठ्ठल मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दैनिक सोलापूर तरुणभारतशी बोलताना सांगितली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी (ता.२८) विमान अपघातामध्ये मृत्यू झाला. ही बातमी समजताच मनाला खूप दु:ख झाले. माघ वारी सुरू आहे. ऐन वारीकाळात पवार कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. यातून भगवान पांडुरंगाने त्यांच्या कुटुंबीयांना सावरण्याचे बळ द्यावे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन आणि संवर्धनाच्या कामाचा प्रस्ताव मंदिर समितीने राज्य सरकारकडे पाठवला तेव्हा अजित पवार यांनी कोणताही विचार न करता, तत्काळ मंदिराच्या कामासाठी ७३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. त्यानंतर त्यांनी स्वत: मंदिर समितीशी संपर्क करून मंदिराचे काम चांगल्या पद्धतीने करण्याच्या सूचना देखील दिल्या. त्यांच्या मुळेच विठ्ठल मंदिर जतन व संवर्धनाचे काम आज पूर्णत्वाकडे आले.

अलीकडेच अजित पवार औसा येथे आले होते. त्यावेळी देखील त्यांनी मंदिराच्या काम ाबाबत चौकशी करून मंदिर खूप सुंदर आणि देखणे झाले पाहिजे, अशी भावना व्यका केली होती. कामासाठी आणखी निधी लागला तर सांगा आपण देऊ असे आश्वासनही त्यांनी दिले. श्री विठ्ठलाचा सच्चा भक्त आज आपल्यात नाही, हे मनाला वेदना देणारे आहे. महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाल्याची भावनाही गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी व्यक्त केली.

# पंढरपुरात कविसंमेलन उत्साहात

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जानेवारी-**

रयत शिक्षण संस्था संचलित पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सामंजस्य करारांतर्गत कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते. या कार्यक्रमासाठी निमंत्रित कवी म्हणून सोलापूर येथील कवी साबीर वाणी या नावाने लेखन करणारे बदीउज्जमा बिराजदार, कवी कालिदास चवडेकर तसेच पंढरपूर येथील प्रसिद्ध गझलकार वैभव कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषद, पंढरपूर शाखेचे सिद्धार्थ



ढवळे, कल्याण शिंदे, अशोक माळी, जैनुद्दीन मुलाणी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक व कवींचा परिचय म राठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला. कविसंमेलनाची सुरुवात गझलकार वैभव कुलकर्णी यांनी श्री विठ्ठल देवतांवरील गझल गायनाने केली. कवी कालिदास चवडेकर यांनी प्रेम, सामाजिक आणि जीवनविषयक कविता सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कवी साबीर यांनी सादर केलेल्या 'आई' या कवितेस श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संमेलनात प्रा.नेहा देसाई, प्रा. स्नेहल जाधव तसेच विद्यार्थिनी स्वाती मनगिनी, ज्योती आनंद भोईटे व वैष्णवी व्यवहारे, शुभांगी वाघमारे, प्रगती लवटे, श्रावणी पवार यांनीही आपल्या स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय डांगे, प्रा. हरिभजन कांबळे, डॉ. बापूसाहेब घोडके, प्रा. अंकुश घुले, प्रा. मोहिनी सावंत उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले आभार कल्याण शिंदे यांनी मानले.



### अण्णप्पा काडादी प्रशालेत प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३० जानेवारी-**

अण्णप्पा काडादी हायस्कूल येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक अनिल पाटील व प्रमुख पाहुणे ९ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल रणधीर डी. सतिश, स्थानिक नियामक मंडळ अध्यक्षा सिंधू काडादी, समितीचे सदस्य मल्लिनाथ विभूते, सुनील रिक्के, विजयकुमार काडादी, प्राथमिक मुख्याध्यापक सचिन पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

संचेती व राजनंदिनी यांनी संविधान प्रतिज्ञा घेतली. पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका संगीता अक्कलकोटे, पूर्व प्राथमिक कन्नडच्या मुख्याध्यापिका संगीता कुंभार, माजी विद्यार्थी व एनसीसी प्रशिक्षक नागनाथ अडगळे, मुख्याध्यापक अनिल पाटील, पर्यवेक्षक दत्तात्रय पाटील उपस्थित होते. एनसीसी व स्काऊट गाईड, आरएसपीच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. एनसीसीचे ट्रूप लीडर बाळीगेरी तर स्काऊट गाईड लीडर सक्षम मैदर्गिकर हे होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल पाटील केले. यशस्वी विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन सुस्मिता कोरे यांनी केले. एनसीसी छात्र सैनिकांना चीफ ऑफिसर सिद्रामप्पा तंबाके, सेकंड ऑफिसर उर्मिला गिडवीर तर स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांना प्रदीप अळळीमोरे व आरएसपी विद्यार्थ्यांना रुपाली वळसंगे यांचे मार्गदर्शन मिळाले. सूत्रसंचालन सहशिक्षिका राजश्री तावशे व सहशिक्षक धरेश्वर तडलगी यांनी तर आभार सहशिक्षक वैजिनाथ पाटील यांनी केले. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना स्वादिष्ट बुंदीलाडू देण्यात आले.

# सर्पदंश उपचारात नवे पर्व



## रॅपिड टेस्ट, मोनोक्लोनल अँटिबॉडी आणि ओरल पिलची रुग्ण वाचण्याची आशा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**


भारतात सर्पदंश हा आजही गंभीर सार्वजनिक आरोग्य प्रश्न असून, दरवर्षी सुमारे ५८ हजारांहून अधिक मृत्यू नोंदवले जातात. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर व वनक्षेत्रातील कर्मचारी यांना सर्पदंशाचा मोठा धोका असतो. गेल्या शंभर वर्षांपासून वापरात असलेल्या घोड्यांच्या सीरमवर आधारित अँटी-व्हेनमवरच उपचार अवलंबून असल्याने निदानातील विलंब, लर्जिक प्रतिक्रिया आणि मर्यादित परिणाम कारकता अशा अडचणी कायम आहेत. मात्र अलीकडील संशोधनामुळे सर्पदंश उपचारात खऱ्या अर्थाने नवे पर्व सुरू होत असल्याचे चित्र असून या नव्या उपचार पद्धतीमुळे सर्पदंश झाल्यानंतर रुग्ण दगावण्याची शक्यता कमी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाने अत्याधुनिक 'स्नेक व्हेनम रॅपिड टेस्ट किट्स' खरेदीस मंजुरी दिली असून, १ लाख १० हजारांहून अधिक किट्स जिल्हा रुग्णालये व ग्रामीण आरोग्य केंद्रांत उपलब्ध होणार आहेत.

#### विषाचा प्रभाव तात्पुरता मंदावून रुग्णाला अमूल्य वेळ मिळतो


सर्पदंश झाल्यानंतर दवाखान्यात पोहोचण्यापूर्वी घेता येणारी 'ओरल पिल' विकसित होत असून, ती विषाचा प्रभाव तात्पुरता मंदावून रुग्णाला अमूल्य वेळ मिळवून देणार आहे. रॅपिड टेस्ट, मोनोक्लोनल अँटिबॉडीज आणि ओरल पिल या तिन्ही घटकांमुळे सर्पदंशातील मृत्यू व अपंगत्वात मोठी घट होण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

**- सर्प अभ्यासक राहुल शिंदे, सोलापूर**



गर्भधारणा चाचणीप्रमाणे कार्य करणारी ही किट अवघ्या दोन मिनिटांत सर्पदंश विषारी आहे की बिनविषारी, हे स्पष्ट करते. त्यामुळे अनावश्यक अँटी-व्हेनम टळून उपचार अधिक वेगवान, सुरक्षित व किफायतशीर ठरणार आहेत.

दरम्यान, बंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मधील डॉ. कार्तिक सूनगार व त्यांच्या टीमने 'सिंथेटिक मोनोक्लोनल अँटिबॉडीज' विकसित केल्या आहेत. या अचूक प्रतिपिंडे विषातील विशिष्ट घातक घटकांनाच लक्ष्य करून निष्प्रभ करतात. त्यामुळे कमी डोसमध्ये अधिक प्रभावी व सुरक्षित उपचार शक्य होणार आहेत.



नाग, मण्यार व घोणस यांसारख्या सापांच्या विषावर या अँटिबॉडीज परिणामकारक ठरत असल्याने 'युनिव्हर्सल' उपचारपद्धतीची आशा निर्माण झाली आहे.

### सुदानमधील आंतरराष्ट्रीय परिषदेत सोलापूरचे डॉ. संदीप आडके यांनी केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

सुदान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय अस्थिरोग परिषदेमध्ये भारतातून केवळ सोलापूरचे सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. संदीप आडके यांना व्याख्यानासाठी आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले, अशी माहिती डॉ. डायना आडके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सुदान ऑर्थोपेडिक सर्जन असोसिएशनच्या वतीने दि. २१ ते २४ जानेवारी या कालावधीत सुदान येथे अस्थिरोग तज्ज्ञांची आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये अस्थिरोग व इलिझारोव्ह उपचार पद्धतीवरील मार्गदर्शन व व्याख्यान देण्यासाठी संपूर्ण भारतातून फक्त डॉ. संदीप आडके यांनाच आमंत्रण देण्यात आले होते. डॉ. आडके यांनी परिषदेत अस्थिरोगावरील अत्याधुनिक रशियन इलिझारोव्ह तंत्रज्ञान, युद्धात जखमी झालेल्या रुग्णांवरील उपचार, गुडघेदुखीवरील कृत्रिम गुडघा बदल, तुटलेल्या व वाकड्या हाडांवरील शस्त्रक्रिया तसेच विनाचिरफाड होणाऱ्या आधुनिक उपचार पद्धती यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी सुदानमधील डॉक्टरांसाठी एकदिवसीय कार्यशाळा घेऊन प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. या पत्रकार परिषदेस रमाकांत गड्डम, केशव जहागीरदार, दिलीप दामले, दीपक पेंढारकर आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीची सूत्रे कुटुंबाबाहेर; पवारांच्या भूमिकेकडे लक्ष!

## ● अजितदादांच्या मृत्यूनंतर पक्ष, पदाबाबत शरद पवार, सुप्रिया, रोहित पवार यांच्यासह कोणीही काढला नाही ब्र शब्द

## ● सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री होण्यासह दोन्ही राष्ट्रवादी एकत्रबाबत कुटुंबाबाहेरच्या पक्षातील नेत्यांचीच खलबतं

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

**५०-६० वर्षांच्या राजकीय जीवनात शरद पवारांना सर्वात मोठा धक्का बसलाय तो पुतण्या अजित पवार यांच्या अकाली मृत्यूने होय. कोणत्याही संकटात स्थीर असणारे पवार अजितदादांच्या मृत्यूमुळे खचल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट जाणवत होते. अजितदादांच्या मृत्यूनंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार, उपमुख्यमंत्री कोण होणार, राष्ट्रवादीचे अध्यक्षपद कोणाकडे असणार, केंद्रात कोण मंत्री होणार या चर्चांना ऊत आलेला असताना शरद पवारांनी मात्र शांत, संयम दाखवत अजितदादांच्या मृत्यूनंतर घ्यावयाचे सर्व निर्णय सुनेत्रा पवार, अजितदादांची मुले आणि अजित राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांवर सोपवल्याचे स्पष्ट जाणवले. अजितदादानंतर पुढे काय याबाबत शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांच्यासह कुटुंबातील कोणत्याही सदस्यांनी सत्ता आणि पक्षाबाबत ब्र शब्द काढला नाही. याउलट अजित राष्ट्रवादीचे नेते प्रफ्फुल पटेल, छगन भुजबळ, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे यांनी खलबतं करीत मुख्यमंत्र्यांची भेट घेत पुढे काय हे स्पष्ट केले. सुनेत्रा पवार यांनाच उपमुख्यमंत्री करण्याबाबतची चर्चा अजित राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी अजितदादांच्या अंत्यसंस्कारानंतर लगेच सुरु केल्याचे माध्यमातून दिसून आले. दोन्ही राष्ट्रवादीच्या अनेक नेत्यांनी पक्ष एकत्रबाबत जाहीर वक्तव्ये केली पण अजित राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी सावध भूमिका घेतल्याचे जाणवले. एकूणच काय घरातला कर्ता, धडाधडीचा नेता गेल्यानंतर पदाबाबत लालसा नसल्याचे शरद पवारांनी दर्शवत आपला राजकीय धुरंधरपणा स्पष्ट केला आहे.**



प्रशांत माने
मो.९८८११९१४४३

संसदीय राजकारणाच्या ६० वर्षात शरद पवारांनी आपल्या जीवनात आणि राजकीय कारकिर्दीत अनेक चढउतार पाहिलेले आहेत. केंद्र अथवा राज्यातील सत्ता गेली, पराभव झाला तरी न खचता दुसऱ्या दिवशी जनसेवेसाठी हजर असणारे शरद पवार कणखर असल्याचे वारंवार दिसून आले. राष्ट्रवादी पक्ष फुटला, शरद पवारांनी मोठे केलेले त्यांच्या अगदी जवळचे विश्वासू समजले जाणारे अनेक नेते त्यांना सोडून अजितदादांसोबत गेले व सत्तेत सहभागी झाले पण पवार कधीच खचलेले दिसले नाहीत. पक्ष फुटल्यानंतरही पुन्हा जोमाने कामाला लागून पक्षाची परत सक्षमपणे बांधणी करण्यासह सोबत राहिलेल्या नेते, कार्यकर्त्यांसह नवीन पक्षाला उभारी देण्याचा चंग बांधून ९० व्या वयातही तरुणाप्रमाणे धावणारे शरद पवार अवघ्या महाराष्ट्राने पाहिलेले आहेत. काँग्रेसमध्ये महत्वाचे नेते असताना आणि १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यानंतर शरद पवारांनी अनेक दगडांना सेंदूर फासून देव केल्याची अनेक उदाहरणे आहेत. केंद्र व राज्यात महत्वाची सत्तापदे त्यांच्याकडे असतानाही पवारांनी घरातील कोणाला मोठी संधी दिल्याचे दिसले नाही. विशेष म्हणजे अजित पवारांनाही शरद पवारांनी सुरुवातीच्या काळात संधी असूनही मुख्यमंत्री अथवा उपमुख्यमंत्रीपद दिले नाही तर पक्षातील विजयसिंह मोहिते-पाटील, आर. आर. पाटील, छगन भुजबळ यांना पवारांनी संधी दिली. काँग्रेसपेक्षा जास्त आमदार राष्ट्रवादीचे विजयी झाल्यानंतरही पवारांनी मुख्यमंत्रीपद राष्ट्रवादीकडे घेतले नाही. वास्तविक पाहता शरद पवारांना शक्य होते की, आपल्या कुटुंबातील अजित पवार, सुप्रिया सुळे यांना ते महत्वाचे मंत्रीपद देवू शकले असते. पण पवारांनी कायम पक्षात लोकशाही जपण्याचा प्रयत्न केला. अजित पवारांनी सहावेळा राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भूषविले तर ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडला. प्रशासनावर मजबूत पकड असलेले आणि खंबीर निर्णयक्षमता असणारे कै. अजितदादा यांना इच्छा असूनही मुख्यमंत्री होता आले नाही अथवा शक्य असूनही त्यांना आपण मुख्यमंत्री करू शकलो नाही याची खंत मात्र शरद पवारांच्या मनात कायम राहील.



कोणालाही स्वप्नातदेखील वाटले नाही अशी दुर्दैवी घटना घडली आणि विमान अपघातात अजित पवारांचा मृत्यू झाला. हा आघात दिग्गज राजकारणी पवार कुटुंबियांचा कणा मोडणाराच ठरला. पवार कुटुंबातील प्रत्येकालाच हा धक्का सहन होणारा नव्हता हे जाणवत होते. कणखर राजकारणी म्हणून ओळख असणारे शरद पवार देखील खचल्यासारखे त्यांच्या चेहऱ्यावरून जाणवत होते. अजितदादा आणि सुप्रिया सुळे यांच्यातील बहिण-भावाचे अतूट प्रेम होते हे दिसून आले. प्रसंगी काही राजकीय कारणांनी का होईना पण राष्ट्रवादी पक्ष फुटला अजित पवारांनी काका शरद पवारांना कात्रजचा घाट दाखवला हे राजकारण सर्वांनी पाहिले पण वास्तविकतेमध्ये पवार कुटुंब एकत्रच होते हे मात्र या दुर्दैवी प्रसंगानुसार सर्वांनी पाहिले. आ. रोहिते पवारांनी देखील काका अजित पवारांवर आपले किती प्रेम होते आणि त्यांच्याबद्दल किती आदर होता हे शब्दातून दाखवले.

अजितदादांच्या मृत्यूनंतर शरद पवार राष्ट्रवादीच्या पवार कुटुंबातील सर्वच सदस्यांनी सर्व राजकीय घडामोडी शांतपणे पहात कृतीतून हे दाखवले की, अजितदादा हेच कुटुंबासाठी सर्वस्व होते. कारण दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणे, सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपद करणे, पार्थ पवार यांना राज्यसभेवर घेणे, राष्ट्रवादीचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण याबाबत शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार अथवा दुसऱ्या कोणीही पवार कुटुबांतील सदस्याने याबाबत चकार शब्द काढला नाही. दोन्ही राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी जाहीरपणे सांगितले की, मृत्यूपूर्वी अजितदादांनी दोन्ही राष्ट्रवादी एकीकरणाचे वक्तव्ये जाहीरपणे केले होते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणेच गरजेचे असल्याचे वक्तव्य माध्यमातून केले होते. पण अजित राष्ट्रवादीच्या काही प्रमुख नेत्यांनी मात्र सूत्रे हातात घेत सुनेत्रा पवार यांचे नाव उपमुख्यमंत्रीपदासाठी निश्चित केले, मुख्यमंत्र्यांची भेट घेवून तातडीने प्रस्ताव दिला. पार्थ पवारांच्या राज्यसभेवरील संधीचा निर्णय केला. हे सर्व करीत असताना अजित राष्ट्रवादीच्या नेत्यांनी शरद पवारांशी चर्चा केली की नाही, याबाबत काहीच समोर आलेले नाही. याउलट पक्षातील काहींनी अशीही टिका केली की दादांची राख शांत व्हायची देखील काही नेते वाट पहात नाहीत. भाजपाच्या सूचनेनुसार मात्र पवार कुटुंबातीलच कोणी पक्षाचा अध्यक्ष करावा लागणार असल्याने काहींचा नक्कीच हिरमोड झाला असणार अशीही चर्चा राष्ट्रवादीच्या वर्तुळात रंगली आहे.

### पवार कुटुंबासह राष्ट्रवादीचा कणा मोडला...

देश आणि राज्यात शरद पवारांचे राजकारण आणि कर्तृत्व सर्वश्रृत आहे. पवारांच्या नंतर अजित पवार, सुप्रिया सुळे, रोहिते पवार यांनी राजकारणात चमक दाखवली. आता नव्याने सुनेत्रा पवार यांनी राजकारणात आपली कारकिर्द सुरु केली. राष्ट्रवादी पक्ष फुटला पण संकटात मात्र दोन्ही राष्ट्रवादी एकमेकाला पूरक असल्याचेच दिसून आले. अजित पवारांवर टिका, आरोप झाल्यानंतर सुप्रिया सुळे, रोहित पवार यांनी अजितदादांची बाजू घेतली तर अजितदादांही शरद राष्ट्रवादीसाठी मैदानात उतरल्याचे दिसले. नुकतेच पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील पिछेहाट झाल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेला गती मिळाली. परंतु तत्पूर्वीच अजितदादांचा अपघाती मृत्यू झाला अन् जे संकट पवार कुटुंबावर कोसळले त्यावरून एकच स्पष्ट जाणवले की पवार कुटुंबाचा कणा मोडला.

### पार्थ पवारांचेही पुनर्वसन?, अजितदादांची इच्छा होणार पूर्ण

राजकारणात आपल्या मुलांना प्रस्थापित करण्याबाबत कोणत्याही पक्षात अपवाद नाहीत. अजितदादांचे पुत्र पार्थ पवार यांचा मागील लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. हा पराभव अजितदादांच्या जिव्हारी लागला होता. त्यानंतर बारामती लोकसभेत पत्नी सुनेत्रा पवारांचा पराभव झाला. हा पराभव सुनेत्रा पवार यांच्या नणंद आणि अजितदादाच्या बहिण सुप्रिया सुळे यांनीच केला. पत्नीचा पराभव जिव्हारी लागण्यापूर्वीच अजितदादांनी सुनेत्रा यांना राज्यसभेचे खासदार केले. आता पार्थ पवारांना राज्यसभेवर घेण्याच्या चर्चा सुरु असून अजितदादांची ही इच्छा देखील पूर्ण होणार आहे. दरम्यान शरद पवारांना आता राज्यसभेवर जाण्यासाठी पुरेसे संख्याबळ नाही, तरी देखील पार्थ यांना राज्यसभेवर पाठविण्यात येणार हे विशेष आहे.

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र झाल्यास अजित राष्ट्रवादीच्या काहींना खच्चीकरणाची भिती...

अजित पवार आणि सुप्रिय सुळे या दोघांनीही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या प्रश्नावर तोंडात साखर पडण्याचे बोलून एकीकरणाचे संकेत दिले होते. आता सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यास अजित राष्ट्रवादीच्या काही नेत्यांचे प्राबल्य पक्षावर राहणार आहे. मात्र दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास शरद पवार तर सर्वेसर्वा असणारच पण सुप्रिया सुळे, रोहित पवार यांच्यासह जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड आदींचे पक्षात महत्व असणारच आहे. राष्ट्रवादीच्या एकीकरणामुळे मात्र सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांची थिंक टँक म्हणून मिरवण्याची काहींची संधी हुकणार आहे. सुप्रिया, रोहित यांच्यामुळे खच्चीकरण होण्याची भिती अजित राष्ट्रवादीच्या काहींना असणार हे मात्र नक्की.

## रेल्वेच्या तत्काळ बुकिंग नियमांध्ये बदल

### कन्फर्म तिकिटे एका क्लिकवर

**नवी दिल्ली, ३० जानेवारी**

तत्काळ तिकिटे बुकिंग प्रक्रिया पारदर्शक आणि न्याय्य करण्यासाठी भारतीय रेल्वेने त्यांचे तंत्रज्ञान आणि नियम पूर्णपणे अद्ययावत केले आहेत. नवीन नियमांनुसार तत्काळ तिकिटे फक्त पूर्णपणे सत्यापित आयआरसीटीसी खात्यांधूनच बुक करता येतील. प्रवाशांना आता त्यांचे आयआरसीटीसी खाते त्यांच्या आधार कार्डशी लिंक करावे लागेल. पडताळणीशिवाय किंवा अपूर्ण प्रोफाईल असलेली खाती तत्काळ विंडो दरम्यान ब्लॉक केली जातील. प्रवाशांना बुकिंगच्या वेळी फक्त त्यांच्या आधार किंवा सरकारी आयडीशी लिंक केलेले ओळखपत्र तपशील प्रदान करणे आवश्यक असेल. यामुळे बनावट नावांनी तिकिटे बुक करणे आणि त्यांना महागड्या दरात विकणे या पद्धतीला आळा बसेल. बुकिंगच्या सुरुवातीच्या मिनिटांत ऑटो-फिल टुल्स आणि स्क्रिप्ट ब्लॉक करण्यासाठी अत्याधुनिक तांत्रिक फिल्टर लागू करण्यात आले आहेत. यामुळे, आता सॉफ्टवेअरद्वारे क्षणार्धात तिकीट मिळवणे शक्य होणार नाही. पेंट फेल होणे ही प्रवाशांची मोठी तक्रार होती. नवीन प्रणाली पेंट गेट-वे जलद आणि अधिक सुरक्षित बनवते.

# एका देशाचे वर्चस्व जागतिक शांततेला धोका

### ● गुटेरस यांनी गाझा शांतता मंडळावरून ट्रम्प यांना ठणकावले

### ● बहुध्रुवीय व्यवस्थेच्या आवश्यकतेवर भर ● दबाव आणणे हुकूमशाहीचे लक्षण



**◆ न्यू यॉर्क, ३० जानेवारी**

जग कुणाच्याही आदेशाने चालवता येत नाही, एका देशाचे वर्चस्व जागतिक शांततेसाठी धोकादायक ठरू शकते. संयुक्त राष्ट्र संघाचा पर्याय गाझा शांतता मंडळ कदापि होऊ शकत नाही. मंडळाचे नेतृत्व एका देशाकडे आहे आणि अशा परिस्थितीत मंडळात सहभागी होण्यासाठी इतर देशांवर दबाव आणणे हे हुकूमशाहीचे लक्षण असल्याचे नमूद करीत संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी थेट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना लक्ष्य केले. यावेळी त्यांनी बहुध्रुवीय व्यवस्थेवर भर दिला.

पत्रपरिषदेत जागतिक परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना गुटेरस म्हणाले, जागतिक समस्या एका देशाच्या हुकुमाने सोडवल्या जात नाहीत. जगाचे दोन भागांत विभाजन केल्याने काहीही होणार नाही. सध्याची परिस्थिती चीन आणि अमेरिका या दोन देशांच्या वर्चस्वात विभागली आहे. आपल्याला स्थिरता हवी असल्यास बहुध्रुवीयतेचे समर्थन करावे लागेल. एक देश इतर देशांवर आपला आदेश लादत असेल, तर यातून संघर्षाची परिस्थिती उद्भवू शकते. गाझा शांतता मंडळाच्या स्थापनेतून असाच अनुभव आपण घेत आहे. मंडळाच्या सदस्यत्वासाठी इतर देशांवर दबाव आणणारी कृती हुकूशाहीला प्रोत्साहन देणारी आहे.

विकास, शांतता आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी सदस्य देशांनी या कृतीला विरोध करायला हवा. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद या वर्षाच्या अखेरीस उत्तराधिकारी निवडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**सुरक्षा परिषदेत सुधारणांची गरज**

सुरक्षा परिषदेच्या सुधारणांच्या गरजेवर भर देताना त्यांनी म्हटले की, काही देश संयुक्त राष्ट्रांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात आणि त्यांचाच सुधारणांना विरोध आहे. सुरक्षा परिषदेत सुधारणांची आवश्यकता आणि सर्व राष्ट्रांनी सहमती दर्शवली तरच हे शक्य आहे. सध्या विकसित अर्थव्यवस्थांचा जागतिक वाटा कमी होत आहे. (वृत्तसंस्था)

#### इतर देशांवर दबाव आणण्याचे प्रयत्न निष्फळ

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेची मूलभूत जबाबदारी संयुक्त राष्ट्र आणि सुरक्षा परिषदेवर आहे. कोणताही देश या संघटनांना पर्याय म्हणून नवीन व्यवस्था आणण्याचे प्रयत्न करीत असेल, तर यशस्वी होणार नाही. स्वतःच्या शक्तीच्या बळावर इतर देशांवर दबाव आणण्याचे प्रयत्न यापूर्वीही झाले. मात्र, त्यावेळीही त्या देशाचे प्रयत्न निष्फळ ठरले. ■

#### भारत-युरोपियन युनियन व्यापार कराराचे कौतुक

भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराचे कौतुक करताना गुटेरस म्हणाले, मी या व्यापार करारांकडे खूप सकारात्मक आशेने पाहत आहे. हा द्विपक्षीय करार शांतता, विकास आणि अर्थव्यवस्थांना चालना देणारा असेल याची मला खात्री आहे. द्विध्रुवीय व्यवस्थेला मोडीत काढण्यासाठी हा करार महत्त्वाची भूमिका बजावू शकते आणि जागतिक अस्थिरतेच्या वातावरणात हा आशेचा किरण असल्याचे त्यांनी सांगितले. ■

#### युद्धाची चिथावणी देणारे मोकाट

आज आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन केले जात आहे. सहकार्य कमी होत आहे आणि बहुपक्षीय संस्थांवर अनेक आघाड्यांवर हल्ले होत आहेत. आज युद्धासाठी चिथावणी देणाऱ्यांना अथवा प्रत्यक्षात संघर्षाची सुरुवात करणाऱ्यांना शिक्षा होत नाही, ज्यामुळे जागतिक तणाव वाढत आहे. अनेक अडथळे असतानाही संयुक्त राष्ट्र पराभव मानणार नाही आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहील. ■

# दादा, कुठं हरवलात तुम्ही? घट्ट मिठी मारायचीय

### आ.रोहित पवारांची अजितदादांसाठी माती सावडण्याच्या तिसऱ्या दिवशी भावनिक पोस्ट

### अजितदादांनी जिथं विकासरुपी फुलांची बाग फुलवली तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल असे वाटले नाहीः आमदार रोहित पवार



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री सर्वांचे लाडके दादा अजित पवार यांच्या दुःखद निधनानंतर त्यांच्या माती सावडण्याच्या तिसऱ्या दिवशी आ.रोहित पवार यांनी फेसबुकवर भावनिक पोस्ट शेअर करत अजितदादांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. ते म्हणाले की,

अजितदादांनी जिथं विकासरुपी फुलांची बाग फुलवली तिथंच त्यांची राख सावडण्याची वेळ येईल, असं कधी स्वप्नातही आलं नाही.. पण नियतीच्या क्रूर खेळापुढं कुणाचं काही चालत नाही.. अजितदादांची ती दुर्दैवी बातमी आल्यापासून अद्यापपर्यंत डोकं सुन्न आहे मन बर्फाप्रमाणे थिजलंय.. काय झालं, कसं झालं आणि का झालं, या विचाराचं मनातलं काहूर थांबत नाहीय आपल्यात आत्तापर्यंत जे-जे काही संभाषण झालं, चर्चा झाल्या, विशेषतः शेवटच्या काही दिवसांमध्ये झालेल्या भावनिक चर्चा, हे सगळं काही एखादा टेपरेकॉर्डप्रमाणे सारखं सारखं कानात घुमतंय. जणू काही तुम्हीच अदृश्य स्वरुपात बोलत आहात असा भास होतोय. तुमची ती काम करण्याची शैली, प्रशासनावर पक्की मांड, राजकारणावर मजबूत कमांड, परखड स्वभाव, हो ला हो आणि नाही ला नाही न करता जे असेल ते स्पष्ट सांगून समोरच्या व्यक्तीसोबत राजकारण न खेळण्याची पद्धत, कामाचा झपाटा, वेळेचं काटेकोर नियोजन या सगळ्याचं आम्हाला अक्षरशः कौतुक आणि आश्चर्यही वाटायचं. सत्ता असो किंवा नसो, कायम तुमचा दरारा वाटायचा, आदरयुक्त भिती असायची. तुमचा सार्वजनिक वावर बघून तुम्हाला न भेटलेल्या अनेकांना तुम्ही फणसाप्रमाणे कठोर वाटायचात पण तीच व्यक्ती जेंव्हा तुमच्या संपर्कात यायची तेंव्हा फणासातील रसाळ आणि मधुर गऱ्याप्रमाणे तुमचा स्वभाव पाहून ती तुमच्या प्रेमात पडायची, याचे आम्ही साक्षीदार आहोत.

पण अचानक असं काय झालं? दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा गाडा हाकणारा, दररोज भेटणाऱ्या शेकडो माणसांना मदत करणारा, त्यांची कामं करणारा, पहाटेपासून रात्रीपर्यंत महाराष्ट्राच्या विकासाचाच ध्यास घेणारा, सामान्य माणसासाठी वाऱ्याच्या वेगाने उर फाटेस्तोवर धावणारा पहाडासारखा माणूस असा एका क्षणात कसा निघून जाऊ शकतो? या प्रश्नाने डोक्याचा भुगा झालाय. पण काही प्रश्नांची उत्तरं मिळत नसतात, असं म्हणतात. पण मा. अजितदादांच्या विकासाचा वेगच कदाचित नियतीला आवडला असावा आणि म्हणूनच अजितदादा लोकांसाठी धावत असतानाच त्याच वेगाने नियतीने त्यांच्यावर झडप घातली असावी. या नियतीबाबतच माझी तक्रार आहे.. ती कुठं करायची हे कळत नाही. पण माझा त्या नियतीला प्रश्न आहे, ''आमच्यासारखे लाख नेले असते तरी चाललं असतं, पण आमचा लाखांचा पोशिंदा तू का असा चोरून नेला? एका क्षणात तू लाखो जणांच्या लाखो स्वप्नांची राख का केलीस. दे ना उत्तर.''

अजितदादा तुमच्याविषयी देखील माझी तक्रार आहे. दोन दिवसांपासून महाराष्ट्र अक्षरशः स्तब्ध आहे.. प्रत्येकाच्या डोळ्यांतला अश्रूचा पूर कमी होत नाहीये.. हुंदके आणि आक्रोश ऐकून काळजात चर्रर होतंय.. आपल्या जाण्याने पाठीमागे दुःखाचे असे पाट वाहतील, याची चिंता दादा तुम्ही का केली नाही? एरवी कुणी थोडं जरी चुकलं तर त्याला चार चौघात झाप झाप झापणारे तुम्ही त्या नियतीलाही त्याच जरबेच्या आवाजात का नाही खडसावलं? महाराष्ट्राची अजून कित्येक कामं बाकी असताना वेळ न घेता तू अशी आलीच कशी? दादा, तुमचा आवाज ऐकूणच ती नक्की घाबरली असती. पण तुम्ही तिलाही नाराज केलं नाही. मोकळ्या हाताने तिलाही माघारी पाठवलं नाही. आलेल्या प्रत्येकाचं काम करायचं, हेच तर तुमचं वैशिष्टय होतं. पण दोन दिवसांपासून दुःखाच्या पुरात आकंठ बुडालेला महाराष्ट्र पाहून आता त्या नियतीलाही नक्कीच पश्चात्ताप होत असेल. दादा काय बोलू? आज तुमची राख जमा करत असताना वाटत होतं की फिनिक्स पक्षाप्रमाणे तुम्ही या राखेतूनही अचानक त्याच रुबाबात उभं रहाल आणि नेहमीच्या खर्जातल्या आवाजात आम्हाला म्हणाल, ''अरे वेड्यांनो, का अश्रू ढाळताय? मी तुमची गंमत करत होतो? एखाद्या संकटाला सामोरं जाण्याची तुमची किती तयारी आहे हे 'मॉक ड्रील'प्रमाणे चेक करत होतो.. आता उठा, कामाला लागा महाराष्ट्रासाठी, इथल्या सामान्य माणसासाठी आपल्याला खूप काम करायचंय.. चला, उशीर नका करु''



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त पाळल्या जाणाऱ्या हुतात्मा दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नवी दिल्लीतील राजघाटावर त्यांना श्रद्धांजली अर्पण केली

# घरगुती कामगारांचे किमान वेतन ठरणार सरकार दरबारी

### मूलभूत हक्क घोषित करण्याची याचिका फेटाळली

**◆ नवी दिल्ली, ३० जानेवारी**

घरगुती कामगारांना किमान वेतन मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असल्याचे घोषित करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. घरकामगारांसाठी किमान वेतन निश्चित करणे आणि त्याची अंमलबजावणी हे धोरणात्मक निर्णय असून, ते राज्य सरकारांनी घेणेच योग्य आहेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने या प्रकरणावर सुनावणी करताना निरीक्षणे नोंदविली तसेच होणारे परिणाम आणि चिंताही व्यक्त केली. न्यायालयाने घरगुती कामगारांना किमान वेतन अनिवार्य केले, तर त्याचे अनपेक्षित परिणाम होऊ शकतात. यामुळे प्रत्येक घरात खटले सुरू होतील.

एकदा का किमान वेतन निश्चित झाले की, लोक घरकामगारांना कामावर ठेवण्यास नकार देऊ शकतात, असे सरन्यायाधीशांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# डोळे उघडणारा आणि पथप्रदर्शकही!

अस्थिर आणि निराशाजनक जागतिक परिस्थितीतही देशाच्या अर्थव्यवस्थेचा वाढलेला वेग आश्वासक असल्याचे आर्थिक अहवालात नमूद केल्यामुळे देशवासीयांना हायसे वाटणे स्वाभाविक म्हणावे लागेल. नवीन आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा वेग ६.८ ते ७.२ टक्क्यांपर्यंत राहणार असल्याचे तसेच डॉलरच्या तुलनेत रुपयाची सातत्याने घसरण होत असली तरी त्याचा अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होणार नसल्याचा जो विश्वास या आर्थिक अहवालातून व्यक्त करण्यात आला आहे, तो मरगळलेल्या मनाला निश्चितच उभारी देणारा आहे. अर्थव्यवस्थेचा विकास दर ७.४ टक्के राहील, असे अनुमान होते, त्या तुलनेत ७.२ टक्के हा दर आपल्या अपेक्षेपेक्षा फार काही कमी नाही. दरवर्षी देशाचा अर्थसंकल्प सादर करण्याच्या पूर्वसंध्येला संसदेत आर्थिक अहवाल सादर केला जातो. यावेळी असा अहवाल तीन दिवस आधी सादर करण्यात आला आहे. आर्थिक अहवाल आणि अर्थसंकल्प यांचे जवळचे नाते आहे. आर्थिक अहवालातून मागील वर्षाच्या देशाच्या आर्थिक स्थितीचे तटस्थ मूल्यांकन केले जाते, याला एकप्रकारचे आर्थिक अंकेक्षण म्हटले तरी हरकत नाही, तर अर्थसंकल्पातून पुढील वर्षी देशाचे आर्थिक नियोजन कसे असेल, याचा आराखडा देशवासीयांसमोर सादर केला जातो. आर्थिक अहवालात जगातील आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला जातो. त्यानुसार यावर्षीही जगात अस्थिरता राहील, पण ती काही प्रमाणात नियंत्रणात राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला. दुसऱ्या शक्यतेनुसार बहुकेंद्रीय जगाच्या सर्व व्यवस्था कोसळतील असे म्हटले तर तिसऱ्या शक्यतेनुसार व्यवस्थेला बसणारे धक्के वाढत जातील, याकडे अहवालातून लक्ष वेधण्यात आले. देशाच्या अर्थव्यवस्थेची मांडणी करताना आपल्याला संभाव्य जागतिक अस्थिरतेचा आढावा घ्यावा लागणे अपरिहार्य आहे. आकाशात काळे ढग आले तर सामान्य माणूस ज्याप्रमाणे छत्री घेऊन बाहेर पडतो, त्याप्रमाणे अर्थव्यवस्थेची आखणी करताना अनेक शक्यता विचारात घ्याव्या लागतात.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यावर्षी नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणार आहेत, हा एक विक्रम म्हटला पाहिजे. सीतारामन् या देशातील पहिल्या महिला अर्थमंत्री आहेत. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांनी अर्थखाते आपल्याकडे ठेवले होते. पण त्या तेव्हा पूर्णवेळ अर्थमंत्री नव्हत्या. अर्थसंकल्प दरवर्षी १ फेब्रुवारीला सादर केला जातो. यात आतापर्यंत कधीही खंड पडला नाही. यावर्षी १ फेब्रुवारीला रविवार म्हणजे सुटी असतानाही अर्थसंकल्प संसदेत सादर केला जाणार आहे. मोदी सरकारने देशातील अनेक जुन्या आणि कालबाह्य परंपरा रद्द केल्या. आधी अर्थसंकल्प हा सायंकाळी ५ वाजता संसदेत सादर केला जात होता. पण मोदी सरकारने सत्तेवर आल्यानंतर ही प्रथा बंद करत अर्थसंकल्प सकाळी ११ वाजता संसदेत सादर करण्याची नवी आणि योग्य परंपरा सुरू केली. यासोबत मोदी सरकारने रेल्वेचा वेगळा अर्थसंकल्प सादर करण्याची परंपराही मोडीत काढली. अर्थमंत्री म्हणून निर्मला सीतारामन् यांनी हा आर्थिक अहवाल संसदेत सादर केला असला तरी मोदी सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन् यांनी तो तयार केला आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीने अर्थसंकल्प हा डोक्यावरून जात असतो, तीच स्थिती अनेकदा आर्थिक अहवालाचीही असते. अर्थसंकल्पात आयकराची मर्यादा किती वाढते, याकडेच देशातील मध्यमवर्गाचे लक्ष असते. त्यामुळे यावर्षी सीतारामन् यांच्या पोतडीतून देशवासीयांच्या हातात काय पडणार, याबाबत कमालीची उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे. आर्थिक अहवालात जसा देशाच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला जातो, तसाच तो कृषी आणि उद्योगासह अन्य क्षेत्रांबाबतचाही आढावा घेतला जातो. देशाची अर्थव्यवस्था सुदृढ असल्याबद्दल समाधान व्यक्त करताना या अर्थव्यवस्थेचा फायदा ज्यांना खरोखर आवश्यकता आहे, अशा समाजातील त्या वर्गापर्यंत पोहोचतो की नाही, याचेही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. महागाई कमी झाल्याचा दावा या आर्थिक अहवालातून केला जात असताना बाजारात गेल्यानंतर मध्यमवर्गाला येणारा अनुभव वेगळाच असतो, याचीही दखल घेतली पाहिजे. रोजगार निर्माण झाले असताना, असा दावा सरकारी पातळीवर केला जात असताना, देशातील बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस का वाढत आहे, याचाही विचार झाला पाहिजे. मुळात सरकारवर टीका करण्यासाठी याचा उपयोग करण्यापेक्षा सरकारला मार्ग दाखविण्यासाठी याचा उपयोग केला गेला पाहिजे.

एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी अंत्योदयाची संकल्पना मांडली. अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. मोदी सरकारची गेल्या अकरा वर्षांतील वाटचाल ही अंत्योदयाच्या धोरणानुसार म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण गृहीत धरून सुरू आहे. मोदी सरकारने आपल्या कार्यकाळात जेवढ्या लोककल्याणाच्या योजना सुरू केल्या, तेवढ्या आजपर्यंत कोणत्याही सरकारने सुरू केल्या नाहीत. निर्मला सीतारामन् यांच्याआधी अरुण जेटली अर्थमंत्री होते. अल्पकाळासाठी पीयूष गोयल यांनी अर्थखाते सांभाळले. पण जेटली असो, गोयल असो की निर्मला सीतारामन् या भाजपाच्या सगळ्या अर्थमंत्र्यांचा अर्थसंकल्प हा अंत्योदयाच्या भूमिकेवरच बेतलेला होता. आर्थिक अहवाल हा बऱ्यापैकी परखड असतो. सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणाची तो चिरफाड करत असतो. पण त्याचा उद्देश सरकारवर टीका करण्याचा नाही तर सरकारच्या आर्थिक धोरणातील त्रुटी लक्षात आणून देणारा असतो. एकप्रकारे आर्थिक अहवालातून सरकारच्या डोळ्यात अंजन घालण्याचा प्रयत्न केला जातो. मुळात आज जग इतके छोटे झाले की एका देशातील अस्थिर राजकीय परिस्थितीचा परिणाम त्याच्या आजूबाजूच्या सर्व देशांवर होत असतो. भारत रशियाकडून कच्चे तेल घेत होता. यामुळे दुखावलेल्या अमेरिकेने भारतीय वस्तूंच्या आयातीवर जे शुल्क लावले, त्याचा फटका आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर निश्चितच पडला आहे. रशिया आणि अमेरिका यांच्या भांडणात मधल्यामध्ये भारत विनाकारण भरडला गेला, त्याच्यावर टॅरिफची कुऱ्हाड कोसळली. पण यातून बाहेर पडण्यासाठी भारताने युरोपियन समुदायासह अन्य काही देशांशी व्यापारी करार केले आहेत. युरोपियन देशांशी करण्यात आलेल्या 'मदर ऑफ ऑल डील्स' या कराराने अमेरिकेच्या टॅरिफमुळे होणारे नुकसान कमी केले. मुळात कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी आयात कमी आणि निर्यात जास्त असली पाहिजे, तरच अर्थव्यवस्था सुदृढ असते. महागाई लक्षणीय प्रमाणात कमी होत असताना कल्याणकारी योजना तळागाळातील लोकापर्यंत प्रभावीपर्यंत पोहोचत असल्यामुळे दारिद्र्यात घट झाल्याचे निरीक्षणही यात नोंदवण्यात आले. यावेळच्या आर्थिक अहवालाचे वेगळेपण म्हणजे देशातील कृषी क्षेत्राचा आढावा घेताना आरोग्य क्षेत्राचा अभ्यासपूर्ण आढावाही यातून घेण्यात आला आहे. अतिप्रक्रिया केलेल्या अन्नाच्या अतिसेवनामुळे लठ्ठपणाची समस्या वाढत असल्याकडे तसेच यातून हृदयविकार, श्वसनाचे विकार, मधुमेह आणि मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवतात. परिणामी त्याच्यावरील उपचारासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक ताण येतो. याचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो, याकडे लक्ष वेधण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे अतिप्रक्रिया केलेल्या अन्नामुळे मुला-मुलींमधील लठ्ठपणा वाढत असल्यामुळे या पदार्थांच्या जाहिरातींवर निर्बंध लादण्याची सूचनाही या अहवालातून करण्यात आली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आठवीनंतर बहुतांश मुले शाळा सोडतात. ही गळती थांबविण्याची आवश्यकता या आर्थिक अहवालातून व्यक्त करण्यात आली. अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या लोकप्रिय घोषणांचा जो सपाटा राज्य सरकारे लावत आहे, त्याबद्दलही या अहवालातून चिंता व्यक्त करण्यात आली. देशातील विविध राज्यांत अशा योजनांवर १ लाख ७० हजार कोटी रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळे आवश्यक विकासकामांवरील खर्चात कपात करावी लागत असल्याची चिंताही या अहवालातून व्यक्त करण्यात आली. त्यामुळे यावर्षीचा आर्थिक अहवाल हा खरोखरच सर्व राज्य सरकारांचे डोळे उघडणारा तर केंद्र सरकारसाठी पथप्रदर्शक असा म्हणावा लागेल.

## यंगिस्तान

# आपण लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत?

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

२६ जानेवारी २०२६ रोजी आपण प्रजासत्ताक दिन साजरा केला. भारत २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक झाला. या दिवशी भारताची राज्यघटना लागू झाली. तेव्हापासून भारताने आपल्या स्वतःच्या घटनात्मक चौकटीनुसार स्वतःचे शासन करण्यास सुरुवात केली. १९३० च्या पूर्ण स्वराज्य घोषणेचा सन्मान करण्यासाठी २६ जानेवारी हा दिनांक प्रजासत्ताकसाठी निवडण्यात आला, कारण तेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिश राजवटीपासून संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली होती. भारतीय संविधानाची निर्मिती संविधान सभेने केली, ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेला जवळपास तीन वर्षे लागली, ज्यामुळे आपले संविधान हे जगातील सर्वांत तपशीलवार संविधान झाले. म्हणजेच आपण सर्वांगीण आणि सखोल विचार करून संविधानाची निर्मिती केली आहे. आज इतक्या वर्षांनंतर आपण जेव्हा काही गोष्टी पाहतो तेव्हा एक प्रश्न मनात निर्माण होतो की खरोखर आपण लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत का?

भारताची लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. आपण संघराज्य आहोत. म्हणजे आपल्याकडे राज्य सरकारही आहे आणि केंद्र सरकारही आहे. आपल्याकडे न्यायव्यवस्थेसाठी स्वतंत्र यंत्रणा आहे आणि या सर्वांनी मिळून आपण एक राष्ट्र म्हणून अभिमानाने जगत आहोत. पण प्रजासत्ताक दिनाला ७६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर भारतीय जनता म्हणून आपल्याला आता गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. काही दिवसांपूर्वी अंजली भारती यांनी मुख्यमंत्र्यांच्या पत्नीवर अश्लाघ्य भाष्य केले होते. विशेष म्हणजे त्या कार्यक्रमात जमलेल्या एकाही व्यक्तीला त्यांनी केलेले कृत्य चुकीचे आहे असे म्हणावेसे वाटले नाही. उलट अनेकांनी टाळ्या वाजवल्या. सर्व स्तरांतून टीका झाल्यानंतर अंजली भारती यांनी माफी मागितली. पण त्यात जाणिवेचा अभाव होता. मुंबईच्या मालाड रेल्वे स्टेशनवर ओमकार शिंदे या तरुणाने अगदी क्षुल्लक वादावरून अलोक कुमार सिंह या ३३ वर्षीय प्राध्यापकाचा खून केला. मुंबई लोकल ही तशी संवेदनशील जीवनवाहिनी आहे. कारण इथे रोज वाद, मारामाऱ्या होतच असतात. पण छोट्याशा वादावरून खून केल्याच्या घटना सहसा घडत नाहीत. असे मानसिक रुग्ण जर लोकलमधून प्रवास करणार असतील तर ही जीवनवाहिनी देखील सुरक्षित नाही, असं म्हणण्याची पाळी येईल. माणसातला संयमीपणा लोप पावतोय का? सूरज शिर्के नावाच्या मराठी तरुणाने राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केली होती. त्यामुळे दोन्ही गटांतील कार्यकर्ते चिडले. मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्याचा शोध घेतला आणि त्याला मारहाण केली व त्याची सुमारे दीड किलोमीटर अर्धनग्न धिंड काढली. त्यानंतर सूरजने हात जोडून दोन्ही ठाकरे बंधूंची जाहीर माफी मागितली आहे. सूरजने प्रसिद्धीसाठी दोन्ही ठाकरे बंधूंना शिवीगाळ केली. मुळात अशा प्रकारच्या गलिच्छ टीकेची गरजच नाही. तुम्ही संवैधानिक भाषेत टीका करू शकता. सूरजचं चुकलं, पण... मनसेच्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेतला. अर्थात ती त्यांच्या सवयीची बाब आहे म्हणा. मात्र लोकशाहीत कायदे हातात घ्यायचे झाले, तर स्वतःला नेते म्हणवणारे लोक किती अपराध करत असतात आणि त्यांचे कार्यकर्ते किती दादागिरी करत असतात, अशा परिस्थितीत जनतेने कायदा हातात घ्यायचं ठरवलं तर लोकशाही टिकेल?



काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. ज्या दिवशी ही बातमी कळली, तेव्हाच लगेच काही लोक ''हा घातपात आहे... '' अशा पोस्ट्स करू लागले. काही लोकांनी तर अजितदादांवर टीका केली. विशेष म्हणजे यात सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सर आणि जबाबदार पदांवर राहिलेले लोक होते. ज्यावेळी एखादी व्यक्ती हे जग सोडून जाते तेव्हा त्या व्यक्तीच्या कुटुंबाला किती यातना होत असतील. ती व्यक्ती मोठी असल्याने तिचे कार्यकर्तेही दुःखी असतात. अशा वेळी कार्यकर्त्यांचा उद्रेक झाला तर किती मोठा प्रसंग उभा राहू शकतो. एखादी व्यक्ती गेल्यानंतर काही दिवस तरी बटणं बडवू नका. सोशल मीडिया ही चावडी झाली आहे. इथे केवळ सामान्य माणूसच नव्हे तर जबाबदार माणूसही काही बरळतो. आपल्याला जे स्वातंत्र्य मिळालंय, संविधान मिळालंय, त्यामागची भावना आपण कधी समजून घेणार आहोत? कायदे मोडणे. कायदे हातात घेणे, गंभीर परिस्थिती निर्माण होईल असे वर्तन वा वक्तव्य करणे, क्षुल्लक वादावरून मारहाण किंवा खून करणे यासाठी आपण प्रजासत्ताक झालोय का?

या सगळ्या घटना उदाहरणासाठी दिलेल्या आहेत. नागरिक म्हणून आपण किती बेजबाबदार आहोत, याचे अनेक दाखले देता येतील. प्रत्येक वेळी सिस्टिमला दोष देऊन चालत नाही. देशाने माझ्यासाठी काय केलं? हा प्रश्न विचारण्याआधी मी देशासाठी काय केलं? हा प्रश्न विचारण्याची सवय लावून घेतली पाहिजे. आपली लोकशाही मजबूत आहे, आपलं संविधान सशक्त आहे. पण आपल्या देशाची खरी ताकद आपल्या प्रत्येक नागरिकाच्या वर्तणुकीत आहे. संविधानाने आपल्याला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले, पण ते जबाबदारीने वापरणे गरजेचे आहे. मतभेद असतील, टीका असतील, पण ती अभद्र, हिंसक किंवा कायद्याच्या पलीकडे जाऊन करू नये. जेव्हा वादातून लोक खून करू लागतात, जेव्हा सोशल मीडियावर मृत व्यक्तीच्या कुटुंबाला दुखावणाऱ्या पोस्ट्स केल्या जातात, जेव्हा राजकीय मतभेदांमुळे कायदे हातात घेतले जातात, तेव्हा खरा प्रश्न उभा राहतो. आपण खरंच लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत का? ७७ वर्षांत आपण खूप प्रगती केली. जगातील सर्वांत मोठी लोकशाही, आर्थिक विकास, तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरण. पण हे सगळे टिकवायचे असेल तर प्रत्येक नागरिकाने स्वतःमध्ये बदल करायला हवा. आज आपल्याला फक्त राजकीय लोकशाहीच नव्हे, तर सामाजिक संयम, सहिष्णुता आणि जबाबदारीने वागण्याची गरज आहे. अन्यथा हे ७७ वर्षांचे यश धोक्यात येईल. आपण सर्वांनी स्वतःला विचारायला हवे की, मी लोकशाहीला मजबूत करतोय की कमकुवत करतोय? कारण लोकशाही ही फक्त सरकारची नाही, ती आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. जर आपण संयम ठेवला, सहानुभूतिपूर्ण वागलो आणि कायद्याचा आदर ठेवला, तरच लोकशाही खऱ्या अर्थाने टिकू शकेल आणि वृद्धिंगत होऊ शकेल. अन्यथा हा प्रश्न कायम राहील - आपण लोकशाहीच्या योग्यतेचे आहोत का?

writerjayeshmestry@gmail.com


## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# 'क्रांतिज्योती' ते स्टॅलिन, फरक आहेच!

आता लवकरच मराठी भाषा दिवस येईल. अनेक लोक मराठीचा उदो उदो करतील. पण, पुन्हा स्थिती 'जैसे थे'च राहील. मराठीचा विषय येतो तेव्हा कायम एक प्रश्न पडतो की, हा आग्रह राज्य म्हणून मराठी भाषेचा आहे की मातृभाषा म्हणून आहे. अगदी शास्त्रीय अभ्यासातून हे सिद्ध झाले आहे की, मातृभाषेतून झालेले प्राथमिक शिक्षण मुलांच्या बुद्धीच्या विकासासाठी अतिशय पोषक ठरते. एकदा मेंदूचा विकास नीट झाला की तुम्ही कोणतीही भाषा तितक्याच सक्षमपणे शिकू शकता. असे असूनही आजदेखील भाषेचा संबंध अस्मिता किंवा अशा शास्त्रीय मुद्द्यांशी न जोडता प्रांतवादाशी किंवा राजकारणाशी का जोडला जातो, हा प्रश्नच आहे.

नुकताच मराठीत एक चांगला चित्रपट आलाय् 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम'. शोकांतिकेची सुरुवात इथून आहे की, मराठी चित्रपट कोणता आलाय, कोणता येणार आहे, हेदेखील आपल्या मराठीजनांना फारसे माहिती नसते. असो. पण, या चित्रपटाने पुन्हा एकदा मराठी शाळांचा विषय ऐरणीवर आणला. महाराष्ट्रात आहात तर मराठी बोला वगैरे वाक्य आपण राजकीय नेत्यांच्या तोंडून ऐकतो. ते त्यांच्या परीने राजकारण करत असतीलही. एक मात्र खरे की महाराष्ट्रात असताना किमान मूळ मराठी लोकांनी तरी मराठीत बोलले पाहिजे. सर्वांत मोठा भ्रम म्हणजे, भाषेचा संबंध आपण आत्मविश्वासाशी आणि पर्यायाने प्रगतीशी जोडतो. लहानपणापासून कॉन्व्हेंटमध्ये शिकणाऱ्या मुलांचा आत्मविश्वास नव्हे 'कॉन्फिडन्स' फारच चांगला असतो आणि त्या तुलनेत मराठी माध्यमात शिकलेली मुले नंतरच्या जीवनात उघडी पडतात. 'क्रांतिज्योती'ने या समजाचाही ऊहापोह केला. प्राथमिक शिक्षण मराठीत घेतलेले अनेक जण आज विदेशात सक्षमपणे काम करताहेत. त्यांना संवाद प्रक्रियेत कोणतीही अडचण येत नाही. याचाच अर्थ, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून घेतल्याने आत्मविश्वास कमी होतो, ही बाब तितकीशी जोरकस नाही. जे लोक असा दावा करत असतील त्यांनी मराठी नाही तर किमान एकच दक्षिणेतील उदाहरण पाहावे (कारण आपल्याला दुसऱ्याचं उदाहरण जास्त लवकर पटतं) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी मातृभाषेतूनच प्राथमिक शिक्षण घेतले होते आणि ते कायम मातृभाषेतून शिक्षण घेण्याचा पुरस्कार करायचे. ते आग्रहपूर्वक म्हणायचे, मुलांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे.



एवढे सगळे असूनही आपण मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणासाठी आजही कचरतो. एवढेच कशाला, जे नेते मराठीच्या मुद्द्यावरून राजकारण करतात त्यांची मुले केंद्रीय बोर्डाच्या मोठमोठाल्या इंग्रजी माध्यम शाळेत शिकतात. हा विरोधाभास कुठेतरी समाजाला बुचकाळ्यात टाकतो. पण, इथे एकच मुद्दा लक्षात ठेवावा की, मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण कधीही नुकसान करत नाही. कारण आजकाल बालक मंदिरापासूनच इंग्रजी भाषा देखील शिकवली जाते. पूर्वी इंग्रजी भाषा पाचव्या वर्गापासून शिकवली जायची. त्यामुळे मराठी माध्यमात शिकल्याने इंग्रजीचा गंधच राहणार नाही, असे म्हणण्याला वावच नाही. त्यातही आता राज्य सरकारने आपली मुले पुढील स्पर्धा परीक्षेत मागे पडू नये म्हणून सीबीएसईच्या धर्तीवर राज्यातील शिक्षण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे स्टेट बोर्डात टाकले तर आपले मूल मागे पडेल, ही धास्ती उरण्याचीही गरज नाही. दुसरा सगळ्यात मोठा मुद्दा खर्चाचा. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये असणारे भरमसाट शुल्क आणि मराठी शाळांचे शुल्क पाहिले तर कितीतरी कमी खर्चात आपला मुलगा दहाव्या वर्गापर्यंत शिकू शकतो. याउलट, इंग्रजी माध्यमात मोठे शुल्क अगदी पहिल्या वर्गापासून सुरू होते आणि दरवर्षी त्यात वाढ होत जाते. म्हणजे आठ ते दहा लाख रुपये खर्च करून काय शिकला तर दहावी पास झाला! मग या बाबतीत लोक भावनिक मुद्दा आणतात की, आम्ही मुलांच्या शिक्षणासाठी खर्चात तडजोड का करायची? तडजोड करूच नका. उलट, उरलेला पैसा त्याला एखादा क्रीडा प्रकार शिकवण्यासाठी किंवा कला आत्मसात करण्यासाठी खर्च करा. त्याने त्याचा व्यक्तिमत्त्व विकास होईल. शेवटी एवढेच म्हणायचे आहे की, दक्षिणेकडील नेता स्टॅलिन जसा आपल्या भाषेचा आग्रह धरतो तसा नाही पण किमान आपली मराठी येणाऱ्या प्रत्येक पिढीत योग्य रीतीने संक्रमित होईल, एवढे तरी तिचे अस्तित्व आपण टिकवले पाहिजे. कारण आपल्याला भाषेचे राजकारण करायचे नाही तर भाषा जगवायची आहे, समृद्ध करायचीय...

७७५५९३८८२२

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# दुःखाच्या राखेतून राजकारण!

अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने राज्याच्या राजकारणासह सर्वसामान्य जनतेलाही मोठा धक्का बसला असताना, या दुःखाच्या क्षणातही काही ठिकाणी राजकीय आरोप-प्रत्यारोपांची ठिणगी पेटताना दिसत आहे. शोक व्यक्त करण्याची, कुटुंबीयांच्या वेदनेत सहभागी होण्याची आणि अजितदादांची त्यांच्या कार्याची आठवण करण्याची वेळ असताना, या दुर्दैवी घटनेभोवती राजकारणाचा रंग चढवण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. एखाद्या नेत्याच्या निधनानंतर समाजाने संवेदनशीलता आणि संयम दाखवणे अपेक्षित असते. मात्र दुःखाच्या राखेतूनही राजकीय स्वार्थाचे गणित मांडले जाणे अत्यंत असंवेदनशीलच म्हणावे लागेल. मग अशा वेळी माणुसकी मोठी की राजकारण, हा मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा समाजासमोर उभा ठाकला जातो.

या दुर्दैवी घटनेचे कव्हरेज करताना प्रसार माध्यमांनी पुड्या सोडून आपला घाणेरडेपणा सिद्ध केला. आता इतकी धक्कादायक आणि मोठी घटना घडलेली असताना, अजितदादांनंतर त्यांच्या पक्षाचं काय? अध्यक्ष कोण होणार?, उपमुख्यमंत्री कोण होणार? मग त्यांच्या पत्नीला करणार, मुलाला समोर आणार, दोन्ही पक्ष एक होऊन पुन्हा शरद पवारांचे नेतृत्व स्वीकारणार असे अनेक पद्धतीने अकलेचे तारे तोडताना माध्यमे दिसली. परिवार आणि चाहते जेव्हा आपल्या लाडक्या नेत्याला पाणावलेल्या डोळ्यांनी अखेरचा निरोप देत होते तेव्हा हा सगळा किळसवाणा प्रकार चालला होता. खरं तर या दुःखातून सावरल्यानंतर पक्षस्तरावर काय तो निर्णय घेतला जाईलच. मोठे दिग्गज अनुभवी राजकारणी दादांच्या पक्षात आहेत, त्यांना कळतं काय करायचं आणि नाही ते. माध्यमांना कसली घाई येऊन पडली एवढी. कुठलीही अनपेक्षित घटना घडलेली असताना लगेच सगळं काही होत नसतं. अशा मोठ्या धक्क्यातून सावरायला जरा वेळ लागतो.

आता माध्यमच कशाला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि उबाठा नेते खासदार संजय राऊतसारखे विवेकशून्य राजकारणी तर यातही राजकारण करू पाहत होते. कट कारस्थान, षडयंत्राच्या चर्चा करताना ते दिसले. खरे तर शरद पवारांनी स्वतः समोर येऊन सांगितले की, या अपघाताचे कोणी राजकारण करू नका म्हणून. तरीदेखील या दुर्दैवी आणि धक्कादायक अपघाताचे राजकारण करायला हे लोक विसरले नाहीत. यालाच मृताच्या टाळूवरचं लोणी खाणं असं म्हणत असावं कदाचित.

अपघात कुठलाही होवो, त्याचा तपास हा यंत्रणा करतच असतात. तो सुरूदेखील झाला आहे. राज्याची पोलिस यंत्रणा आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) तपास करत आहेत. मुळात इतकी धक्कादायक घटना घडल्यानंतर या प्राथमिक गोष्टी तर शासन, प्रशासन आणि तपास यंत्रणा तातडीणे करतातच. अर्थात त्या कराव्याच लागतात. त्यात नवं असं काही नाही. अपघाताच्या चौकशीला वेळ लागतो, तांत्रिक बाबींची पडताळणी होते, अधिकृत अहवाल येतो. ही एक सुसूत्र प्रक्रिया असते. मात्र, त्या प्रक्रियेला धक्का देत 'कोण जबाबदार?', 'कट होता का?' अशा प्रश्नांची उचल पटकन केली जाते, तेव्हा ते शोकाकुल वातावरणात अधिक गोंधळ निर्माण करणारं ठरतं. आणि मुळात सर्व यंत्रणा सरकारच्या दावणीला बांधल्या असल्याचा आरोप हेच लोक करतात. मग पुन्हा त्याच यंत्रणांकडून तपास करण्याचा आग्रह धरतात. हा दुटप्पीपणा लक्षात येण्याजोगा आहे. दोन्ही तबल्यावर हात मारण्याचा हा प्रकार आहे. यांना अजितदादांच्या अपघाती मृत्यूचं काहीही एक देणंघेणं नसून, केवळ त्याचंही राजकीय भांडवल करायचं आहे. नव्हे यातून स्वतःचा राजकीय स्वार्थ साधायचा आहे. आणि यांचा हा घाणेरडा हेतू या कृतीतून उघडा पडला, हे मात्र निश्चित.

अजित पवारांसारख्या नेत्याने राज्याच्या राजकारणात अनेक दशकं घालवली. त्यांच्या कार्यपद्धतीवर मतभेद असू शकतात. राजकीय भूमिका वेगवेगळ्या असू शकतात, पण त्यांच्या अचानक जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघू शकत नाही. अशा वेळी त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होणे हे अधिक आवश्यक ठरते. अकस्मात घडलेली एखादी दुर्घटना केवळ जीवितहानी घडवत नाही, तर ती समाजाच्या संवेदनशीलतेची, माध्यमांच्या जबाबदारीची आणि राजकारण्यांच्या परिपक्वतेचीही कसोटी पाहते. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठं नाव असलेल्या अजित पवारांच्या अकाली अपघाती निधनाने राज्यभर शोककळा पसरली आहे. एखाद्या नेत्याचा मृत्यू हा केवळ एका पक्षाचा किंवा विचारसरणीचा विषय नसतो. तो त्या व्यक्तीच्या कुटुंबाचा, सहकाऱ्यांचा आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या लाखो लोकांच्या भावनांचा विषय असतो. अशा वेळी राजकीय नेत्यांनी, समाजाने आणि विशेषतः माध्यमांनी संयम बाळगणे अपेक्षित असते. परंतु, या अपघातानंतर काही ठिकाणी दिसलेली घाई, अर्धवट माहितीवर आधारित चर्चा आणि संवेदनशीलतेचा अभाव अस्वस्थ करणारा ठरला.

सार्वजनिक जीवनातील प्रभावी व्यक्तींनी अशा प्रसंगी अधिक संयमाने बोलणे अपेक्षित असते. कारण त्यांचे शब्द केवळ त्यांचे मत नसते, तर ते समाजात प्रतिध्वनी निर्माण करतात. दुर्घटनेच्या क्षणी संशयाची बीजे पेरणे किंवा राजकीय भूमिका अधोरेखित करण्याचा प्रयत्न करणे, हे दुःख अधिक खोल करणारे ठरते आणि नुकतीच घटना घडलेली असताना किंवा एखाद्या घटनेचा तपास सुरू असताना, त्याला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न झाल्यास, गैरसमजातून उद्रेक होण्याची शक्यता असते. त्यातून सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी किमान संवेदनशीलता दाखवत राजकीय व्यक्ती तसेच माध्यमांनी काही आचारसंहिता पाळली पाहिजे.

दुर्दैवाने, आजच्या डिजिटल युगात बातम्या वेगाने पसरतात, पण त्यासोबतच अपूर्ण माहिती आणि अफवाही तितक्याच वेगाने पसरतात. सोशल मीडियावरील चर्चा, व्हिडीओ क्लिप्स, अप्रमाणित दावे या सगळ्यांमुळे वास्तव आणि अफवा यांच्यातील रेषा धूसर होते. अशा वेळी जबाबदार नागरिक म्हणून आपण सर्वांनी संयम बाळगणे आवश्यक आहे. प्रत्येक गोष्ट तात्काळ समजून घेण्याची घाई आपल्याला चुकीच्या निष्कर्षांकडे घेऊन जाऊ शकते.

राजकारण हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे, पण प्रत्येक प्रसंग राजकारणासाठी नसतो. काही क्षण असे असतात, जेथे माणुसकी राजकारणापेक्षा मोठी असते. एखाद्या नेत्याच्या मृत्यूभोवती निर्माण होणाऱ्या भावना या पक्षीय सीमांपलीकडे जातात. त्या वेदनेला शब्द देताना, आरोपांच्या ज्वाळा पेटवणे योग्य नाही. या दुर्घटनेने आपल्याला एक धडा दिला आहे. संवेदनशीलता ही केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतून दिसली पाहिजे. माध्यमांनी संयम बाळगावा, राजकारण्यांनी परिपक्वता दाखवावी आणि समाजाने अफवांपासून दूर राहावे. तपास यंत्रणांना त्यांचे काम करू द्यावे, कारण सत्य उशिरा का होईना, समोर येतेच. अजित पवारांच्या अकाली निधनाने राज्याला मोठा धक्का बसला आहे. या धक्क्यातून सावरण्यास वेळ लागेल. अशा वेळी दुःखाच्या राखेतून राजकारण करण्यापेक्षा, दुःखात सहभागी होणे, अधिक योग्य ठरेल. कारण शेवटी, राजकारण हे क्षणभंगुर असते, पण माणुसकी कायम राहते.

९२७०३३३८८६

## चांगल्या कर्माची शुभ प्राप्ती

''करम किए जा, फल की इच्छा मत कर, ए इन्सान, जैसा करम करेगा वैसा फल देगा भगवान'' हे सर्व धर्म शास्त्रात नमूद आहे. चांगले कर्म करणाऱ्याला चांगलेच फळ मिळते, त्यांच्या जीवनात व परिवारात सदैव सुख, शांती, समाधान व समृद्धी नांदत असते. सत्कर्म करणाऱ्या व्यक्तीविषयी जगातील कोणीही वाईट चिंतिले किंवा कोणीही त्याच्या वाईटसाठी विघातक व अघोरी मार्ग अवलंबून त्या सत्कर्मीचे आयुष्य विस्कळीत करून बिघडविण्याचा प्रयत्न केला तरी सत्कर्म करणाऱ्या व्यक्तीचे आयुष्य बिघडत नाही.

उलट जे कोणी विघातक व अघोरी मार्ग स्वीकारून सत्कर्म करणाऱ्यांच्या मार्गात अडथळे आणतो त्यांचेच जीवन उद्ध्वस्त होते. सत्कर्म किंवा सर्वांचे शुभ चिंतन करणारी व्यक्ती आपल्या शुभ व सकारात्मक कार्य व विचाराने अधिक सुखी, समाधानी व आनंदी जीवन जगत असते. अशा व्यक्तीसमोर सदैव सर्वांचे शुभ चिंतन असते. शुभ चिंतन मनांना सुख, शांती, प्रसन्नता, आनंद, समाधान प्रदान करते. मात्र अशुभ चिंतणारा किंवा वाईट चिंतन करणारा स्वतः तर दुःखी असतो परंतु आपल्या परिवारालाही दुःखाच्या खाईत ढकलत असतो. म्हणून असे म्हटले जाते की, व्यक्तीचे कर्म व कर्तव्य चांगले, शुभ, निकोप, निर्मळ असल्यास समाजातील कोणीही अशा व्यक्तीचे आयुष्य किंवा जीवन बिघडवू शकत नाही. चांगल्या कर्माचे फळ चांगलेच मिळते तर वाईट कर्माचे फळ वाईटच मिळते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## वाट बघण्यात आयुष्य कशाला संपवायचे?

जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी परिस्थितीला जबाबदार न धरता आपली मनःस्थिती बदलली तरच मार्ग सापडतो हेच भगवान श्रीकृष्ण गीतेतून आवर्जून सांगतात. एखादी गोष्ट मनासारखी घडली नाही की माझा योगच नाही असे म्हणून पळवाटा शोधण्यापेक्षा त्यासाठी प्रयत्नशील असावे म्हणजेच आपले कर्म करीत राहिले तर योग्य आपोआप घडून येते. साधे उदाहरण घेतले तर जंगलात पायवाट नसतेच पण आपण सातत्याने तिथून चालत गेलो तर आपोआप वाट तयार होतेच. कोणत्याही बाबतीत प्रतीक्षेत आयुष्य संपविण्यापेक्षा सत्कर्माचे आचरण केले तर परमेश्वराने दिलेले सुंदर आयुष्य नक्कीच सत्कारणी व यशस्वी ठरते. सध्याच्या घडीला यासाठीच भगवद्गीतेचा अभ्यास करून नवीन पिढीने आपले जीवन समृद्ध करावे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

## मरावे परी कीर्ती रूपे उरावे

राजकारण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. मात्र आजच्या काळात राजकीय जीवनाकडे पाहताना सत्ता, स्वार्थ हे शब्द अधिक ठळकपणे समोर येतात. अशा परिस्थितीत मरावे परी कीर्ती रूपे उरावे ही उक्ती राजकीय क्षेत्राला आरसा दाखवणारी ठरते. राजकारणी व्यक्तीचे आयुष्य केवळ निवडणुका जिंकण्यापुरते मर्यादित नसते; त्याच्या निर्णयांचा, धोरणांचा आणि वर्तनाचा थेट परिणाम सामान्य जनतेच्या जीवनावर होत असतो. म्हणूनच राजकीय जीवनातील कीर्ती ही जाहिरातीतून नव्हे, तर लोकांच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासातून उभी राहते. इतिहास साक्षी आहे की सत्तेत असूनही अनेक नेते विस्मरणात गेले, तर सत्तेशिवायही काही नेते अजरामर झाले. कारण त्यांनी राजकारणाला सेवा मानले, साधन नव्हे. त्यांचे देह गेले, पण त्यांचे विचार, त्यांची तत्त्वनिष्ठा आणि लोकांसाठी दिलेले योगदान आजही जिवंत आहे. आज मात्र राजकीय जीवनात उलट चित्र दिसते. क्षणिक लोकप्रियतेसाठी घोषणाबाजी, विरोधकांची बदनामी, जातिधर्माचे राजकारण आणि सत्तेसाठी मूल्यांची तडजोड केली जाते. अशा राजकारणातून मिळणारी प्रसिद्धी ही कीर्ती नसून ती तात्पुरती चमक असते जी काळाच्या ओघात मावळते. खरी राजकीय कीर्ती ही निवडणूक निकालात नव्हे, तर लोकांच्या दुःखात उभे राहण्यात, न्यायासाठी घेतलेल्या धाडसी भूमिकेत, सत्तेत असूनही साधेपणा जपण्यात आणि सत्तेबाहेर असतानाही संघर्ष सुरू ठेवण्यात असते. जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारा नेता, प्रलोभनांना नकार देणारा प्रतिनिधी, आणि चुकीच्या निर्णयांबद्दल जबाबदारी स्वीकारणारा राजकारणी असे व्यक्तिमत्त्व मृत्यूनंतरही सन्मानाने आठवले जाते. कारण त्यांनी स्वतःचे आयुष्य मोठे करण्यापेक्षा लोकांचे आयुष्य सुलभ करण्याला प्राधान्य दिलेले असते. म्हणूनच राजकीय जीवनात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाने एकच प्रश्न स्वतःला विचारायला हवा की, मी सत्तेसाठी जगतो आहे, की समाजासाठी? कारण सत्ता क्षणभंगुर असते; पण जनतेच्या मनात निर्माण झालेली कीर्ती काळाच्या पलीकडे जाते. आणि तेव्हाच राजकारणाला खरा अर्थ प्राप्त होतो. नेता देहाने जातो, पण त्याचे कार्य आणि मूल्ये जिवंत राहतात. 'मरावे परी कीर्ती रूपे उरावे' ही केवळ उक्ती नसून, राजकीय जीवनासाठीची खरी कसोटी आहे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# निशब्द झाली..सोलापूर जिल्हा परिषद

## अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या डोळ्यात अश्रू; उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज स्वर्गीय स्व.अजितदादा पवार श्रध्दांजली वाहताना अधिकारी व कर्मचारी निःशब्द झाले. अनेकांचे डोळ्यात अश्रू तरळले.

जिल्हा परिषदेत आज हुतात्मा दिन व स्वर्गीय स्व. अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहणेसाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. अधिकारी, कर्मचारी यांच्या डोळ्यात अश्रू आणि हळहळ भावना व्यक्त करित निशब्द सभागृहात स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रारंभी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेला सीईओ कुलदिप जंगम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून श्रध्दांजली वाहण्यात आली. सभागृहात दोन मिनीटे स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहिली.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, बांधकाम कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, बांधकाम कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, अतिरिक्त मुख्य लेखा व वित्त अधिकारी शशीकिरण उबाळे, योजना शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, अधिक्षक गिरीष जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले.



## महत्वाचे...



### एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये प्रजासत्ताक दिन

**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मोरवंची सोलापूर येथील 'प्रार्थना फाऊंडेशन'चे संस्थापक प्रसाद मोहिते तर अध्यक्षस्थानी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपालकृष्ण जोशी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे आणि प्रा. गोपालकृष्ण जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा पाटील व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन करून, देशभक्तिपर गीत, नृत्य आणि विविध सादरीकरण केले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपालकृष्ण जोशी यांनी अध्यक्षीय भाषण केले. सूत्रसंचालन समृद्धी नल्ला व कार्तिकेय पाठक यांनी केले तर आभार प्रचिती काळे हिने मानले.

### मोफत कृत्रिम हात बसवण्याचे शिबिर उद्या सोलापुरात

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

शारीरिक उणीवेवर मात करून जिद्दीने जगू पाहणाऱ्या अनेक बांधवांसाठी एक आशेचा नवा किरण सोलापुरात घेऊन येत आहेत. जैन सोशल ग्रुपच्या वतीने दिव्यांगासाठी मोफत इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात बसवण्याचे शिबिर रविवार १ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता सम्राट चौक येथील तेरा पंथ भवनमध्ये होणार असल्याचे प्रोजेक्ट इन्चार्ज परिमल भंडारी यांनी सांगितले. दिव्यांग व्यक्तीने नावनोंदणीसाठी येताना आपले आधार कार्ड, मोबाईल नंबर, हाताचा फोटो जिथून हात नसलेला आहे तिथून व्यवस्थित फोटो काढून आणावा. आणि या शिबिरात भाग घेऊन आपले हात सुरक्षित करावेत, असे आवाहन भंडारी यांनी केले आहे. या शिबिराचे उद्घाटन महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे हे करणार आहेत. या कार्यक्रमाला चेतन पदमचंद सुराणा यांचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष चेतन सुराणा, सचिव महेश नळे, भव्या शाह, विनोद सेठिया, गौतम छाजेड, उमेश कर्णावत, राजेश निमानी आदी पदाधिकारी प्रयत्न करीत आहेत.

## १ कोटीची फसवणूक करणाऱ्या आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

नीट परीक्षेत पास करण्यासाठी १ कोटी रूपयाची फसवणूक करणाऱ्या आरोपीचा अटकपूर्व जामीनाचा अर्ज फेटाळला आहे.

या संदर्भात हकीकत अशी आरोपीने फिर्यादीस नीट परीक्षा व्यवस्थापित करण्याचे आणि सदर परीक्षेत फिर्यादीचे मुलास ६०० पेक्षा जास्त गुण मिळतील, असे खोटे आश्वासन देवून, त्यांचेकडून वेळोवेळी एकूण रक्कम रू. एक कोटी दहार लाख रुपये घेतलेले होते. तथापि, सदर नीटच्या दोन परीक्षानंतर फिर्यादीच्या मुलाला आरोपीने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे गुण मिळाले नसल्याने, फिर्यादीने आरोपीस वरील रकमेची मागणी केली असता, त्याने केवळ त्यांस १० लाख रुपये परत केले होते. आरोपीने उर्वरित रक्कम परत करण्यास टाळाटाळ करून, त्याद्वारे फिर्यादीची आर्थिक फसवणूक केलेली होती. त्यामुळे, फिर्यादीने १० डिसेंबर २०२५ रोजी आरोपीविरूध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. हा गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी हा फरार असून, त्यादरम्यान त्याने त्याला अटकपूर्व जामीन मिळावा म्हणून न्यायालयामध्ये जामीनाचा अर्ज दाखल केला होता. या जामीन अर्जास जिल्हा सरकारी वकिल डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांनी तीव्र विरोध नोंदवून, असा युक्तीवाद केला की, गुन्ह्याचे स्वरूप गंभीर असून, आरोपी हा अद्याप फरार आहे व गुन्हयाचा तपास सुरू आहे. पुढे असा युक्तीवाद केला की, या व्यवहारातील उर्वरित रक्कम एक कोटी रूपये अद्याप वसूल झालेली नसून, त्यासाठी आरोपीची पोलीस कोठडीची आवश्यकता आहे. जर आरोपी जामिनावर सुटला तर फिर्यादीचे पुराव्यांशी छेडछाड करण्याची, तो फरार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर होणेबाबत विनंती केली. अभियोग पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ग्राहय धरून, एस.व्ही. केंद्रे, तदर्थ अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला. या प्रकरणात जिल्हा सरकारी वकिल डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांनी सरकार पक्षातर्फे काम पाहिले, तर आरोपीतर्फे ॲड. आर. के. सिंग यांनी काम पाहिले.



## चित्ररथातून आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्याचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी -**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सोलापूर, मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित स्प्रिंट फॉर सी.ई. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रतिसाद प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस मुख्यालय येथे आयोजित संचलनात आकर्षक चित्ररथाच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले.

यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी महाराष्ट्रात दुसरी तयार केलेली आपदासखी व आपदामित्रांच्या समवेत बचाव बोट व आपत्ती व्यवस्थापन कार्याचे प्रभावी पथसंचलन सादर करून सर्वांचे लक्ष वेधले. तर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनच्या चित्ररथातून प्रजनन आरोग्य व आरोग्य सेवांचे कार्य जनतेसमोर मांडण्यात आले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल अमिता धानू, स्प्रिंट प्रोजेक्ट मॅनेजर डॉ. अमित किटुकले यांचे चित्ररथ प्रदर्शना साठी मार्गदर्शन लाभले. यावेळी एफपीएआय शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन तथा सोलापूर शाखेचे सदस्य डॉ.राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, युवा प्रतिनिधी ऐश्वर्या सावंत व साक्षी सर्वगोड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक उपस्थित होते.

### लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापुर

१२८, मुरारजी पेठ, सेवासदन प्रशाळेजवळ, सोलापुर-४१३००१
फोनं. ०२१७ २७३५५०३/फॅक्स नं. २७३५५६६ ई-मेल recovery@lokmangal.bank.in

**नमुना झेड**

(नियम १०७ पोटनियम (११) (ड)-१)- २ पहा)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्याअर्थी खाली सही केलेल्या वसुलीअधिकारी व्दारा लोकमंगल को ऑप बँक लि., सोलापुर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये खालील नमुद यादीतील ऋणको (थकबाकीदार) यांना थकबाकी मागणी नोटीस खालील नमुद दिनांकास ऋणको यांना देवुन सदरचे नोटीसी मध्ये नमुद रक्कम सदर नोटीस मिळल्याच्या दिनांका पासुन ऋणको यांने रक्कम जमा करण्यास कसुर केले आहे. त्याअर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमुद यादीतील ऋणको यांना खालील नमुद दिनांकास स्थावर मिळकत जप्तीची नोटीस देऊन पुढे निर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणको ने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला आणि सर्व नागरीकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण याने त्याला महाराष्ट्र सहकरी संस्था निमय १०७ (११) (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा खालील नमुद दिनांकास घेतला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना या व्दारे सावध करण्यात येते की, खाली नमुद केलेल्या यादीतील मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास लोकमंगल को-ऑप बँक लि. सोलापुर या संस्थेच्या खाली नमुद केलेल्या बोज्याची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यातील इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी

| अ. क्र. | वसुली दाखला क्र. दिनांक | मिळकत.क्र/क्षेत्र/आकार/चौ.मि. | थकबाकीदाराचे नांव | मागणी नोटीस आदेश दिनांक | प्रतिकात्मक ताबा घेतलेली तारीख | दिनांक. २४/०९ /२०२६ आखेर एकुण येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१/८१२/ २०२३-२४ दि.२४/०५/२०२४ | मौजे मैंदर्गी, ता. अक्कलकोट जि. सोलापूर **१) गट नं-४४९, क्षेत्र. ४.५०.०० हे.आर, आकार १०१९** | मरगु पोतप्पा पुजारी | २४/०८/२०२४ | १५/०१/२०२६ | **रू. १४,४९,२२५/- अधिक व्याज** |
| | | मौजे कुंभेज ता. माढा, जि. सोलापूर **१) गट नं-३२०/१, क्षेत्र. ३.२६.००. हे.आर, आकार** ८.०५<br>**२) गट नं-३१४, क्षेत्र. १.६७.००. हे.आर, आकार** ०.०० | अंकुश गेनदेव नागटिळक | | | |
| २ | १०१/४४८/ २०२२-२३ दि.१७/०१/२०२२ | मौजे तडवळ, ता. अक्कलकोट जि. सोलापूर **१) गट नं २३७/१, क्षेत्र.०.९८.०० हे.आर, आकार** २.०९ | रमाबाई रामचंद्र बनसोडे | १२/०१/२०२३ | १५/०१/२०२६ | **रू. ०७,४०,३००/- अधिक व्याज** |
| | | मौजे तडवळ, ता. अक्कलकोट जि. सोलापूर<br>**१) गट नं-१३९/१/ब, क्षेत्र.१.२०.०० हे.आर, आकार** १.५० | चराटे चनगोडा शरणप्पा | | | |
| | | मौजे. तडवळ, ता. अक्कलकोट जि. सोलापूर **१) मिळकत क्र -२६२/१, क्षेत्र.०.८१.००. चौ.फु, आकार १.२३** | गायकवाड मल्लिकार्जुन तुकाराम | | | |
| ३ | १०१/६४३ /२०२५-२६ दि.३१/०१/२०२५ | मौजे भूम, ता. भूम, जि धाराशिव **१) मिळकत क-अ/१९, क्षेत्र ३८६७.००.चौ. फु., आकार** ०.००<br>२) मौजे. जांब, ता. भूम. जि धाराशिव<br>**गट नं. ३०७, क्षेत्र.१.६४.००. हे. आर, आकार** २.०७<br>३) मौजे. जांब, ता. भूम. जि धाराशिव<br>**गट नं. ८२. क्षेत्र.१.२१.०० हे.आर, आकार** ०.९२.<br>४) मौजे. जांब, ता. भूम. जि. धाराशिव<br>**गट नं. २४०, क्षेत्र.०.३६.००.हे. आर, आकार** १.३३<br>५) मौजे जांब, ता. भूम. जि. धाराशिव<br>**गट नं.२९८, क्षेत्र.०.०१.०० हे. आर, आकार** ०.०१<br>६) मौजे. जांब, ता. भूम. जि. धाराशिव<br>**गट नं. ४४७, क्षेत्र. ०.५९.००. हे. आर, आकार** २.१२ | विनोद वामनराव जोगदंड | ०५/०२/२०२५ | २१/०१/२०२६ | **रू. ६७,०८,५००/- अधिक व्याज** |
| | | १) मौजे भूम, ता. भूम जि. धाराशिव<br>**मिळकत क्र-अ/१९, क्षेत्र ३८६७.०० चौ.फु, आकार** ०.००<br>२) मौजे जांब, ता.भूम, जि.धाराशिव<br>**गट नं ३०७, क्षेत्र १. ६३.०० हे.आर, आकार २.०६.**<br>३) मौजे. जांब, ता.भूम. जि. धाराशिव<br>**गट नं ८२, क्षेत्र.१.२१.००.हे. आर, आकार ०.९२.**<br>४) मौजे जांब, ता. भूम. वि धाराशिव<br>**गट नं २४०, क्षेत्र. ०.३६ ००. हे. आर, आकार १.३३**<br>५) मौजे. जांब, ता.भूम. जि.धाराशिव.<br>**गट नं-४४७, क्षेत्र.०.५९.००. हे. आर, आकार २.१२.** | रामभाऊ वामनराव जोगदंड | | | |

**स्थळ - सोलापुर**
**दिनांक. २२/०१/२०२६**

मोहर

**सही/- वसुली अधिकारी**
लोकमंगल को-ऑप बँक लि. सोलापूर
(म.सह. संख्या अधिनियम १९६० कलम १५६ अन्वये अधिकार प्रदानित)
व्दारा लोकमंगल को.ऑप. बँक लि. सोलापर

### KATARE SPINNING MILLS LIMITED

REGD. OFFICE: 14/30 GROUND FLOOR, B WING, KATARE COMPLEX, GANDHINAGAR, BL. NO. 10 Solapur MH- 413006.
CIN: L17119PN1980PLC022962
Email: katarespinningmills@gmail.com

**NOTICE**

In pursuant to Regulation 29 read with Regulation 33 and other applicable regulations of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Friday, 06th February, 2026 at 04.00 P.M. at the registered office of the Company to, inter alia, consider and approve the un-audited financial results of the Company for the quarter and Nine Months ended on 31st December, 2025.

A copy of this notice is also posted on the website of the Company www.katarespinningmillslimited.comand also on the website of the stock exchange at www.bseindia.com.

**Place: Solapur**
**Date: 30.01.2026**

**FOR KATARE SPINNING MILLS LIMITED**
**SD/-**
**KISHORE KATARE**
**MANAGING DIRECTOR**
**(DIN- 00645013)**

WE'LL BE MOVING OUR OFFICE TO THE NEW ADDRESS SHORTLY

From
83/A & 83/A-2, Ground Floor, Shop No.2, Railway Lines, Near Naval Petrol Pump, Solapur – 413 001.

To
**Cholamandalam MS General Insurance Company Limited,** Office No. 301 & 302, Third Floor, City Center Tower, VIP Road, Solapur, Maharashtra – 413 001

Chola MS GENERAL INSURANCE

**Cholamandalam MS General Insurance Company Limited,**
No.2, Dare House, 2nd Floor, NSC Bose Road, Parrys, Chennai – 600 001.
Customer Care No.: 1800 208 55 44/91 00
IRDAI Reg No. 123; CIN: U66030TN2001PLC047977

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महाराष्ट्राने पॉंडिचेरीचा डाव १८० धावांत रोखला

- आकाश पुगाझाणथी ५७ धावा
- वैभव दारकुंडे ४ बळी

▸ बीसीसीआयच्या २३ वर्षाखालील कर्नल सी. के. नायडू क्रिकेट :
▸ महाराष्ट्र १ बाद १८


आकाश पुगाझाणथी


वैभव दारकुंडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**
बीसीसीआयच्या २३ वर्षाखालील मुलांच्या कर्नल सी.के. नायडू ४ दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील क गटाचा पाचव्या फेरीतील महाराष्ट्राचा सामना सोलापुरातील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर पॉंडिचेरी विरुद्ध सुरू झाला व पहिल्या दिवसाला खेळ थांबला तेव्हा महाराष्ट्राने पॉंडेचरीच्या पहिल्या डावातील १८० धावांच्या मोबदल्यात १ गडी गमावून १८ धावा केल्या आहेत.

पाहुण्या पॉंडेचरी संघाने सकाळी प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. परंतु महाराष्ट्राच्या वैभव दारकुंडे व अजय बोरुडे या गोलंदाजांनी त्यांचा निर्णय चुकीचा ठरवत ५ बाद ५० अशी अवस्था केली. वैयक्तिक दुसरे तर संघाकडून चौथे षटक टाकताना अजय बोरुडेने यष्टीरक्षक फलंदाज प्रवीण (३) याला तर वैभवने कार्थीराजा (९) याला झेलबाद करत सलामीची जोडी माघारी धाडली. पुढच्याच षटकात पुन्हा अजय बोरुडे याने नमन शर्मा याला शून्यावर त्रिफळा बाद केले. तिथून पुढे प्रीथ्वी राजन खन्ना याने अनिश विशागन सोबत २७ धावा जोडल्या. पण वैभवने प्रीथ्वी (२०) याला यष्टीरक्षकाकडे झेल देण्यास भाग पाडले आणि जमलेली जोडी फोडली. त्यानंतर आलेला साई हरीराम (५) याला शुभम मेड याने फिरकीच्या जाळ्यात पकडत पायचीत बाद केले तेंव्हा २४ वे षटकात ५ बाद ५० अशी अवस्था पॉंडिचेरी ची झालेली. जेवणाचे वेळ पर्यंत पुढील ११ षटके खेळून काढत अनिश आणि आकाश यांनी धावसंख्या हलती ठेवली. (५ बाद ६४, ३५ षटके).

दुसऱ्या सत्राच्या खेळात अनिश (२३) ने आकाश सोबत ४० धावांची भागीदारी रचली, पण अजय बोरुडे ने त्याला यष्टिरक्षक करवी झेलबाद केले. नंतर आलेला कर्णधार नितीन प्रणव जास्त वेळ टिकू शकला नाही, त्याला अभिषेक निषद याने केवळ ३ धावांवर कर्णधार सचिन धसकडे झेल देण्यास भाग पाडले. त्यानंतर आलेल्या समर खानने मात्र आकाश सोबत संथ पण संयमी फलंदाजी केली. आकाश पुगाझाणथीने ८० चेंडूत ४ चौकार, २ षटकार लगावत स्वतचे अर्धशतक पूर्ण केले. ५७ धावांवर असताना त्याने शुभम मेड ला एक सुंदर उंच फटका मारला पण किरण चोरमलेने तितकाच अप्रतिम झेल घेत बाद केले. तिथून पुढे समर खानने (नाबाद १२) शिशिर सोबत २० धावांची भागीदारी रचली. चहापानाला २ मिनिटे शिल्लक असताना समर २८ धावांवर वैभव दारकुंडेचे गोलंदाजीवर यष्टिरक्षककरवी झेल बाद झाला आणि पंचांनी चहापान पुढे ढकलले. शेवटचा फलंदाज किशन यादव याने मग एकदम शांत फलंदाजी करत ९ बाद १६६ अशी धावसंख्या केली. तिसऱ्या सत्राच्या खेळात १० षटके एकदम संथ फलंदाजी करत असताना वैभव दारकुंडेने सलग दुसऱ्या सामन्यात चौथा बळी घेत किशन (१५) याला त्रिफळा बाद केले आणि पॉंडिचेरीचा पहिला डाव १८० धावांवर संपुष्टात आला. अजय बोरुडे ४२/३, शुभम मेड १६/२ व अभिषेक निषद याने एक बळी मिळवले. १० मिनिटाच्या अंतरानंतर महाराष्ट्राचा पहिला डाव सुरू झाला, पण तिसऱ्याच षटकात नमन शर्मा याने झटका देत अनिरुद्ध साबळे (४)याला प्रीथ्वी खन्ना कडे झेल देण्यास भाग पाडले. पहिल्या दिवसाचा खेळ संपताना सलामीच्या हर्ष मोगावीरा (८) सोबत कर्णधार सचिन धस (४) खेळपट्टीवर नाबाद आहेत. पॉंडिचेरी संघाकडे अद्यापि १६२ धावांची आघाडी असून उद्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र संघ ती आघाडी पार करून मागील सामन्याप्रमाणे किती जास्तीच्या धावा करेल हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

# भारतीय क्रिकेटपटूंनी घेतले पद्मनाभस्वामी मंदिरात दर्शन

◆ **तिरुवनंतपुरम्, ३० जानेवारी**
न्यूझीलंडविरुद्धच्या पाचव्या आणि अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघाच्या किमान सात सदस्यांनी शुक्रवारी सकाळी प्रसिद्ध श्री पद्मनाभस्वामी मंदिरात प्रार्थना केली.

खेळाडू २९ जानेवारी रोजी शहरात दाखल झाले आणि शुक्रवारी सकाळी ९.१५ च्या सुमारास त्यांनी मंदिराला भेट दिली. पारंपरिक मंदिराच्या पोशाखात असलेल्या या गटामध्ये भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव, अष्टपैलू अक्षर पटेल आणि फलंदाज रिंकू सिंग व वरुण चक्रवर्ती यांचा समावेश होता. फिरकी गोलंदाज कुलदीप यादव आणि रवी बिश्नोई, तसेच क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप हे देखील यात सहभागी होते.

निर्णायक सामन्यापूर्वी आशीर्वाद घेण्यासाठी संघाच्या सदस्यांनी या विस्तीर्ण मंदिर परिसरात सुमारे ३० मिनिटे घालवली. श्री पद्मनाभस्वामी मंदिर, जो त्याच्या समृद्ध इतिहास आणि सुशोभित स्थापत्यकलेसाठी ओळखले जाते. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात शनिवारी अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय सामना होणार आहे.
◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे



### पंचाक्षरी लोणार 'हेरंब श्री' चा मानकरी

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**
येथील पंचाक्षरी लोणार सातारा येथे झालेल्या पश्चिम महाराष्ट्र शरीरसौष्ठव स्पर्धेतील हेरंब श्री स्पर्धेचा मानकरी ठरला. पंचाक्षरीने ७५ किलो वजनी गटास हेरंब श्री २०२६ चे विजेतेपद प्राप्त केले. या स्पर्धेत सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी या जिल्ह्यातून १०८ खेळाडू सहभागी झाले. यात सोलापूरच्या युनूस शेख यानेही रौप्य पदक प्राप्त केले. खुल्या गटात शाहनवाज शेख याने चतुर्थ क्रमांक प्राप्त केला.



### चतुरबाई श्राविकाच्या अंश काटकरची राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**
सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या वतीने झालेल्या मैदानी स्पर्धेत चतुरबाई श्राविका विद्यालयाच्या अंश काटकर याने १२ वर्षांखालील गटात ६० मीटर धावण्याच्या स्पर्धेत ९.२१ सेकंदाची वेळ नोंदवत द्वितीय क्रमांक संपादिल. या कामगिरीवर त्याची कोपरगाव (अहिल्यानगर) येथे होणाऱ्या राज्य स्पर्धे साठी निवड झाली. त्यास विराट स्पोर्ट्स क्लबच्या सूर्याजी लिगाडे, भारती लिगाडे व साधना काटकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यास मुख्याध्यापिका रुपाली चेंडके सर्व शिक्षक वृंदांनी शुभेच्छा दिल्या.



# एनजी अकादमीचा लातूरच्या रोहन अकादमीवर डावाने विजय

### क्रिकेट मालिका : अभिजित सरवदे सामन्याचा मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**
निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आयोजिलेल्या तीन दिवसीय सामन्यात येथील नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने लातूरच्या रोहन अकादमीवर एक डाव राखून ३४३ धावांनी दणदणीत विजय मिळविला

डोणगाव रोडवरील पुष्ण जिमखानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत कालच्या ४ बाद १३१ वरून रोहन अकादमीचा डाव ५९ षटकात २२३ धावांत आटोपला. यात वेदांत हाक्के ६९, अजिंक्य मुळे ३२, पार्थ मुंडे २०, अमर मुळे २७ व यशवंत शिंगारे २९ धावा केल्या. निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीकडून सुजल गायकवाडने ३९ धावात तीन बळी टिपले. अनुज वाल्मिकी व अभिजीत सरवदेने प्रत्येकी २ बळी तर जयवर्धन भोसले व ऋग्वेद पाटील प्रत्येकी एक गडी बाद केला. पारितोषिके राहुल म्हेत्रे, विनोद पाटील, मनोज वाल्मिकी, वाल्मिक कीर्तिकर व लातूरचे कोच गणेश चव्हाण यांच्या उपस्थितीत देण्यात आली. विष्णू गायकवाड यांनी सुत्रसंचलन केले

**वैयक्तिक पारितोषिके :**
सामनावीर : अभिजीत सरवदे, गोलंदाज : ऋग्वेद पाटील, फलंदाज : अभिजीत सरवदे.





# माळशिरस मिराकल्स संघास विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**
माळशिरस मिराकल्स संघाने जिल्हा न्यायालयीन कर्मचारी व अधिकारी यांच्या जिल्हास्तरीय १४ वी डिस्ट्रिक्ट कोर्ट प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेचे विजेतपद पटकाविले.

भंडारी मैदान जुळे सोलापूर येथे झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात माळशिरस मिराकल्स व उगच् चॅलेंजर्स सोलापूर संघाचा पराभव केला. विजेत्या संघास ट्रॉफी व ॲड. रियाज शेख यांच्यातर्फे रोख ११ हजार तर उपविजेते संघास ट्रॉफी व ८ हजार रुपये रोख ॲड. मनोज पामूल यांच्यातर्फे देण्यात आले. पारितोषिके जिल्हा न्यायालयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. मिलिंदजी थोबडे, ॲड. राजेंद्र फताटे यांच्या हस्ते देण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राज्य न्यायालयीन कर्मचारी क्रीडा व कल्याण महासंघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लिंबोळे, नबी शेख, बालाजी पिसे, पवन गायकवाड, इरेश बिराजदार, कनकी बंधू, रफीक पठाण, शाम राजेपांढरे आदींनी परिश्रम घेतले.



# सूर्यनमस्कार स्पर्धा १५ फेब्रुवारीला

**सोलापूर, दि.३० जानेवारी-**
सोलापूर जिल्हा योग परिषदेतर्फे आंतरशालेय व महाविद्यालयीन सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धा १ फेब्रुवारी ऐवजी रविवार १५ फेब्रुवारी रोजी नूमवी प्राथमिक शाळा डफरीन चौक येथे सकाळी सात वाजल्यापासून होतील. इच्छुक शाळांनी स्नेहल पेंडसे (९४०३६९४५३०) अथवा उत्कर्षा कुचन (९०१४५ ९५९३९) कडे नोंदणी करावी.

## मैदानाकडून मुख्याध्यापक पदापर्यंत



# अनिल पाटील यांचा ३६ वर्षाचा प्रेरणादायी प्रवास

सोलापूरच्या क्रीडा विश्वात एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे, कर्नाटक लिंगायत एज्युकेशन संस्थेच्या अण्णप्पा काडादी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील ३१ जानेवारी २०२६ रोजी आपल्या ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. २ जुलै १९९० रोजी क्रीडा शिक्षक म्हणून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास मुख्याध्यापक पदापर्यंत अतिशय प्रेरणादायी राहिला आहे.

**✔ गुरुंमुळेच राज्य स्पर्धेपर्यंत भरारी**

अनिल पाटील यांचे वडील के. डी. पाटील हे सिद्धेश्वर हायस्कूलमध्ये क्रीडा शिक्षक होते. वडील हेच आदर्श व वडिलांचा हाच वारसा जपत त्यांनी क्रीडा क्षेत्राची वाट धरली. आठवीपासून त्यांनी बास्केटबॉलचे रीतसर प्रशिक्षण सुरू केले. संगमेश्वर महाविद्यालयात विज्ञान शाखेचे शिक्षण घेत असताना त्यांना व्ही. आय. स्वामी, एल. बी. चौगुले आणि एल. एस. गायकवाड यांसारख्या मार्गदर्शकांचे प्रोत्साहन लाभले. त्यांनी केवळ बास्केटबॉलच नव्हे, तर ॲथलेटिक्स आणि हँडबॉल स्पर्धांमध्येही चमकदार कामगिरी केली. ॲथलेटिक्समधील गोळाफेक प्रकारात त्यांनी राज्य स्तरापर्यंत मजल मारली होती. बी.एस्सी. आणि त्यानंतर डॉ. वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालयातून डी.एम.एल.टी. पूर्ण केल्यावर पाटील यांनी काही काळ मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून काम केले. मात्र, वडिलांची इच्छा आणि प्राचार्य डॉ. सुरेश पवार यांच्या आग्रहाखातर त्यांनी बी.पी.एड.ला प्रवेश घेतला. डॉ. आदिल मुन्शी, डॉ. भारत गुंड, श्री. गाजरे आणि श्री. पाटील या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यातील क्रीडा कौशल्याला खऱ्या अर्थाने पैलू पडले.



**आज कृतज्ञता सोहळा**
मुख्याध्यापक अनिल पाटील यांचा अण्णाप्पा काडादी प्रशालेच्या प्रांगणात आज शनिवार ३१ जानेवारी रोजी सायं. ६ वाजता कृतज्ञता सोहळा होईल. तरी शिक्षण व क्रीडा प्रेमींनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन सिद्धविद्या १९८३ मित्र ग्रुपने केले आहे.

**✔ काडादी प्रशालेचा कायापालट**

१९९० मध्ये काडादी प्रशालेत रुजू झाल्यावर त्यांनी बास्केटबॉल, हँडबॉल आणि ॲथलेटिक्सचा सराव जोमाने सुरू केला. याचे फळ म्हणून अवघ्या दोन वर्षांतच शाळेचे खेळाडू थाळीफेक व गोळाफेक प्रकारात राज्यस्तरावर चमकले. सुमंगल तलवार या विद्यार्थिनीने तलवारबाजीमध्ये राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारली. जिल्हा क्रीडाअधिकारी जनक टेकाळे व इतर जिल्हा क्रीडा अधिकारी, अधिकारी वर्ग यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून शाळेला मिळालेल्या अनुदानामुळे शाळेत कंपाऊड वॉल, जिमखाना हॉल, ओपन जिम आणि मैदानाच्या सपाटीकरणाची कामे मार्गी लागली. सेवा कालावधीत बी.एड., एम.पी एड.,बी.जे.व डी.एस.एम. हे शिक्षण घेतले. शिक्षणसंस्थेच्या अक्कलकोट येथील मंगरुळे प्रशालेतही त्यांनी ३ वर्षे पर्यवेक्षक व उपमुखाध्यापक म्हणून सेवा बजावली.त्या ठिकाणी पालक शिक्षक विद्यार्थी व ॲड. मंगरुळे यांचे भरपूर प्रेम सहकार्य मिळाले आणि २०१५ मध्ये काडादी प्रशालेत मुख्याधापक रुजू झाले.

**✔ मैदानावरची शिस्त शाळेत रुजवली**

काडादी प्रशालेत मुख्याध्यापक म्हणून कार्य करताना विद्यार्थ्यांच्या शिस्तीबरोबरच गुणवतेकडे, कौशल्याकडे व त्यांच्यातील सुप्तगुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला. शिक्षक बंधू-भगिनींना त्यांच्या आवडीप्रमाणे कार्य देवून, समन्वय साधून प्रशालेचे नाव उंचावण्यासाठी प्रयत्न केले. शिस्त, स्वच्छता, नियमितपणा, वेळेवर काम व सर्वांचे सहकार्य यामुळे शाळेला अनेक पारितोषिक मिळाले. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा यामध्ये द्वितीय क्रमांक, स्वच्छता मॉनेटर मध्ये राज्यस्तरावर सलग तीन वर्षे टॉप २५ मध्ये शाळेचे नाव आले. प्रशालेला शिक्षणमंत्र्याकडून गौरवण्यात आले. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने गणित प्रयोगशाळा, विज्ञान, भूगोल व खगोलीय दूर्बिण, ग्रंथालयासाठी वाचनीय पुस्तके प्राप्त झाली. शिक्षकांना विविध प्रशिक्षणासाठी पाठवून त्यांच्यातील कौशल्यांना वाव देण्याचा प्रयत्न केला. प्रशालेत जिल्हयात पाहिल्यांदाच बी.आय.एस.चा क्लब तयार करून विद्यार्थी व शिक्षक राष्ट्रीयस्तरापर्यंत चमकले. प्रशालेतील एनसीसीच्या विद्यार्थांनी राष्ट्रीय व राज्यस्तवर स्कॉलरशीप मिळवली. स्कॉलरशीप व चित्रकलेत आपले कौशल्य दाखवून विद्यार्थांनी १००% यश संपादन केले. शाळेचे ८१वे वर्षे खूप मोठ्या उत्साहात साजरे केले. हे कार्य करत असताना पालक शिक्षक माजी विद्यार्थी व संस्थेचे पदाधिकारी यांचा सिंहाचा वाटा आहे.

**✔ एक उत्तम क्रीडा संघटकही**

अनिल पाटील हे केवळ शिक्षकच नव्हे, तर एक उत्तम संघटकही आहेत. सोलापूर शहरात दैनिक तरुण भारत आयोजित व आमदार प्रणिती शिंदे पुरस्कृत मॅरेथॉन असो वा पालकमंत्री जगन्नाथ पाटील यांनी आयोजित केलेली स्पर्धा. या तसेच महापौर, राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत पाटील यांनी या सर्व स्पर्धांच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. जिल्ह्यातील सर्वात मोठ्या मॅरेथॉन स्पर्धांचे समन्वयक म्हणून त्यांनी आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडली. पाटील यांनी सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव म्हणूनही कार्य केले. डॉ. सुरेश पवार व सुदेश मालप यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी संघटनेचे सचिव म्हणून अनेक वर्षे धुरा सांभाळली. जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर महानगरपालिका आणि बी.पी.एड. कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने त्यांनी अनेक स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजित केल्या.

**✔ केएलई संस्थेचे सहकार्य**

क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करत असताना अण्णप्पा काडादी, मंगरुळे व सिल्व्हर ज्युबली प्रशालेतील सर्व मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, विषय शिक्षक, शहर व जिल्हयातील संघटक, शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा शिक्षक यांच्याबरोबरच के.एल.ई. संस्थेचे चेअरमन डॉ. प्रभाकर कोरे, सर्व बोर्ड ऑफ मॅनजमेंटचे सर्व सदस्य, स्थानिक नियामक मंडळाच्या अध्यक्षा सिंधूताई शिवशंकर काडादी, कै. राजशेखर कळसे मित्रपरिवार, सिद्धविद्या-१९८३ चे मित्र परिवार आणि कुटंबातील सर्व सदस्यांचे मोलाचे आशीर्वाद व सहकार्य लाभले असल्याचे ते सांगतात.

**✔ जिल्ह्याचा क्रीडास्तर उंचावण्याचा माझा मानस**

''सोलापूर शहर आणि जिल्ह्यात खेळाडूंमध्ये प्रचंड टॅलेंट आहे. हे टॅलेंट जगासमोर आणण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचा क्रीडास्तर उंचावण्याचा माझा मानस आहे,'' असे अनिल पाटील कृतज्ञतापूर्वक सांगतात.मुख्याध्यापक पदावरून निवृत्त होत असले तरी, अनिल पाटील यांचे क्रीडा क्षेत्राशी असलेले नाते निरंतर राहणार आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस आणि नियोजित कार्याला मनःपूर्वक शुभेच्छा!

**- अजितकुमार संगवे, मो.९८८११३३१०३**



# प्रार्थना स्पोर्टस् अकादमीस सर्वसाधारण विजेतेपद

### जिल्हा बाल मैदानी स्पर्धा : विराट स्पार्टस्‌ला उपविजेतेपद, आष्टीची सिल्वर ओक स्कूल तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जानेवारी-**
जिल्हा बाल मैदानी स्पर्धेत नेहरूनगर येथील प्रार्थना स्पोर्टस् अकादमीने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. नेहरूनगरच्याच विराट स्पोर्टस् क्लबला उपविजेतेपद तर आष्टी (ता. मोहोळ) येथील सिल्वर ओक प्रशालेस तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. पारितोषिके प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी, सुरेश खुर्द-भोसले, सुनील जाधव आदी उपस्थित होते.

**अंतिम निकाल**

**८ वर्षे : ५० मीटर धावणे मुले:** आयुष्यमान गीते (प्रार्थना), अनुज शेळके (दमाणी विद्यामंदिर), हर्षश माने (ब्रम्हा स्पोर्ट्स, कुमठे). **मुली :** आरोही भोसले (सिल्व्हर ओक), गारगी श्रीमंगळे (विराट) विरोही बस्सरगी (ब्रम्हा स्पोर्ट्स)

**१०० मीटर धावणे मुले :** आयुष्मान गीते, अनुज शेळके, हर्ष माने. **मुली :** सारगी श्रीमंगळे (विराट), आदिती धनवडे (पंढरपूर). श्रेया गरड (राष्ट्र विकास प्राथमिक वि.मं कुमठे).

**स्टँडिंग ब्रॉड जम्प मुले :** आयुष्यमान गीते, कृष्णा पाटील, शिव दशरथ (सिल्वर ओक). **मुली :** आरोही भोसले, राजमुद्रा सुर्वे (सिल्वर ओक), आयल कोळवले (अभिनव गुरुकुल अजनाळे, सांगोला).

**१२ वर्षे : ६० मीटर धावणे मुले :** श्लोक लामजणे (शांती स्कूल), आयुष्यमान काटकर (विराट), मोबीन तडफदार (प्रार्थना). **मुली:** साक्षी मिस्किन (प्रार्थना), पूर्वी मुल्याल (जि.प. प्राथमिक शाळा उळे), प्राणवी हुल्ली (प्रार्थना).

**३०० मीटर धावणे मुले :** अजय राठोड (वीर भारत अकॅडमी), श्रेयस राठोड (भारती विद्यापीठ), जयदेव सुरवसे (हरिभाई देवकण). **मुली :** रक्षिता राठोड (बालाजी फिटनेस क्लब १३ मैल), वैभवी खांडेकर (प्रार्थना), जानवी हरिहर (एस.आर.पी. कॅम्प).

**लांब उडी मुले :** मोबीन तळपदार (प्रार्थना), अनिकेत गायकवाड (गुरुकुल मंगेवाडी), यश येलपले (अभिनव गुरुकुल अंजनाळे). **मुली :** साक्षी मिस्किन (प्रार्थना), वैष्णवी शिंदे (अभिनव गुरुकुल अजनाळे), मनवी हुली (प्रार्थना).

**गोळा फेक मुले :** चैतन्य मोरे (जि.प. प्रा वांगी), स्वप्निल चव्हाण (शिवाजी विद्यालय महुद), शिवराज मोरे (सिल्वर ओक), **मुली :** महेश्वरी बंडगर (जि प प्राथमीक शाळा राजुरी सांगोला), वेदिका चव्हाण (सिल्वर ओक).

**१४ वर्षे : ८० मीटर धावणे : मुले :** अरुष गंगावर, देवांग झुंजुर्डे (प्रार्थना), सुरज भोसले (सिल्व्हर ओक). मुली : सृष्टी लिंगडे (विराट), पवित्रा नागगाव ( जि.प. प्राथमीक शाळा एस.आर.पी. कॅम्प).

**३०० मीटर मुले :** हर्ष पाचपुले (विराट). अविरत स्वामी (प्रार्थना), प्रार्थना लाड (शांतिनिकेतन गुरुकुल पंढरपूर). **मुली :** अक्षता खप्पागंगोडा (जि.प. प्राथमीक शाळा एस.आर.पी. कॅम्प), रिया सुनील चव्हाण (विवेकानंद पब्लिक स्कूल). लांब उडी मुले : देवांश झुंजुर्डे, अविरत स्वामी, आरुष गंधनवार (सर्व प्रार्थना). मुली : सृष्टी सूर्याजी लिंगडे (विराट). सुहासिनी ढोरमले (अभिनव गुरुकुल, अजनाळे). सिद्धी कदम (विराट).

**गोळा फेक मुले :** आदित्य दत्तात्रेय येलपले, संकल्प छगन येलपले, सोहम सावंत (सर्व पायोनियर स्कूल मंगेवाडी, सांगोला). **मुली :** अंतरा आर्किले, वैभवी नलावडे (वांगी विद्यालय, करमाळा), श्रद्धा तंडे (इंग्लिश मीडियम स्कूल).

## महत्वाचे...



### केबीपी महाविद्यालयात अजित पवारांना श्रद्धांजली

**पंढरपूर, दि. ३० जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व प्रतिष्ठित राजकारणी अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. तसेच विमानात असलेल्या इतरही सहप्रवाशांनी आपला जीव गमावला, या दु:खद घटनेने महाराष्ट्रात शोककळा पसरली असून विविध राजकीय व सामाजिक नेतृत्वांनी या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, राजेश कवडे, सुशील कुमार शिंदे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. समाधान माने, डॉ. अनिल चोपडे, आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.अमर कांबळेंच्या प्रमुख उपस्थितीत एक श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती.



### कल्याणशेट्टी संकुलात प्रजासत्ताक दिन

**अक्कलकोट, दि. ३० जानेवारी-**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, संगणक, मोबाईल, इंटरनेट, यंत्रे, रोबोट्स शिवाय सॉफ्टवेअरमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. विद्यार्थ्यांना देखील वैयक्तिक मार्गदर्शन, ऑनलाइन शिक्षण,मूल्यांकन यासाठी ए आय वापरले जात आहे, त्यामुळे ए आय प्रणाली मानवाच्या प्रगतीसाठी उपयुक्त असून तिचा स्वीकार केला पाहिजे,असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी बौद्धिक कार्यक्रमात समर्थ पवार, वेदांती मसलेकर या विद्यार्थ्यांनी ए आय प्रणालीवर अभ्यासपूर्ण भाषण केले. यावेळी इयत्ता ९ वी तील विद्यार्थिनी आदिवासी चौकोनी रिंगण नृत्य केले. यासाठी क्रीडा शिक्षक कुमार जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. भिमराव साठे, संचालक महेश कापसे, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, माजी मुख्याध्यापक बापूजी निंबाळकर अशोक दंतकाळे, माजी पर्यवेक्षक शिवानंद पुजारी, खंडेराव घाटगे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी तर आभार दिगंबर जगताप यांनी मानले.



### माघी एकादशी निमित्त श्रीराम नवमी

**करकंब, दि. ३० जानेवारी-**

माघ एकादशीच्या अनुपम सोहळ्यासाठी पंढरपूर येथे दाखल झालेल्या लाखो वैष्णवजणांनी विठ्ठल विठ्ठल असा केलेला नाम घोष,टाळ मृदुंगाचा गजर,भजन आणि हरिनामाच्या जयघोषाने संपूर्ण पंढरी नगरी दुमदुमून गेली होती. माघी वारीनिमित्त करकंब (ता. पंढरपूर) येथेही अंजली टकले, आशा टकले, साधना टकले, उमा दुधाणे, अमृता रसाळ, दिपाली म्हेत्रे, वंदना म्हेत्रे, सुवर्णा टकले, देवकी दुधाणे, रंजना टकले, पल्लवी टकले, वनिता दुधाणे, मंगल रसाळ आदी महिलांनी स्थापन केलेल्या श्रीराम नवमी भजनी मंडळाची प्रथम वर्षपूर्ती व माघ वारीनिमित्त भजन गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांना मार्गदर्शन व तबलासाथ ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनियम माऊली पिसे, योगेश दुधाणे यांनी केले.

## निधन वृत्त...

### संभाजी जाधव



**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

सात रस्त्यावरील शोभा नगर येथील संभाजी शिवाजी जाधव (वय ५०) यांचे शुक्रवारी सायंकाळी आठच्या सुमारास निधन झाले. त्यांच्यामागे आई, पत्नी, २ मुले व २ भाऊ असा परिवार आहे. त्यांची अंतयात्रा शनिवारी (दि. ३१) सकाळी १०.३० वाजता त्यांच्या निवास्थानापासून निघून मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येतील.

### अशोक जडे



**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

विजापूर रोड इंदिरानगर येथील रहिवासी अशोक रामचंद्र जडे (वय-८१) यांचे निधन झाले. सरस्वती मंदिर व दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालयांमध्ये ४० वर्षे शैक्षणिक योगदान त्यांनी दिले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई आणि चार नातवंडे आहेत. प्रसिद्ध दाताचे डॉक्टर अरुण जडे यांचे ते थोरले बंधू होते.

### अमित क्षीरसागर



**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

ब्रह्मदेव दादा माने कॉलेज येथील कर्मचारी अमित वसंत क्षीरसागर (वय ४३) रा. सोलगी नगर, कुमठा नाका यांचे गुरुवार दिनांक २९ जानेवारी रोजी रात्री निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, विवाहित बहीण, भाऊ, वहिनी व पुतणे असा परिवार आहे. संतोष क्षीरसागर यांचे ते लहान बंधू होत.

# स्मशानापासून दर्शन बारी आणणे, अत्यंत अनुचित

**● पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी यांची प्रतिक्रिया**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जानेवारी-**

येथील गोपाळपूर रस्त्यावरील वैकुंठ स्मशान भूमी पाशी दर्शन मंडप न करता, तो पर्यायी जागेवर करावा अशी मागणी पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समिती, हिंदू महासभा व अन्य भाविक संघटना यांच्या वतीने शासनाला करण्यात आल्याची माहिती पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी इचगावकर यांनी दिली.

या संदर्भात माहिती देताना अभयसिंह कुलकर्णी इचगावकर यांनी सांगितले की,श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या पवित्र दर्शनासाठी जाताना, स्मशाना जवळून जावे लागणे अत्यंत अशुभ आहे. या महिन्याचे अखेरीस सरकार स्मशानभूमी शेजारी दर्शनमंडपाचे भूमीपूजन करणार अशा वार्ता येत आहेत. स्मशानभूमी ही अपवित्र, अशुभ मानली गेली आहे. तेथे जावून आल्यावर स्नान करुन शुचिर्भूत व्हावे लागते, असे असताना श्री रुक्मिणी पांडुरंगाच्या दर्शनासाठी तेथून प्रारंभ करावा लागणे दुर्दैवी आहे. तसेच हा परिसर नदीकाठाला लागून व पूररेषेच्या आत आहे. सरकार पूररेषेच्या आत लोकांना बांधकामांना बंदी घालते. तशा निषेधक





रेषा ओढते व स्वतः मात्र त्यात बांधकाम करु पाहते. हे फार वाईट व धोकादायक असून, पुढे मागे वारकरी, भाविक, दर्शनार्थींवर वाईट वेळ आणू शकणारे आहे.

यापेक्षा वारकरी संघटनांनी व अन्य भाविकहितैषी संस्थांनी सुचविलेल्या पर्यायी जागांवर असे प्रकल्प राबवावेत की ते प्रत्यक्ष भाविकांना योग्य प्रकारे उपयोगी पडतील. गेली अनेक वर्षे, मध्यवर्ती भाविक सुविधा केंद्राचा पर्याय सुचविला जात आहे. परंतु शासनाला वारकरी भाविकांना जास्तीत जास्त त्रास देण्याची इच्छा आहे. त्यामुळे चांगले पर्याय मुद्दामहून नाकारले जातात. खरे तर सध्या आहे तो दर्शन मंडप योग्य सुधारणा करून टोकन दर्शनासाठी वापरायला पुरेसा आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांनी नुकतेच वढू तुळापूर येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकासाठी इतर जागांच्या अदलाबदलीचा प्रस्ताव दिला आहे तसेच ग्रामस्थांच्या सूचना प्रशासनाने ऐकून घ्याव्या असेही निर्देश दिलेले आहेत. येथे पंढरपुरात मात्र प्रशासन अधिकाऱ्यांच्या आडमुठेपणाने अनेक शासकीय जागा व अब्जो, खर्वो रुपये खर्च होऊन वाया गेले आहेत, जात आहेत हा दर्शन मंडप व प्रस्तावित कॉरिडॉर हे याचे उत्तम उदाहरण आहे. तरी स्मशान भूमी पाशी दर्शन मंडप न करता, तो पर्यायी जागेवर करावा, अशी मागणी पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समिती, हिंदू महासभा व अन्य भावीक संघटना याच्यावतीने करीत आहोत.

या मागणीस वारकरी पाईक संघाचे संस्थापक ह.भ.प.राणामहाराज वासकर, मंदिर हितरक्षण समितीचे गणेश लंके यांनीही पाठिंबा दर्शविला असल्याचे अभयसिंह कुलकर्णी इचगांवकर यांनी सांगितले.

# युवा सर्पमित्र प्रणव यांच्यामुळे विषारी नागाला जीवदान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० जानेवारी-**

घरात किंवा घराच्या परिसरात साप निघाल्याचे समजताच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते.मात्र अकलूज येथील पत्रकार संजय लोहकरे यांच्या घराच्या परसबागेत नाग आसल्याचे निदर्शनास आल्यानंतर सर्प अभ्यासक प्रा.धनंजय देशमुख यांना फोन करून बोलवले होते.

पण ते बाहेर गावी असल्याने खंडाळी युवा सर्पमित्र प्रणव इंगवले देशमुख याला फोन करताच क्षणाचाही विलंब न करता तो कोणतीही भीती न बाळगता तो तत्काळ घटनास्थळी पोहचून अत्यंत शिताफीने अत्यंत विषारी असणा-या नाग या सापाला पकडून निसर्गाच्या सान्निध्यात सोडून दिला.त्यामुळे या परिसरातील लोकांमधील सापाबद्दलची भितीही नष्ट झाली. त्यामुळे मानव तसेच साप दोघांचाही जीव सुरक्षित राहिला आहे.



नागाचा रंग काळा, तपकिरी, ऑलिव्ह हिरवा किंवा पिवळसर असू शकतोफणा काढल्यावर पाठीवर चष्म्यासारखी किंवा 'ण' आकाराची खूण दिसते. आकार व आयुष्य: नागाची लांबी साधारणपणे ३ ते १० फुटांपर्यंत असू शकते. स्वभाव: नाग स्वत:हून हल्ला करत नाहीत.भीती वाटल्यास किंवा डिवचल्यास ते फणा काढून उभे राहतात. नागाचे मुख्य अन्न उंदीर, बेडूक आणि इतर लहान कीटक आहेत. प्रजनन: नाग अंडी घालतात.

**- प्रा. धनंजय देशमुख, सर्पमित्र व सर्प अभ्यासक**





# राष्ट्र उभारणीत नेताजींचे योगदान मोलाचे : शिक्षणाधिकारी जगताप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जानेवारी-**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे कर्तृत्व तरुणांसाठी प्रेरणादायी असून राष्ट्र उभारणीत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे योगदान अनमोल आहे, असे प्रतिपादन शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य रवींद्र वायकर होते. प्रास्ताविक डॉ. महादेव राऊत यांनी केले. अध्यक्षीय भाषण उपप्राचार्य रवींद्र वायकर यांनी केले. याप्रसंगी प्रा. विठ्ठल गुंजाळ, प्रा.नरेंद्र शिंदे, प्रा. संतोष भोसले, प्रा. अविनाश शेंडगे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. आरती पवार यांनी केले, तर आभार प्रा. भोसले यांनी मानले.

# ब्रह्मदेवदादा माने पॉलिटेक्निकमध्ये फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

ब्रह्मदेवदादा माने पॉलीटेक्निक येथील मेकॅनिकल या विभागाने रीसेंट ट्रेंड इन फाऊंड्री टेक्नॉलॉजी या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले. सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण प्रणालीमध्ये आमुलाग्र बदल होत आहेत; त्यानुसार शिक्षकांचे ही ज्ञान अद्यावत होण्यासाठी ऑफलाइन पद्धतीने डिप्लोमा व इंजिनिअरिंगच्या शिक्षकांसाठी तीन दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे उद्घाटन झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीपराव माने, सचिवा जयश्री माने, उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने, एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर ऑफ प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमिटेड सोलापूर करण शहा, प्रोजेक्ट मॅनेजर माधव देशपांडे, एस. इ. एस. कॉलेजचे प्राचार्य अतुल भावठणकर, एमडी-मनू अलॉय अ‍ॅन्ड कास्टिंगचे मनीष आराध्ये, एमडी-धनमान प्रीसीकास्ट सोलापूर धनंजय गोडबोले, फाउंड्री मॅनेजर ऑफ मनू अलॉय अतुल कुलकर्णी, लक्ष्मी ड्रकेन प्रायव्हेट लिमिटेड चे खरेदी व्यवस्थापक अनिल बिज्जर्गी, प्राचार्य श्रीकांत जोशी, संकुल संचालक प्रा. राहुल माने, समन्वयक प्रा. शशिकांत फुलारी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाले.



प्रास्ताविक प्रा. सोनाली रणदिवे यांनी केले. यावेळी करण शहा, नील आराध्ये यांनी आपण तंत्रज्ञानाच्या अतिशय वेगवान युगात आहोत. दररोज नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे आणि त्याचा थेट परिणाम शिक्षण क्षेत्रावर होत आहे. त्यामुळे शिक्षकांनीही काळानुसार स्वत:ला अपडेट करणे आवश्यक आहे. सूत्रसंचालन प्रा. सोनाली रणदिवे यांनी तर मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा.शशिकांत फुलारी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.लामकाने प्रा. सुधीर सोमा प्रा.गायकवाड, प्रा.पाटील, प्रा. जमादार, प्रा.सुरवसे, प्रा.ढगे, घोडके, यादव यांनी परिश्रम घेतले.




# कोर्टीतील फाटे ट्रॅक्टर्स फर्म येथे उपमुख्यमंत्री पवारांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जानेवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने फाटे ट्रॅक्टर कोर्टी पंढरपूर येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी परिसरातील नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अजित दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी नागेश फाटे बोलताना म्हणाले आज आमचे लाडके नेते अजितदादा यांच्याबद्दलच्या या दुर्दैवी वृत्ताने मन सुन्न झाले आहे. दादा म्हणजे केवळ एक नेते नव्हते, तर ते आम्हा कार्यकर्त्यांसाठी एक आधारवड होते. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत जनतेच्या सेवेसाठी झटणारा असा 'कामाचा माणूस' पुन्हा होणे नाही. या श्रद्धांजली सभेला गोरख बागल, संजय पवार, गणेश दुरुगकर, भास्कर गायकवाड, गुलाब मुलांणी, अभिमन्यू पवार, डॉ रमेश फाटे,डॉ.माणिक मस्के,भारत घोडके सर,औदुंबर माने,शुभम फाटे, संतोष पुणेकर, ओंकार कथले, बेबन आदमील , समाधान कांबळे, समाधान बागल, विशाल मोरे, किशोर नपते, शरद थिटे, ऋषिकेश बागल, नागेश काळे उपस्थित होते.

### जाधव प्रशालेत प्रजासत्ताक दिन

**वैराग, दि. ३० जानेवारी-**

तुळशीदास जाधव माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक वाय. पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य एच. बी. भोसले, मेजर जांभळे यांची उपस्थिती लाभली.

याप्रसंगी माजी मुख्याध्यापक एस. डी. भोसले, जगताप गुरुजी, लोखंडे गुरुजी, अडमुठ, हरिभाऊ शिंदे व माजी पर्यवेक्षक इंगळे, आबासाहेब पाटील उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रशालेच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. प्रशालेचे प्राचार्य सतीश चव्हाण, उच्च माध्यमिक विभागप्रमुख एम. डी. जाधव आणि प्राथमिक मुख्याध्यापिका हिना शेख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन सूरज बुरगुटे, अनिकेत ढेगळे, वृषाली उज्जनकर आणि विद्या मस्के यांनी केले. भोसलेंनी आभार मानले.



# हनुमान वाचनालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० जानेवारी-**

श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय वासुद (ता.सांगोला) येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उद्देशिका वाचन करून ग्रंथपाल अनिकेत शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रास्ताविक संतोष मोरे यांनी केले. याप्रसंगी वासुदचे सरपंच संभाजी चव्हाण, उपसरपंच अनिल केदार, वाचनालयाचे संचालक मोहन साळुंखे, नानासाहेब केदार, मेजर सुखदेव सपताळ, अरुण केदार, रविकांत मराळ, तानाजी पाटील, कॅ.दत्तात्रय केदार, माजी सरपंच रमेश गोडसे, चंद्रकांत केदार, अंबादास पवार, आदलिंगे, नितीन केदार, तानाजी केदार, सरदार केदार उपस्थित होते.

# करकंब ग्रामस्थांतर्फे अजित पवारांना पुष्पांजली

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२८ जानेवारी-**

महाराष्ट्राच्या राजकारणात आजही अनेक दादा आहेत पण स्वतःच्या कर्तुत्वाने राजकारण, समाजकारण, अर्थकारण, समाजसेवा या क्षेत्रात एकमेव दादा असणारे निर्भीड, परखड, कामाचा हुरूप, गोरगरिबांच्या हाकेला प्रतिसाद देऊन त्यांच्या समस्या सोडवण्यात जातीने पुढाकार घेत अचूक वेळेवर पोहोचणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी समजताच करकंब येथील नागरिक, व्यापारी यांनी बाजारपेठा बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

ग्रामपंचायत करकंब येथे सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, सचिन शिंदे, पंचायत समिती सदस्य राहुल पुरवत, अ‍ॅड. शरदचंद्र पांढरे, अमोल शेळके, नितीन गायकवाड,राहुल शिंगटे,प्रा.सतीश देशमुख,ग्रामस्थ,नागरिक,व्यापारी यांनी अजित दादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मनोगते व्यक्त करीत दादांविषयीच्या जुन्या आठवणींना उजाळा देत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहिली. करकंब बसस्थानक येथेही मा. जि. प. सदस्य बाळासाहेब देशमुख, सरपंच मारुती देशमुख, उद्योजक अमोल शेळके, महिला आणि बालकल्याण समिती सभापती रजनी देशमुख,पांडुरंग व्यवहारे,प्रदीप पाटील,दिलीप पुरवत,संतोष धोत्रे,लक्ष्मण नलवडे, अर्जुन शेटे यांनी मनोगते व्यक्त करत श्रद्धांजली वाहिली. या घटनेमुळे जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराचे नियोजित कार्यक्रम सर्वच पक्ष्यांनी रद्द केले. करकंब येथे अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पाहणी दौरा करण्याकरता भेट दिली होती. त्याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन अजितदादांच्या हस्ते करण्यात आले होते. अनेकांना या जुन्या आठवणींना उजाळा देताना अश्रू अनावर झाले होते.




### विवाह सोहळ्यात श्रद्धांजली

करकंब येथील सोमनाथ शिंदे यांची कन्या स्नेहल व महादेव देवकते यांची कन्या प्रेरणा यांचा विवाह सोहळा होता.या विवाह सोहळ्याच्या सुरुवातीस उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध राहून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहिली.



# सांगोल्यात प्रजासत्ताक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० जानेवारी-**

सांगोला महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड व प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून ध्वजाला सलामी दिली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, सचिव ड.उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य म.सि. झिरपे, सु.ग.फुले, सु.ग.उकळे, डॉ.कृष्णा इंगोले, डॉ.बी. एच.कुलकर्णी, प्रा.व्ही.व्ही. जाधव, प्रा.बी.के.लोंढे, प्रा.एस. व्ही.साळुंखे, प्रा.बी.एस.खडतरे, एन.एस.सुरवसे, अनिल साखरे, अशोक खडतरे, रमेश बुंजकर अच्युत फुले, महेश गुरव उपस्थित होते. प्रा.डॉ. विजयकुमार गाडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### नगरसेवक चेतन नरोटे यांची गटनेतेपदी निवड

**सोलापूर, दि.३० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये काँग्रेस पक्षाकडून दोन नगरसेवक निवडून आले असून, या दोन्ही नगरसेवकांनी एकत्र येत सोलापूर महानगरपालिकेत स्वतंत्र काँग्रेस गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने पुणे येथे काँग्रेस गटाची अधिकृत नोंदणी करण्यात आली.निवडून आलेल्या नगरसेवकांची संयुक्त बैठक पार पडली असून, या बैठकीत सोलापूर महानगरपालिकेत काँग्रेस पक्षाचा स्वतंत्र गट स्थापन करण्यास एकमताने मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार, प्रभाग क्रमांक १५-ड मधून निवडून आलेले नगरसेवक चेतन पंडित नरोटे यांची काँग्रेस गटनेतेपदी निवड करण्यात आली. त्यानुसार, काँग्रेस गटाची अधिकृत नोंदणी आज पुणे येथे विभागीय आयुक्त, चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे करण्यात आली. यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे काँग्रेस नगरसेवक चेतन नरोटे व नरसिंह आसादे हे उपस्थित होते. नोंदणी प्रक्रियेवेळी सर्व कायदेशीर व प्रशासकीय बाबी पूर्ण करण्यात आल्या.



### प्रिसिजन कॅमशाफ्ट कंपनीत ए.जी. पाटील पॉलिटेक्निकच्या २५ विद्यार्थ्यांची निवड

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

नॅशनल बोर्ड ऑफ एॅक्रेडिटेशन नवी दिल्लीकडून पुर्नःमानांकन प्राप्त झालेला विजापूर रोडवरील ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये येथील प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमिटेड या कंपनीचा कॅम्पस ड्राईव्हमध्ये डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातील तृतीय वर्षात शिकणाऱ्या २५ विद्यार्थ्यांची निवड झाली. कंपनीचे सीनियर मॅनेजर प्रोडक्शन अमोल पानसरे, एच आर मॅनेजर पारितोष खेर, डेप्युटी मॅनेजर एच आर प्रदीप उघडे व एच आर ऑफिसर प्रकाश गायकवाड या अधिकाऱ्यांनी ही निवड केली. यशस्वी विद्यार्थ्यांचे शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्राध्यापक एम. एम. कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागीय प्लेसमेंट समन्वयक प्राध्यापक ए. आर. मळेकर, आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रा. जे पी पिंजार व बी ई नरोटे, विभाग प्रमुख आर. एस. मोटगी यांनी प्लेसमेंट ड्राईव्ह यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले.



### वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या १५८व्या रिक्षा स्टॉप नामफलकाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने मौलाना आझाद रिक्षा स्टॉपचा १५८व्या नामफलक मोठ्या उत्साहात उद्धाटन करण्यात आले. या नामफलकाचे उद्धाटन प्रदेश अध्यक्ष रियाजभाई सय्यद आणि नुरुद्दीन मुल्ला यांच्या हस्ते पार पडले. यावेळी रिक्षा स्टॉप अध्यक्ष सर्फराज पिरजादे तसेच शहर अध्यक्ष इरफान कल्याणी यांच्या प्रमुख उपस्थिती होती. या उद्धाटनामुळे मौलाना आझाद रिक्षा स्टॉप परिसरात समाधानाचे वातावरण असून रिक्षाचालकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. या वेळी संघटने पदाधिकारी प्रदीप शिंगे, इम्रान शेख, अखिल शेख, शंकर राऊत, अशोक बनसोडे, मजहर शेख, अप्पू सुतार, आणि रिक्षा स्टॉप चे इलियास वालसंगकर रझाक दंडोती एजाज शेख सद्दाम शेख, माजीद पेशमाम या सह शिक्षा स्टॉपचे पदाधिकारी उपस्थित होते



### गांधी व्हिजन फीचर्स तर्फे महात्मा गांधी स्मृतिदिन साजरा

**सोलापूर, दि. ३० जानेवारी-**

महात्मा गांधी स्मृतिदिनानिमित्त गांधी व्हिजन फीचर्स तर्फे सोलापुरातील स्टेशन चौक येथील गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार घालून स्मृतिदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी फीचर्सचे अध्यक्ष प्राचार्य सुभाष शास्त्री, उपाध्यक्ष अ. रजाक बागवान, प्रा.गंगाधर घोंगडे, सचिव सुनील व्हसाळे व सदस्य प्राध्यापक प्रशांत मेहता उपस्थित होते. उपस्थितांनी पू. बापूंना शब्द सुमनांजली वाहिली.

# विठ्ठल परिवाराची तीन गटांत विभागणी

**भालके-आमदार पाटील गट आमने-सामने**

**काळे बंधू आणि गणेश पाटील यांनी केला भाजपाशी घरोबा**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.३० जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने तालुक्यात अनेक राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. भाजप विरोधात आमदार अभिजित पाटील आणि भगीरथ भालके एकत्रित येतील, अशी शक्यता असतानाच भगीरथ भालके आणि आमदार पाटील यांनी एकमेकांच्या विरोधात उमेदवार देऊन स्वतंत्रपणे लढण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे विठ्ठल परिवाराला मोठा धक्का बसला आहे.

दुसरीकडे कल्याणराव काळे, समाधान काळे आणि गणेश पाटील यांनी यापूर्वीच भाजपमध्ये प्रवेश करुन भाजपाशी घरोबा केला आहे. त्यानंतर आता भालके आणि आमदार पाटील एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. विठ्ठल परिवारातील नेत्यांची राजकीय ताकद तीन गटांत विभागल्याने साहजिकच याचा फायदा परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपला होणार का ? अशी देखील चर्चा तालुक्याच्या राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान तालुक्यात सर्वांकडूनच प्रचाराच्या तोफा धडाडू लागल्या आहेत. प्रत्येकांकडून प्रचारफेऱ्या, बैठका, कॉर्नर सभांचे आयोजन केले जात आहे. त्यामुळे तालुक्यातील प्रत्येक गावागावातून राजकीय वातावरण ढवळून निघु लागले आहे. जसजसा मतदानाचा दिवस जवळ येत आहे तसतशी तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीतील रंगत अधिकाधिक वाढत चाललेली दिसून येत आहे.

#### जिल्हा परिषद गटनिहाय उमेदवार

१) **गोपाळपूर :-** दुर्गा अंकुशराव (भाजप), प्रियांका परांडे (शिवसेना), शुभांगी पवार (वंचित बहुजन आघाडी), शीतल शिवाजी आसबे (अपक्ष), मनीषा काळे (अपक्ष).

२) **वाखरी :-** मोनिका काळे (भाजप), अश्विनी कोळी (शिवसेना उबाठा), गायत्री डावरे (बसप), मयूरी बागल (राष्ट्रवादी), सुनीता गायकवाड (ती.वि. आघाडी), रंजना कौलगे पाटील (अपक्ष), मालन फाटे (अपक्ष), राजेश्री माने (अपक्ष).

३) **करकंब :** - नितीन गायकवाड (बसप), आदिनाथ देशमुख (भाजप), बाळासाहेब देशमुख (राष्ट्रवादी), जालिंदर शिंदे (शिवसेना उबाठा), सादिक पठाण (वंचित बहुजन आघाडी), अभिजित दगडे, विजय माळी, सीताराम रणदिवे (अपक्ष).

४) **भाळवणी :** - सुप्रिया गायकवाड (राष्ट्रवादी), जयश्री लोखंडे (भाजप).

५) **रोपळे :** - रेश्मा पाटोळे (बसप), ताई वनसाळे (भाजप), गीतांजली साळुंखे (राष्ट्रवादी), उमा खरे (महाराष्ट्र विकास सेना), जमनाबाई फडतरे (ती.वि. आघाडी), प्रांजल खरे (अपक्ष).

६) **भोसे :** - शनमुखी कोरके (राष्ट्रवादी), प्रफुल्लता पाटील (भाजप), पल्लवी लोंढे (अपक्ष).

७) **टाकळी :** - यल्लाप्पा कांबळे (बसप), दीपक चंदनशिवे (शिवसेना), नंदकुमार वाघमारे (भाजप), तानाजी कांबळे (ती.वि. आघाडी), सत्यवान चंदनशिवे (वंचित बहुजन आघाडी), दत्तात्रय होवाळ (आरपीआय), वैभव कांबळे, गणेश चंदनशिवे, मल्हारी फाळके (अपक्ष).

८) **कासेगाव :** - व्यंकट भालके (ती.वि. आघाडी), हरी गावड (भाजप), संजय वाघमारे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष), अनिल हेगडकर (रासप), राजू आर्वे (अपक्ष).

#### आठ गट आणि १६ गणांसाठी निवडणूक

पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या आठ तर पंचायत समितीच्या १६ गणांसाठी निवडणूक होत आहे. या मध्ये परिचारकांच्या नेतृत्वाखाली भाजपा आणि मित्रपक्ष, विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांच्या तिर्थक्षेत्र विकास आघाडी आणि माढ्याचे आमदार तथा विठ्ठल कारखान्याचे विद्यमान चेअरमन अभिजीत पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून आपआपले उमेदवार निवडणूकीच्या आखाड्यात उतरविलेले आहेत.



**श्री सद्गुरु प्रभाकर महाराज मंदिरास विद्युत रोषणाई..**

**सोलापूर : श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज यांचा ६९ वा पुण्यतिथी महोत्सव सोमवार २ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. त्यानिमित्त सम्राट चौक येथील श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरास विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.**

## जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या आदेशास उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंच कोल्हापूर यांनी दिली स्थगिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जानेवारी-**

बार्शी येथील रहिवाशी वैशाली सचिन शिंदे यांच्या ताब्यातील घर सासू सासरे लता शिंदे व अनिल शिंदे यांच्या ताब्यात देण्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशास उच्च न्यायालय सर्किट बेंच कोल्हापूर यांनी स्थगिती दिली.

यात हकीगत अशी की वैशाली सचिन शिंदे या बार्शी येथील रहिवाशी आहेत.त्यांचे सासू सासरे लता शिंदे व अनिल शिंदे हे असून सासू सासऱ्याच्या मालकीची जमीन गट नं. १३४०/२/अ पैकी प्लॉट नं.३० वरील टूबीएचके बांधकामासह घर जागेत वैशाली सचिन शिंदे या तिच्या दोन लहान मुली व एक लहान मुलगा यांच्यासह राहणेस आहेत. सदर जागेतून बाहेर काढण्याकरीता सासू - सासऱ्यांनी सूनेच्या ताब्यातून घरजागा मिळावी यासाठी जेष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ मधील ५ अन्वये उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर न्यायीक चौकशीअंती प्रांतानी २८ नोव्हेंबर २०२४ रोजी जेष्ठ नागरीक दापत्यास घराचा ताबा देण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात सूनेने आई वडिलांचा व जेष्ठ नागरीकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ च्या कलमान्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सोलापूर यांच्या न्यायालयात अपील दाखल केले होते. सदरचे आपील जिल्हाधिकारी यांनी फेटाळून वैशाली शिंदे यांच्या ताब्यातील घर सासू-सासऱ्यांच्या ताब्यात देण्याचे आदेश केले होते. सदर आदेशावर व्यथित होऊन सून वैशाली शिंदे यांनी ॲड. महेश जगताप यांचेमार्फत उच्च न्यायालय मुंबई यांचे सर्किट बेंच कोल्हापूर येथे याचिका दाखल केली होती.त्यात याचिकाकर्त्यांच्या वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या आदेशास स्थगिती दिली. सदर प्रकरणाची पुढील सुनावणी २३ फेब्रुवारी २०२६ रोजी ठेवण्यात आली यात सून वैशाली शिंदे यांच्यावतीने ॲड. प्रियल सारडा, ॲड. महेश जगताप, ॲड.देवशाला जाधवर,बार्शी यांनी काम पाहिले.

# पिलीव गटांत दोन जाधव आमने-सामने

**भाजपा, राकाँ (शप), काँग्रेस व अपक्ष अशी चौरंगी लढत**

**तभा वृतसेवा । संजय पाटील**
**पिलीव, दि.३० जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव जिल्ह्य परिषद गटात भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी (शप) गटातच मुख्य लढत होत आहे. येथे भाजपचे कमळ फुलणार की राष्ट्रवादी काँग्रेस आपला गड राखणार याकडे लक्ष लागले आहे. पिलीव गटात भाजपचे चंद्रकांत जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) कडून रणजित जाधव काँग्रेसचे पृथ्वीराज पाटील व अपक्ष संतोष सदेवाले अशी चौरंगी लढत आहे..





पिलीव पंचायत समिती गणातून भाजपकडून नम्रता पुकळे, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) गटाकडून यज्ञसेना जहागिरदार, वर्षा मदने, काँग्रेसकडून जयश्री कदम अशी तिरंगी लढत होत आहे. तांदुळवाडी पंचायत समीती गणात भाजपकडून वैशाली फुलारे, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) गटातून मनीषा पाटील, काँग्रेसकडून जयश्री कदम अशी तिरंगी लढत होत आहे. पिलीव पंचायत समिती गणात पिलीव, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, कोळेगाव यांचा तर तांदुळवाडी पंचायत समिती गणात तांदुळवाडी, फळवणी, काळमवाडी, मळोली, साळमुखवाडी या गावांचा समावेश आहे. या गटात यंदा प्रथमच प्रचंड चुरशीची लढत होत आहे. येथे मागील वेळी राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळविला होता. यावेळी मोहीते-पाटील व आमदार उत्तमराव जानकर गट एकत्र येऊन निवडणुक लढवित आहेत. तर भाजपा यंदा जोरदार तयारी करुन निवडणुकीत उतरली आहे. भाजपाकडून पालकमंत्री जयकुमार गोरे व माजी आमदार रामभाऊ सातपुते यांची तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून खा. धैर्यशील मोहीते-पाटील व आमदार उत्तमराव जानकर यांची ताकद आहे. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडून आलेले गणेश पाटील व त्यांच्या कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. पिलीव जिल्हा परिषद गटात पिलीव पंचायत समिती व तांदुळवाडी पंचायत समिती गण आहेत. पिलीव पंचायत समिती गणात १९ हजार ९६४ मतदार आहेत. हा गट सर्वसाधारण महिलेसाठी राखीव आहे.तर तांदुळवाडी पंचायत समिती गणात १७ हजार २८१मतदार आहेत. हा पंचायत समिती गण ओबीसी महीलेसाठी राखीव आहे. पिलीव जिल्ह्य परिषद गटात ३७ हजार २४५ मतदार आहेत.

पिलीव जिल्हा परिषद गटातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी या गावांचा निरा देवधर योजनेत समावेश व्हावा व शेतीला पाणी मिळावे ही या भागातील नागरिकांची मुख्य मागणी आहे. निरा उजव्या अंतर्गत म ाचणुर उपविभागातील मळोली ,तांदुळवाडी, या गावांचा समावेश व्हावा अशी मागणी आहे.तर कोळेगाव येथील तलाव निरा उजव्या कॅनॉलच्या पाण्याने भरुन मिळावेत अशी मुख्य मागणी आहे. येथे भाजप येणार की राष्ट्रवादी पुन्हा बाजी मारणार याकडे लक्ष लागले आहे.

## जि.प. व पं.समिती निवडणुकीसाठी सांगोल्यात २ लाख ६२ हजार ३६७ मतदार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० जानेवारी -**

सांगोला तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी एकूण २ लाख ६२ हजार ३६७ मतदार असून त्यापैकी १ लाख ३५ हजार ९२३ पुरुष व १ लाख २६ हजार ४४० स्त्री तर इतर ४ मतदार आहेत. त्यासाठी २७४ बूथ स्थापन केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली.

मतदानाच्या याद्या तपासणी, चिन्हांकित करणे, मतदान केंद्रावर वर्किंग कॉपी देणे, पोस्टल मतदानाची नोंद घेणे, टॉप सीट बनवणे या कामाला वेग आला असून पथक प्रमुख सुनील बेलभंडारे यांचे मार्फत हे काम पूर्ण केले आहे. याकामी सर्व मंडल अधिकारी व त्यांचे अधीनस्थ ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते. त्याचबरोबर प्रत्येक बुथवर शांतता



राखणेसाठी शुक्रवार दि.३० जानेवारी रोजी पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये प्रत्येक बूथवर कायदा सुव्यवस्था राखणे, पोलीस प्रशासनास सहकार्य करणे, गुन्हेगारीची माहिती देणे, मतदान प्रक्रियेस सहकार्य करणे, गावातील वादविवादाची माहिती देणे याबाबत पोलीस पाटील यांना सूचना निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली. या बैठकीला सर्व गावातील पोलीस पाटील उपस्थित असल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

# विजापूर रोडवर आयटीआयजवळ अतिक्रमण विरोधात कारवाई

**५० खोक्यांसह पत्रा शेडवर फिरवला जेसीबी**

**सलग दुसऱ्या दिवशी पोलीस बंदोबस्तात केली मोठी कारवाई**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जानेवारी**

सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने आज सलग दुसऱ्या दिवशी बेधडक कारवाई करत विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) संरक्षक भिंती लगतची सर्व अतिक्रमणे हटवली. जेसीबीच्या साह्याने पोलीस बंदोबस्तात येथील तब्बल ५० खोके आणि पत्रा शेडची दुकाने जागेवरच निष्काशित करण्यात आली.

विजापूर रोडवरील आयटीआयच्या संरक्षण भिंती लगत परिसरात अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. या कारवाई संदर्भात उपजिल्हाधिकारी, आयटीआय प्रशासनाने पत्र दिले होते. तसेच नागरिकांकडून मिळालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिकेने ही मोहीम हाती घेतली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

#### तब्बल चार तासानंतर झाली मोहीम फत्ते

विजापूर रोडवरील आयटीआयच्या संरक्षक भिंती लगत असलेली अतिक्रमित सर्व खोकी व इतर पत्रा शेड काढण्याची मोहीम सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत असे एकूण चार तास राबविण्यात आली. अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे हे या ठिकाणी तळ ठोकून उपस्थित होते. तब्बल चार तासानंतर ही मोहीम फत्ते करण्यात आली. या कारवाईमुळे विजापूर रोडवरील वाहतूक सुरळीत झाली असून पादचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. नागरिकांनी महापालिकेच्या या कारवाईचे स्वागत केले.

#### कारवाईवेळी अशी होती यंत्रणा तैनात

या ठिकाणी कारवाईदरम्यान २ जेसीबी, डंपर यासह मंडई, अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे कर्मचारी तैनात होते. त्याचबरोबर पोलीस आणि बीट मार्शल असा बंदोबस्त होता. सतत कारवाई झाल्याने एका जेसीबीचा पाईप तुटला. यामुळे दुसरा जेसीबी मागवावा लागला, अशी माहिती अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जागृती शुगर येथे उपमुख्यमंत्री अजितदादांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** राज्याचे उपमुख्य मंत्री अजितदादा पवार यांचे आकस्मिक अपघाताने निधन झाले त्याबद्दल शुक्रवारी जागृति शुगर साखर कारखाना तळेगाव तालुका देवणी येथे दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी जागृति शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले जागृती शुगर चे मुख्य अभियंता अतुल दरेकर अस्वनी प्रमुख विलास पाटील, अक्षय सूर्यवंशी ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार डी पी जाधव जी जी जाधव यांच्यासह जागृती शुगरचे विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी कामगार उपस्थित होते






# विविध वृत्त...

## फेब्रुवारी महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

**लातूर :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु, सद्यस्थितीत लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची अंमलबजवणी सुरु असल्यामुळे ०२ फेब्रुवारी २०२६ रोजीचा लोकशाही दिन स्थगित करण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## लातूर जिल्ह्यात १७ कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द

**लातूर :** रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खत आणि कीटकनाशकांचा पुरवठा होण्यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. पुणे येथील संचालक (नियंत्रण व गुणनियंत्रण) कृषी आयुक्तालयाच्या सूचनेनुसार लातूर जिल्ह्यात भरारी पथक आणि कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) यांनी कृषी निविष्ठा केंद्रांची तपासणी केली होती. तपासणीदरम्यान काही केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्याने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली ८ जानेवारी २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत एकूण १७ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. यामध्ये बियाणे विक्रीचे १३, खत विक्रीचे २ आणि कीटकनाशक विक्रीचे २ परवाने रद्द झाले आहेत.तसेच ८ कृषी निविष्ठा केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.


साठाफलक व भावफलक प्रदर्शित न करणे, साठा नोंदवही आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, भावफलक, साठा नोंद अद्ययावत न ठेवणे, विक्री बिलावर शेतकऱ्यांची सही/अंगठा न घेणे, बियाण्यांचा संपूर्ण तपशील बिलात न लिहिणे, उत्पादकाचा स्त्रोत न दर्शविणे, ई-पॉस वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, खतासोबत इतर निविष्ठांची लिंकिंग करणे, परवाना असूनही दुकान बंद ठेवल्यास बियाणे अधिनियम १९६६, नियम १९६८, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, खत नियंत्रण आदेश १९८५, कीटकनाशक कायदा १९६८ आणि कीटकनाशक नियम १९७१ नुसार कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी स्पष्ट केले.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात हुतात्मा दिन संपन्न



**लातूर :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी आज दोन मिनिट मौन (स्तब्धता) पाळून हुतात्मा दिन संपन्न झाला. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, डॉ. संजय गवई, डॉ. बसवेश्र्वर बेंद्रे, अनिल उस्तुर्गे, गोपाळ तिरुमुले, रंगनाथ लांडगे, संभाजी लातूरे, योगीराज माकणे, ओंकार बोळशेट्टे, अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिराजदार आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. तसेच महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य आणि व्यवसाय अभ्यासक्रम द्वारा सुद्धा सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग दर्शविला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि जलील सय्यद यांनी परिश्रम घेतले.

## बाजार समितीत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण



**लातूर :** महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे काल दि. २८/०१/२०२६ रोजी विमान अपघातात दु:खद निधन झाले. त्याबद्दल २९ जानेवारी रोजी लातुर येथील कृषि बाजार समितीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपस्थित संचालक सर्वश्री अनिल पाटील, आनंद पाटील, सचिन सुर्यवंशी, शिवाजी देशमुख, पवनराज देशमुख प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहा. सचिव सतिश भोसले, दिपक पाटील, बालाजी किसवे अजय गंभीरे सचिन गायकवाड आदी कर्मचारी वृंद उपस्तीत होते

# अन्नधान्यात देश स्वयंपूर्ण, आता 'पोषण सुरक्षा' हेच खरे आव्हान!

### माजी कुलगुरू डॉ. अशोक धवन; दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'वनस्पती ऊतक संवर्धन' विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** - १९६०-७० च्या दशकात अन्नटंचाईशी झुंजणाऱ्या भारताने आज अन्नधान्य उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. देशात अन्नाची रास वाढली असली, तरी त्यातील 'सत्त्व' म्हणजेच पौष्टिकता टिकवणे आणि देशाची 'पोषण सुरक्षा' (Nutritional Security) बळकट करणे हेच कृषी आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रापुढील आताचे सर्वात मोठे आव्हान आहे, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक धवन यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने दि.२९ जानेवारी २०२६ रोजी वनस्पती ऊतक संवर्धन: आव्हाने, उपाय व भविष्यकालीन संधी या विषयावर आयोजित राज्यस्तरीय



कार्यशाळेत ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद एज्युकेशन सोसायटीचे अकॅडमिक डेव्हलपमेंट ऑफिसर डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,आयक्यूएसी समन्वयक डॉ. जे.ए.अंगुलवार, सूक्ष्मजीवशास्त्र प्रमुख डॉ. आर. ए. मोरे आणि जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. ए.ए.बिडकर यांची उपस्थिती होती.

देशाच्या कृषी प्रवासाचा आढावा घेताना डॉ. धवन म्हणाले की, कृषी विद्यापीठे आणि आयसीएआर (ICAR) च्या अथक संशोधनामुळे आपण आज अन्न अधिशेष (Food Surplus) देश बनलो आहोत.कोरोना काळात ८० कोटी जनतेला मोफत अन्न पुरवणे हे याचेच द्योतक आहे.मात्र, केवळ पोट भरणे पुरेसे नसून, शरीराच्या पोषणाची गरज भागवणे भविष्यात महत्त्वाचे ठरेल.यासाठी जैवतंत्रज्ञानात नवनवीन संशोधनाची गरज आहे.

संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड यांनी 'प्लँट टिश्यू कल्चर'ला जैवतंत्रज्ञानातील एक क्रांतिकारी क्षेत्र मानले आहे.ते म्हणाले, हे तंत्रज्ञान केवळ रोगमुक्त आणि अधिक पौष्टिक पिके विकसित करण्यासाठीच नव्हे, तर लुप्त होणाऱ्या वनस्पतींच्या प्रजाती वाचवण्यासाठीही वरदान आहे.कमी वेळेत उच्च दर्जाचे उत्पादन देण्याची क्षमता असल्याने, जागतिक अन्नटंचाईवर मात करण्यासाठी हा एक प्रभावी उपाय ठरेल,असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन करताना विलासराव देशमुख कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय लातूर येथील डॉ. राहुल चव्हाण यांनी 'टिश्यू कल्चर'चे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, रोगमुक्त आणि उच्च दर्जाची रोपे तयार करण्यासाठी ही पद्धत वरदान आहे. प्रयोगशाळेतील दुषितता (Contamination) रोखणे आणि कुशल मनुष्यबळ तयार करणे ही या क्षेत्रातील आव्हाने असली, तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यावर मात करणे शक्य आहे.

आपल्या यशाची गाथा मांडताना जी मार्ट नर्सरी नांदेडचे उद्योजक आणि संस्थापक शिवाजी सुपारे म्हणाले की, ग्रामीण भागातील तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता शेतीपूरक उद्योगांकडे वळावे. कमी भांडवलात टिश्यू कल्चर आणि नर्सरी व्यवसाय उभारून, चिकाटीच्या जोरावर कोट्यवधींची उलाढाल करणे शक्य आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. अवंती बिडकर यांनी केले. सूत्रसंचलन विद्यार्थिनी पर्णवी ढवारे हिने केले, तर आभार प्रा. डॉ. फिरदौस बिरादार यांनी मानले.या चर्चासत्रासाठी राज्यभरातून संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला सक्षमीकरणाची चळवळ समाजात तळागळापर्यंत पोहचणे गरजेचे : प्रा.डॉ.कुसुम ढोणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** महिला सक्षमीकरण ही आजच्या काळाची गरज असून महिलांचे सक्षमीकरण करण्याकरिता आपल्या देशात महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुले करून महिला सक्षमीकरणाचा पाया रचला.भारतीय संविधानाने राजकीय,सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात पुरुष आणि महिलांना समान संधी आणि अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराविषयी समाजातील तळागाळातील महिलांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ.कुसुम ढोणे यांनी केले. त्या लातूर येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयाच्या वतीने मौजे सेलू ता. औसा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराप्रसंगी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बोलत होत्या.

याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. सुनील पुरी, सौ.पूजा पंडगे,श्री.तुकाराम पवार,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.सुनील पुरी म्हणाले की, देशात महिलांचे स्थान व स्थिती पाहून तुम्ही देशाची स्थिती सांगू शकता. राष्ट्राची प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधायची असेल तर महिला सक्षमीकरण अत्यावश्यक आहे.महिला सक्षमीकरणासाठी समाज, देश आणि महिलांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्रीमंत दोरवे यांनी केले,सूत्रसंचालन प्रा.रवि चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. वसंत बंडे यांनी मानले.

## चन्नबसवेश्वर फार्मसीचे भातांगळी येथे रा.से.यो. विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री) यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भातांगळी (ता. लातूर) येथे दि. २७ जानेवारी २०२६ रोजी "शाश्वत विकासासाठी युवक जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसदभूमी विकास" याशीर्षकाखाली वार्षिक विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून गावचे आदर्श सरपंच मा. श्री. परमेश्वर पाटील, मुख्याध्यापक श्री. किशोर गायकवाड, मुख्याध्यापक श्री. उत्तम दुरवे, प्र. प्राचार्य डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, ग्रामपंचायत सदस्य श्री. दिलीप मुक्ता, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. भिमाशंकर हुच्चे, प्रा. महेश मानके, अविनाश मठपती, प्रा. बालाजी अजगुंडे, डॉ. ऐश्वर्या ईरापल्ले, श्री. रोहित भरती, श्री सुखराज गरगट्टे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.

उद्घाटनानंतर रा.से.यो. विशेष शिबिराच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. शिबिराअंतर्गत स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य व स्वच्छतेबाबत जनजागृती, पाणी बचत अभियान, व्यसनमुक्ती जनजागृती, तसेच प्राथमिक आरोग्य तपासणी अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# जनतेला समर्पित नेतृत्व गमावले - अजित पाटील कव्हेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** मातीशी नाळ जोडलेला आणि कार्यकर्त्यांना सदैव उपलब्ध होणारे राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी कायम राज्याच्या हिताचा आणि विकासाचा ध्यास घेतला होता. खऱ्या अर्थाने जनतेला समर्पित असणारे नेतृत्व आपण गमावले असल्याचे सांगून त्यांच्या सारखा नेता पुन्हा होणे नाही अशा शब्दात लातूर भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

लातूर येथील शहर जिल्हा भाजपाच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष अजित कव्हेकर पाटील बोलत होते. यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, सरचिटणीस संजय गीर, प्रविण कस्तुरे, मंडल अध्यक्ष रोहित पाटील, राहुल भुतडा, सचिन सुरवसे, ॲड. प्रदिप मोरे आदींची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार हे लोकनेते असल्याचे सांगून त्यांचा तळागाळापर्यंत जनसंपर्क होता. असे अजित पाटील कव्हेकर म्हणाले. अजित दादा पवार यांचे अपघाती निधन सर्वांसाठी धक्कादायक व दुखदायक असून त्यांच्या जाण्याने राज्याची मोठी हानी झाली आहे. अहोरात्र जनतेसाठी झटणारे कर्तव्यदक्ष नेता म्हणून ओळख असणारे अजित पवार तितकेच स्पष्टवक्ते व परखड होते. रोखठोक भूमिका मांडताना त्यांनी संवेदनशीलपणा जपलेला होता. जनतेसह कार्यकर्त्यांशी थेट संपर्क असणारे दादा राज्याच्या विकासासाठी अग्रेसर राहिलेले होते. प्रशासनावरील पकड व अधिकारी वर्गात असणारा त्यांचा दरारा त्यांच्या कार्यकुशलतेचा सातत्याने साक्षी देणारा होता. राजकारणा पलीकडे जाऊन



अनेकांशी त्यांनी आपले संबध जपलेले होते. त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला अजित पवार आपल्या कुटुंबाचे भाग आहेत असेच वाटत होते. त्यांच्या अकाली निधनाने राज्याचीच नव्हे तर देशाची हानी झालेली असून हि पोकळी भरून निघणे अशक्य असल्याचे अजित पाटील कव्हेकर म्हणाले.

या श्रद्धांजलीस नगरसेवक विनय जाकते, ऋषिकेश राजे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष तथा नगरसेविका शितल मालू, शोभा पाटील, राजश्री धोत्रे, अविनाश कोळी, ज्योतिराम चिवडे, सतीश मिरचे, विजय अवचरे, युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, धनंजय हाके, नितीन कोरे, संतोष पांचाळ, संतोष तिवारी, पवन आल्टे, नय्युम शेख, अक्षय स्वामी, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानववादाचे प्रणेतेः डॉ. मकरंद गिरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** पंडित दीनदयाळ उपाध्याय हे लेखक, पत्रकार आणि भारतीय जनसंघाचे नेते होते. मथुरेत जन्मलेल्या दीनदयाळांनी साधे जीवन जगून देशासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाचा अंत्योदय विचार मांडला आणि एकात्म मानवतावाद ही विचारधारा दिली, जी भारतीय संस्कृतीवर आधारित आहे. ते

एकात्म मानववादाचे प्रणेते आहेत असे विचार डॉ. मकरंद गिरी यांनी मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयाच्या मौजे खोपेगाव ता. जिल्हा लातूर येथे आयोजित प्राचार्य डॉ. आशा मुंडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. एस. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली

राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक श्रमसंस्कार युवती शिबीराच्या कार्यक्रमानिमित्त ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, मुख्याध्यापक श्री अरुण सुरवसे,



श्री गरिबे सर, सौ. सावरीकर मॅडम, प्रा. सुनील भोसले, डॉ.मनोज पाटील, डॉ. संग्राम टेकले, प्रा. भाऊसाहेब पुरी डॉ. विद्यादेवी कांबळे, डॉ. मुक्ता गंगथडे, प्रा. अलका शिंदे, प्रा.प्रशांत खटके, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. रुपाली कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे आपल्या व्याख्यानामध्ये डॉ., मकरंद गिरी म्हणाले की,

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानववाद हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, समाज आणि व्यक्ती स्वतंत्र नसून ते एकात्म आहेत. मानवतावादाचा विचार हा केवळ भौतिक सुखावर नसून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही पुरुषार्थांच्या समतोल साधनेवर आधारित आहे.

अंत्योदय म्हणजेच शेवटच्या माणसाचा विचार त्यांच्या विचारसरणीचा गाभा अंत्योदय हा होता, ज्याचा अर्थ समाजातील शेवटच्या स्तरावर असलेल्या शेवटच्या माणसाचा विकास होय. त्यांचे साधे राहणीमान आणि उच्च विचारसरणीचे प्रतीक होते. त्यांचे विचार आजही भारतीय राजकारणात, विशेषतः सामाजिक कल्याणाच्या योजनांमध्ये जसे प्रधानमंत्री आवास योजना, आरोग्य योजना यामध्ये मार्गदर्शक मानले जातात, जे एकात्म मानववादाच्या तत्त्वावर आधारित आहेत.एकूणच,

पंडित दीनदयाळ उपाध्याय हे केवळ राजकारणी नव्हते, तर एक महान समाज सुधारक आणि मानवतावादी विचारवंत होते, ज्यांनी भारताला भारतीय संस्कृतीवर आधारित एकात्म मानववादाचा विचार दिला त्यांच्या अंत्योदय विचारांचे महत्त्व आजही टिकून आहे असे मौलिक मार्गदर्शन डॉ. मकरंद गिरी यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शामराव शेंडगे यांनी तर अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री अरुण सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर देशमुख तर आभार डॉ. प्रणिता पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. मारुती घाडगे, प्रा.नागनाथ पांचाळ,प्रा. शहाजी आरण, डॉ.पांडुरंग देशमुख, डॉ शंकर कोळगिरे, प्रा. दत्ता पवार, प्रा. रहीम शेख, प्रा. तानाजी बडे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी स्वयंसेवक विद्यार्थिनी,शाळेतील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## दयानंद विधी महाविद्यालयात आज मानसिक आरोग्यावर राष्ट्रीय परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अध्ययन केंद्राच्या वतीने "हॉलिस्टिक अप्रोच टू मेंटल वेलनेस" या विषयावर शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक ताण, अस्वस्थता, नैराश्य व भावनिक थकवा वाढत असून मानसिक स्वास्थ्य जपणे ही काळाची गरज बनली आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे असून ते समग्र दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे व मानसिक स्वास्थ्याकडे सर्वांगीण दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे.या परिसंवादात प्रा. डॉ मीत शिंदे, प्राध्यापक पी. एन. दोशी कॉलेज, मुंबई, तसेच डॉ. उज्ज्वल अनिल नेने, मानसोपचारतज्ज्ञ, के. ई. एम. रुग्णालय, पुणे, हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात मानसिक आरोग्याशी संबंधित सामाजिक, मानसिक व कायदेशीर पैलूंवर तज्ज्ञांकडून सखोल विचार मांडले जाणार आहेत.या राष्ट्रीय परिसंवादाचा लाभ संशोधक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.


## चालक पाहिजेत

लातूर शहर महानगरपालिका परिवहन सेवेतील शहर बस चालविण्यासाठी **श्रीवरी बिझनेस सर्व्हिस प्रा. लि. कंपनीतर्फे** चालकांची भरती करण्यात येत असून बस बॅच असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | चालक (Driver) | 10 वी पास - बॅच बिल्ला आवश्यक |

संपर्क : पहिला मजला, उद्योग भवन, लातूर | मो. : 9359394643

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# नेते-कार्यकर्त्यांच्या कात्रीत अडकले उमेदवार

## 'मान एकाला, मत दुसऱ्याला' मोहिमेने देवणी निवडणुकीत रंगत

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**
**वलांडी, दि. ३० जानेवारी :** देवणी तालुका हा भाजपाचा बालेकिल्ला मानला जात असला तरी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत सत्तापालटासाठी काँग्रेसने जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने सत्ताबदलाचा विडा उचलला असताना, भाजपाने निलंगेकर बंधूंनी आपली राजकीय प्रतिष्ठा पणाला लावत सत्ता कायम राखण्याचा निर्धार केला आहे. मात्र, दोन्ही प्रमुख पक्षांकडून उमेदवारी जाहीर करताना नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये अपेक्षित समन्वय साधला न गेल्याने उमेदवार अक्षरशः नेते-कार्यकर्त्यांच्या कात्रीत अडकल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी उमेदवारी देताना दोन्ही पक्षांनी शेवटपर्यंत कमालीची गुप्तता पाळली. जवळगा जिल्हा परिषद गटात तर ऐनवेळी उमेदवार बदलण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. स्थानिक व निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या अपेक्षा डावलत, नेत्यांनी आपल्या सोयीनुसार उमेदवारी लादल्याचा आरोप होत असून त्यामुळे पक्षांतर्गत असंतोष उघडपणे समोर येत आहे.

भाजपाने जातीय सक्षमीकरणाचे गणित मांडत जवळगा मतदारसंघात गट व गणासाठी लिंगायत उमेदवार, तर वलांडी गट व गणात मराठा उमेदवार दिले आहेत. परिणामी मराठा व लिंगायत मतदारांची भूमिका काय राहणार, तसेच 'खाली एक धरा, वर एक धरा' असा नवा प्रचारफॉर्म्युला कितपत यशस्वी ठरणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यामुळे भाजपातील नेत्यांची मोठी कसरत पाहायला मिळणार आहे.

आम्ही प्रचारात फिरत नाही, पण निकाल फिरवू शकतो...

दुसरीकडे काँग्रेसने वलांडी व जवळगा गट-गणात जातीय समीकरणांचा समतोल राखत स्थानिक उमेदवारांना संधी दिली आहे. मात्र वलांडी गटात बहुसंख्य असलेले मुस्लिम व दलित मतदार कोणती भूमिका घेतात, यावर काँग्रेसच्या विजयाचे गणित अवलंबून असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

इतर मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या बोरोळ जिल्हा परिषद गटात काँग्रेसने सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला उमेदवारी देत 'न्यायाची भूमिका' मतदारांपुढे ठेवली आहे. याउलट भाजपाने या गटात गटाबाहेरील कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्याने नाराजीत भर पडली आहे. या दोन्ही उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी कोणी घेतली आणि दुखावलेले कार्यकर्ते कितपत साथ देतात, हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, तिकीट वाटपाच्या धोरणामुळे दोन्ही पक्षांत कार्यकर्त्यांमध्ये दुफळी निर्माण झाली असून सोशल मीडियावर 'मान एकाला मत दुसऱ्याला' अशा पोस्टद्वारे निष्ठावंत कार्यकर्ते आपली खदखद व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे दोन्ही पक्षांतील अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते अद्याप प्रचारापासून दूर असल्याने, त्यांची ही 'गुपचेपी' नेमकी कोणाची 'गळचेपी' ठरणार, याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

एकूणच देवणी तालुक्यातील ही निवडणूक आता थेट पक्षांमधील लढतीपेक्षा पक्षांतर्गत नाराजी, गटबाजी आणि मतदारांच्या अनिश्र्चित भूमिकेमुळे अधिकच रंगतदार ठरत असल्याचे चित्र आहे.

## उदयगिरीत भूगोल दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. ३० जानेवारी :** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात भूगोल दिन व बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. भूगोल दिनानिमित्त घेण्यात आलेल्या भूगोल सामान्य ज्ञान स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना यावेळी बक्षिसे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री हावगीस्वामी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे उपस्थित होते. प्रारंभी पृथ्वी गोलाचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. काळगापुरे यांनी भूगोल दिनाचे महत्त्व, भूगोल विषयातील करिअरच्या संधी व भविष्यातील आव्हाने याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. हल्लाळे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. एम. पी. मानकरी यांनी केले. सूत्रसंचालन कुमारी सोनी कांबळे हिने केले, तर पाहुण्यांचा परिचय कुमारी रोहिणी कांबळे हिने करून दिला. बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. जे. कुलकर्णी यांनी केले. आभार डॉ. ए. यू. नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. ए. के. वळवी, प्रा. प्रियंका रंगवाळ व श्री संतोष चिघळीकर यांनी सहकार्य केले.

## मंगेशकर महाविद्यालयाच्या जान्हवी बिरादार व गायत्री पुरी यांचे 'गांधी विचार संस्कार' परीक्षेत यश





**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव यांच्या 'गांधी विचार संस्कार परीक्षा - २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील संपन्न परीक्षेत जान्हवी दत्ता बिरादार (बारावी वाणिज्य) यांनी लातूर जिल्ह्यातून 'द्वितीय क्रमांक' व गायत्री अनिल पुरी (बी.कॉम.प्रथम वर्ष) यांनी लातूर जिल्ह्यातून 'तृतीय क्रमांक' संपादन करून पारितोषिक मिळविले आहे. महाविद्यालयातील इतिहास विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत परीक्षेत एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ तथा संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे, इतिहास विभागप्रमुख डॉ.सचिन हंचाटे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा.आशीष खडकेश्र्वर, डॉ. अशोक नारनवरे, डॉ.सुचिता किडीले, प्रा.प्रमोद मरगणे, प्रा.बलभीम सातपुते, डॉ.जाफर चौधरी, डॉ.विनोद चिंते, डॉ.प्रदीप पाटील, डॉ.आनंद मुसळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जान्हवी बिरादार व गायत्री पुरी यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> प्रस्तुत परीक्षेच्या माध्यमातून महात्मा गांधी यांच्या विचार व कार्याची सविस्तर माहिती मिळून माझ्या ज्ञानात मोलाची भर पडली आहे. महाविद्यालयामध्ये प्रस्तुत परीक्षेचे आयोजन केल्याबद्दल गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव आणि महाविद्यालयातील इतिहास विभाग व मराठी विभाग यांची मी आभारी आहे. तसेच पारितोषिक संपादन केल्याचा मला आनंद व समाधान आहे.
>
> **- गायत्री अनिल पुरी**
> **(बी.कॉम.प्रथम वर्ष)**

## महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन




**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** दिनांक २४ /१ /२०२६ रोजी महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दापका येथे विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाल. यावेळी मंचावर प्राचार्य डॉ.एस. एस. पाटील, श्री. डी. के. पाटील, मुख्य शाखा अधिकारी, एल आय सी निलंगा, डॉ. दिनकर पाटील , डॉ प्रतिभा पाटील, डॉ. शहाबाज वाढवणे, डॉ.अश्र्विन कोडगी, डॉ .माने जयश्री ,श्री बोयने, मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा दापका आणि श्री ओमजी बाहेती, उपाध्यक्ष केमिस्ट असोसिएशन लातूर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील गरड व विद्यार्थी प्रतिनिधी श्री विकास जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. एस एस पाटील यांनी महाविद्यालया तर्फे होत असलेल्या सात दिवसीय विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिरातील विविध दैनंदिन कार्यक्रमाची रूपरेषा सांगून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व सामाजिक बांधिलकी जपण्याचे तसेच दापका येथील ग्रामस्थांनी या शिबिरा मध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आव्हान केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा एल.आय.सी. मुख्याधिकारी श्री.डी.के.पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास साधावा व समाजामध्ये विविध गोष्टीची जनजागृती करावी असे आवाहन केले. यावेळी दापका ग्रामस्थांसाठी औषधी वाटपाचे नियोजन व उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथील सर्व डॉक्टर्सची टीम यांनी ग्रामस्थांची आरोग्य तपासणी केली. पुढील सात दिवसांमध्ये युवकांसाठी जलसंधारण व्यवस्थापन व ओसाड भूमी विकास या विषयावरती तज्ञ मंडळी कडून ग्रामस्थांसाठी मार्गदर्शन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थिनी कु. शिंदे वैष्णवी तसेच आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील गरड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तंत्रज्ञ नारायणसिंग राजपूत, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

## अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहुन शिवनाम सप्ताहास प्रारंभ




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. ३० जानेवारी :** ओंकारेश्वर महादेव मंदिर शिवलिंग प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड शिवनाम सप्ताहास अजितदादा पवार यांना श्रध्दाजली वाहुन प्रारंभ झाला.

एस.टी. कॉलनी, पोस्ते नगर नविन वसाहत मलकापुर येथील ओंकारेश्वर महादेव मंदिरात श्रीगुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात ओंकारेश्र्वर महिला भजनी मंडळाच्या वतीने आयोजित शिवलिंग व नंदकिशोर प्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा संपन्न होणार असुन यानिमित्य शिवनाम सप्ताह,परमरहस्य ग्रंथाचे पारयणास शुक्रवार दि. ३० जानेवारी रोजी सकाळी ठिक ११ वाजता माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहुन प्रारंभ झाला. पोरौहित्यकार शि.भ.प. रतिकांत स्वामी यांचे उपस्थितित ओंकारेश्वर महिला भजनी मंडळाचे अध्यक्षा सौ. सरुबाई विष्णूकांत हलबर्गे, सचिव सौ. वनमाला अशोक कते,सौ. शितलताई दिगंबर बिरादार यांच्या हस्ते गणेश प्रधान कलश,पंचाचार्य स्थापना पुजा व विनापुजन करुन शिवनाम सप्ताहास प्रारंभ झाला. यावेळी अन्नदाते मुकेश भालेराव ,सरपंच गुरुनाथ बिरादार,शंकर भालके, सौ.शितल शिवराज माळेवाडे यांच्या हस्ते आरती संपन्न झाली. तर शिवकिर्तन शि.भ.प. सौ.निकिता स्वामी खंडाळीकर यांचे किर्तन संपन्न झाले.



राज्याचे लाडके उप मुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार साहेब यांचे काल दुःखद निधन झाले. ते आपल्या सर्वांना सोडून अकाली अपघातात निघून गेले अतिशय जड अंतःकरणाने त्यांना शिरूर अनंतपाळ येथे कडकडीत बंद ठेवून सर्व पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्या समवेत व सर्व पक्षीय नेते तसेच शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सर्व ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

**- ॲड. संभाजी पाटील शिरूरअनंतपाळ**

## शोकसंदेश



महाराष्ट्राने दूरदृष्टी व कणखर नेतृत्व असलेला नेता गमावला. विकासाच्या कामात कुठेही तडजोड न करता ग्रामीण भागाची नाडी असलेले अजित पवार हे एक रांगडे व्यक्तिमत्त्व होते ग्रामीण भागापासून शहरी भागातल्या समस्यापर्यंत व त्यावर करायच्या उपाययोजने विषयीची उत्कृष्ट माहिति असलेले नेतृत्व म्हणजे अजित दादा त्यांच्या अकाली जाण्याने सर्वांना धक्का बसला त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**-विठ्ठल पाटील, शिरूर अनंतपाळ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष**

---



महाराष्ट्र राज्याचे निडर वृत्ती लाभलेले २४ तास कार्य तत्पर असलेले कर्तबगार उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार साहेब यांच्या बारामती येथील विमान दुर्घटना मधील निधनाचे वृत्त दु:खद व खेदजनक आहे... महाराष्ट्राच्या विकासाचा ध्यास घेऊन अहोरात्र काम करणारे एक धडाडीचे अभ्यासु नेतृत्व आज काळाने आपल्यातुन हिरावून नेले.दलेला शब्द पाळणारा नेता अशी त्यांची ख्याती होती. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक विकासाचा आधारवड कोसळला आहे.. ही कधीही भरुन न निघणारी पोकळी केवळ राजकीय नसून प्रत्येक सामान्य कार्यकर्त्याच्या मनातील आहे ईश्वर अजित दादांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना...

**-श्री. सुधीर लखनगावे.**
**काँग्रेस नगरसेवक, शिरुर अनंतपाळ**

# महाराष्ट्र महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन व वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** महाराष्ट्र महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन व वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.

महाराष्ट्र महाविद्यालयात सकाळ सत्रात प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण पृथ्वीराज विजय पाटील निलंगेकर यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी श्री अशोक पाटील निलंगेकर, महाराष्ट्र औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भागवत पौळ, महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले, ते म्हणाले की, लोकशाहीचे रक्षण करणारे व सर्वांना मूलभूत हक्क प्रदान करणारी पायाभूत चौकट म्हणजे संविधान होय. त्यामुळे आजच्या तरुणांनी लोकशाहीचे पाविञ्य जतन करावे. सर्व शाखेतील विद्यार्थ्यांचा गणवेशातील सहभाग, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी केलेली रोमहर्षक कवायत, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा अभूतपूर्व सहभाग यामुळे हा कार्यक्रम नेत्रदीपक ठरला. संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर ,विद्यार्थी, पालक व निलंगा परिसरातून अशा अभूतपूर्व कार्यक्रमाचे कौतुक केले जात आहे.या कार्यक्रमानंतर वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पार पडले. या प्रसंगी सुप्रसिद्ध वक्ते कथा व कादंबरीकार डॉ. संजय कळमकर म्हणाले की,आज जग फार वेगाने बदलत चालले आहे जे दिसते त्याला आदर्श मानण्याची संस्कृती वाढत आहे, ज्यांच्याकडून काही ज्ञान मिळेल त्याला आदर्श मानले पाहिजे, मित्र-मैत्रिणी समाज आपल्याला फसवेल परंतु आपले आई-वडील आपल्याला कधीच फसवणार नाहीत, हे तरुण पिढीने लक्षात घ्यावे. प्रत्येकात क्षमता आहे.आपल्यात असणारी ही सुक्ष्म क्षमता संकटात आणि संधीत वापरा. आजच्या आभासी जगात न राहता, वावरता जे वास्तव आहे त्या वास्तवाला भिडण्याची ताकद तुमच्यामध्ये निर्माण झाली पाहिजे. ते पुढे म्हणाले की मोबाईल मुळे संवाद तर बंद झालाच आहे पण त्याच बरोबर कुटुंबातील संवाद सुद्धा संपलेला आहे. आज घरातील टी.व्ही.वरील पात्रे बोलतात पण घरातील पात्रे म्हणजे आई, वडील, भाऊ, बहीण हे मात्र बोलताना दिसत नाहीत. हे कुठेतरी थांबले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर, सचिव श्री.बब्रुवानजी सरतापे यांनी शुभेच्छा संदेश दिला. उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम होते. आपल्या समारोपीय भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना हसत खेळत ज्ञान घेऊन स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेण्याचा सल्ला दिला.

विचारमंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, प्रा. प्रशांत गायकवाड, विद्यार्थी संसदेची सचिव कु.मोनिका सोमवंशी, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. हंसराज भोसले, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक, क्रीडा विभागाचे प्रमुख तसेच विद्यार्थी संसदेचे सर्व विद्यार्थी प्रतिनिधींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नरेश पिनमकर, प्रा. संदीप सूर्यवंशी यांनी केले तर आभार डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी यांनी मानले.

## उदयगिरीत हुतात्मा दिनानिमित्त महात्मा गांधी व अजित पवार यांना श्रद्धांजली



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात हुतात्मा दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दोन मिनिटे मौन पाळून करण्यात आली. यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा. लांडगे सिद्धेश्र्वर यांनी बोलताना, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील बलिदानांची आठवण करून देत विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्याचा संदेश दिला.

या प्रसंगी बसवराज पाटील नागराळकर यांनी आपल्या मनोगतातून महात्मा गांधी यांच्या अहिंसा, सत्य व शांततेच्या विचारांचे महत्त्व पटवून सांगितले. समाजकारण व लोकसेवेतील योगदानाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचाही उल्लेख करून त्यांना आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमास महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सहसचिव, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, प्राचार्य आर. के. मस्के, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाराशे रुपयांसाठी मुख्याध्यापिकेसह दोन शिक्षक अडकले लाच लुचपतच्या जाळ्यात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० जानेवारी-**

पगाराचे विवरण देण्यासाठी एक हजार दोनशे रुपयांची लाच घेणाऱ्या मुख्याध्यापिकेसह दोन सहशिक्षकांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे.

उस्माननगर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक व शिक्षिका असलेल्या दाम्पत्य सन २०१९ ते माहे सप्टेंबर २०२५ पर्यंत कार्यरत होते. माहे सप्टेंबर २०२५ मध्ये या दोघांची उस्माननगर येथून बदली झाली. आयकर रिटन भरण्यासाठी सन २०२४-२५ चे पगाराचे वितरण पत्र लागत असल्याने तक्रारदाराने उस्माननगर शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या वांगे यांना पगाराचे विवरण पत्र देण्याची मागणी केल्यानंतर विद्या वांगे यांनी त्यांच्याकडे प्रत्येकी सहाशे रुपये प्रमाणे बाराशे रुपयांची मागणी केली. तक्रारदाराने लाच मागणीची पडताळणी केल्यानंतर मुख्याध्यापिका विद्या वांगे, सहशिक्षक रामेश्वर पांडागळे व गौतम सोनकांबळे यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने लाचलुचपत विभागाने सापळा रचून बाराशे रुपये रक्कम स्विकारताना सहशिक्षक रामेश्वर पांडागळे यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात मुख्याध्यापिका विद्या वांगे यांच्याविरुध्द दोन सहशिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**जात वैधता प्रमाणपत्रासाठी २५ हजार घेणाऱ्यास अटक**

जात वैधता प्रमाणपत्र काढून देण्यासाठी २५ हजाराची लाच घेणाऱ्या खाजगी इसम साहेबराव नागोराव गुंडीले यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली असून, त्याच्याविरुध्द विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या दोन्ही मुलीचे कुणबी मराठा जातीचे वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी फाईल दाखल करण्यात आली होती. यासाठी साई झेरॉक्स सेंटर येथील साहेबराव नागोराव गुंडीले यांनी जात वैधता समिती कार्यालयात ओळख असून तुमचे काम करुन देतो असे सांगत प्रत्येकी ३० हजार रुपये आणि दोन काढायचे असतील तर ५० हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यानंतर दि.२९ जानेवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारीची पडताळणी केली. त्यांनी साई झेरॉक्स सेंटरवर भेट देवून जात वैधता प्रमाणपत्र काढायचे आहे असे सांगितले. यासाठी आरोपी साहेबराव गुंडीले याने २५ हजार लाचेची मागणी केली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचून २५ हजारांची रक्कम स्विकारताना साहेबराव गुंडीले यास रंगेहात पकडले. आरोपीची अंगझडती घेतली असता एक मोबाईल, आधारकार्ड, मतदान कार्ड आढळून आले. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे यांच्या पथकाने केली तर पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर या पुढील तपास करीत आहेत.

# स्व.अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज सर्व पक्षीय शोक सभा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० जानेवारी-**



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अकाली निधन झाले. त्यांना सर्व पक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शनिवार ३१ जानेवारी २०२६ रोजी आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, पदाधिकारी व स्व.अजित दादांवर प्रेम करणाऱ्या जनतेनी उपस्थित रहावे, असे आवाहन सर्व पक्षीय शहर जिल्हाध्यक्षांनी संयुक्तरित्या प्रसिद्ध पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे बुधवार दि.२८ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता बारामती विमानतळावर त्यांचे विमान अपघातात अकाली निधन झाले. दि.२९ जानेवारी रोजी शासकीय इतमामात बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व.अजितदादा यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्राची फार मोठी हानी झाली असून महाराष्ट्र कामाचा माणूस असलेल्या दादाला गमावला आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनी स्व.अजित दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि.३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सर्व पक्षीय आदरांजली सभेचे आयोजन कै.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, श्री गुरुगोविंदसिंघ जी स्टेडियमजवळ, नांदेड येथे करण्यात आले आहे. तरी सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्व.अजित दादांवर प्रेम करणाऱ्या जनतेनी दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शहर) जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, भाजपचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष अडवोकेट किशोर देशमुख, भाजपाचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (श.प.) शहराध्यक्ष डॉ.सुनिल कदम, कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अब्दुल सत्तार, शिंदे गट शिवसेनेचे महानगरप्रमुख राजू गुंडावार, ठाकरे शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रकाश मारावार, मनोज यादव, वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष इंजि.प्रशांत इंगोले, एम.आय.एम.चे जिल्हाध्यक्ष अमजेद बेग, मनसेचे जिल्हाध्यक्ष स.मॅन्टीसिंघ यांनी केले आहे.

## शिळवणी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान

**देगलूर** -तालुक्यातील शिळवणी येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेचे आयोजन रिपब्लिकन सेनेचे तालुका उपाध्यक्ष नितेश सुर्यवंशी यांनी केले. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते नितेश सदाशिव सुर्यवंशी यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन दि २४ जानेवारी रोजी केले होते. या स्पर्धेत जि.प.प्रा. शाळा शिळवणी व कै. व्यंकटराव देशमुख माध्यमिक विद्यालयात शिळवणी येथील तब्बल १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात घेण्यात आली. आज प्रजासत्ताक दिनानिमित्त स्पर्धा परीक्षेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत प्राथमिक गटात प्रथम अक्षरा मनोज देवकत्ते, द्वितीय आरती सतिश सुर्यवंशी, तृतीय अर्पिता विशाल राठोड, आणि उत्तेजनार्थ सुरज गजानन घोडेकर तर माध्यमिक गटातून प्रथम निखिल बंडू राठोड, द्वितीय संजिवनी ज्ञानोबा भुताळे, तृतीय निशा प्रेमकुमार सुर्यवंशी आणि उत्तेजनार्थ किर्ती विरभद्र ढोणे, विष्णुकांत शिवाजी डोईफोडे, आदर्श सतिश सुर्यवंशी व परशुराम देवबा देवकते मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले तसेच विशेष पुरस्कार यश राठोड, रिहान जलाल, सोफिया कबनूरे, श्रष्टी धाईगुंडे यांना, कृतिका येडूरे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शोभाबाई गुलाबराव देशमुख होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून मनोहरराव देशमुख (माजी सरपंच), सदाशिवराव सुर्यवंशी (माजी सरपंच), संदीप देशमुख (पो. पा.), ओमप्रकाश देशमुख, ड. महेश देशमुख, अनिल राठोड (माजी उपसरपंच), मंगेश वंजे (ग्रा.प. सदस्य), सौ. शितल नितेश सूर्यवंशी (ग्राम सदस्या), नागशेट्टी अप्पा उंद्रे, कृष्णाजी देशमुख, रंजित देशमुख (मुख्याध्यापक), लवटे सर (मुख्याध्यापक), सौ. डोईफोडे (अध्यक्षा शा.व्य.स) आदीं उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचे परीक्षण सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी माने, कवी व समीक्षक ऋषिके देशमुख यांनी केले.

# बाऱ्हाळी बाजारपेठ बंद ठेवून अजितदादांना श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ३० जानेवारी-**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित दादा पवार यांचे विमान दुर्घटनेत दुःखद निधन झाल्याचे समजताच महाराष्ट्रातील संपूर्ण शहरासह गावे, वाडी तांड्यावर दुःखाची लाट पसरली. मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी बाजारपेठ शंभर टक्के बंद ठेवून गावकऱ्यांच्या वतीने येथील राष्ट्रीय महामार्गावर शोकसभा घेऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या राजकारणातील कुशल कामगिरीबद्दल अनेकांनी आपले विचार व्यक्त करून राजकारणातील एक जनप्रिय, कणखर नेतृत्व हरवल्याची खंत व्यक्त केली. अमर रहे.... अमर रहे ....अजितदादा अमर रहे .... अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजन देशपांडे, माजी समाज कल्याण सभापती स्वप्नील चव्हाण , भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर देशमुख, प्रतिष्ठित व्यापारी अरुण महाजन, चेअरमन व्यंकट पाटील उमाटे, तंटामुक्ती अध्यक्ष हणमंत वाडीकर, बालाजी सोमावार , अभिजीत महाजन, राजेश तोटकर, डॉ. रमेश राठोड, सुरेश सुकुनगे, साईनाथ कोटगीरे, नरसिंग अस्वले, गणेश जाधव, केशव रापतवार, संपत गायकवाड, सुभाष गवते, प्रकाश देवरे, शेख जाकीर हुसेन, आनंदा बनकर, तुकाराम वाघमारे, अंतेश्वर कोलेवाड, प्रकाश भंगे, नामदेव अवधूते, मनोज अस्वले, गोविंद रोकडे यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते.

# पांदण रस्ता मोकळा
## शेतकऱ्यांच्या मागणीला यश



**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. ३० जानेवारी-**

शेतकऱ्यांना शेतीतील कामे करण्यास रस्त्याच्या अडचणींचा सामना करावा लागतो ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाकडून मोहीम राबवून पाणंद रस्ते मोकळे करण्यात आले, असे असले तरी काही शेतकऱ्यांनी पाणंद रस्ते बंद केल्याने इतर शेतकऱ्यांना शेतात ट्रॅक्टर व इतर साधने नेताना अडचणीचा सामना करावा लागतो. यात अनेक वेळा वाद निर्माण होतात. त्यामुळे शासनाने पाणंद रस्ते मोकळे करून द्यावे, अशी मागणी फूलवळ येथील शेतकरी होनाजी गोविंद शेळगावे आणि तेथे सर्व शेतकऱ्यांनी तहसीलदाराकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनानुसार फूलवळ येथे गट नंबर ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६ मधील अंदाजे २० हेक्टर ३४ आर शेतजमीन असून, काही शेतकऱ्यांनी पारंपरिक रस्ता बंद केला आहे. त्यामुळे खरीप हंगामाची पेरणी करण्याकरिता ट्रॅक्टर नेण्यास अडचणी निर्माण होत आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देऊन सदर पांदण रस्ता मोकळा करून द्यावा , अशी मागणी केली आहे. मागणीची दखल घेऊन फुलवळ मंडळाचे मंडळ अधिकारी एस आर शेख आणि तलाठी बालाजी केंद्रे यांनी जाय मोक्यावर येऊन या पांदण रस्त्याची पाहणी करून लवकरात लवकर हा रस्ता शेतकऱ्यांना मोकळा करून देऊ असे आश्वासन दिले आहे.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २९ जानेवारी-**


बिलोली शहरात विविध कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या हस्ते शासकीय मुख्य ध्वजारोहण संपन्न झाले. राष्ट्रगीतानंतर सर्व प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. व संविधानांचे वाचन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, उपाध्यक्ष अनूप अंकुशकर, तहसिलदार गजानन शिंदे, नायब तहसिलदार बालाजी मिठेवाड, आर.जी.चव्हाण आदीसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरडफ येथे उद्या धम्म मेळाव्याचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २९ जानेवारी-**

तालुक्यातील हरडफ येथे उद्या दि. १ फेब्रुवारी रोजी ५३ व्या धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



प्रथम सत्रात सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण धम्मकीर्ती महिला मंडळ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सकाळी साडेनऊ वाजता धम्मदेसना उपासक आर. व्ही वाठोरे, उपासक गणपण वाठोरे देणार आहेत दुपारी बारा वाजता तथागत गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांच्या तैल चित्राची गावातील प्रमुख रस्त्याने भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. द्वितीय सत्र सुरू होईल सायंकाळी सात ते आठ वाजेपर्यंत यामध्ये प्रमुख उपस्थिती ॲड. डी. एफ. हरदडकर उद्योजक मारुती रामजी भगत, सामाजिक कार्यकर्त्या लताबाई मुनेश्वर इत्यादीची विशेष उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेंद्र नरवाडे, प्रकाश वाठोरे, प्रवीण वाठोरे हे करणार आहेत. तृतीय सत्रात यामध्ये बुद्ध भीम गीताचा जंगी मुकाबला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक सचिन नागवंशी यांचा अकोला व महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायिका अश्विनी राज ग्रुप संच मुंबई यांचा वैचारिक सामना होणार आहे. परिसरातील सर्व जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष विक्रांत वाठोरे, उपाध्यक्ष संदीप रायघोळ , सचिव कपिल वायवळ, सहसचिव शेषराव वाठोरे, कोषाध्यक्ष सिद्धार्थ वाठोरे, कोषाध्यक्ष माधव आढागळे, सदस्य उत्तम नरवाडे, ज्ञानेश्वर थोरात, सिद्धार्थ वाठोरे यांनी केले आहे.

## सिडकोत प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध ठिकाणी ध्वजारोहण उत्साहात

**नवीन नांदेड** - सिडको हडकोसह दक्षिण परिसरात ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिनी सिडको कार्यालय नांदेड, क्षेत्रीय कार्यालय मनपा सिडकोसह शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत कार्यालये, नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन अन्य विविध ठिकाणी ध्वजारोहण उत्साहात पार पडला. सिडकोतील मनपाचे क्षेत्रीय कार्यालय येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांच्या हस्ते सकाळी ७ वाजता ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे, वसुली प्रवेक्षक वसंत कल्याणकर, मारोती सारंग, संजय नागापूरकर, सादुल्ला खान, स्वच्छता निरीक्षक किसन वाघमारे, यांची उपस्थिती होती, तर सिडको कार्यालय सिडको प्रकल्प नवीन नांदेड येथे सहाय्यक विकास अधिकारी कपिल व्हि. राजपूत यांच्या हस्ते सकाळी ७:४५ वाजता ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी कार्यालयाचे लेखा सहाय्यक संकेत गिरी, यांच्यासह सुरक्षारक्षक सौ.लता पोहरे, राजू धुमाळ, बळी घंटेवाड, सुनील कांबळे, साईनाथ गिरी यांची उपस्थिती होती. तसेच महात्मा फुले माध्यमिक आश्रम शाळा वाघाळा येथील संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक भगवान इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. तर त्याचप्रमाणे कुसुमताई माध्यमिक विद्यालय येथे संस्थेचे सचिव संभाजी बिराजदार यांच्या हस्ते ध्वजारोहणी करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.तसेच गोपाळचावडी ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी ग्रामपंचायतचे सरपंच सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी प्रकाश भदरगे, उपसरपंच साहेबराव सेलुकर व सदस्यांची उपस्थिती होती. तसेच धनेगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयच्या वतीने ग्रामपंचायतीचे सरपंच पिंटू पाटील शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य व ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती. तसेच विष्णुपुरी ग्रामपंचायत च्या वतीने ग्रामपंचायत सरपंच सौ. संध्या विलास देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी सदस्य व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# किनवट नगरपरिषदेकडून पशुपालकांवर कारवाईचा इशारा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३० जानेवारी-**

किनवट नगरपरिषद कार्यक्षेत्रात मोकाट फिरणाऱ्या अश्ववर्गीय प्राणी (गाढव व खेचर) यांमुळे होणाऱ्या संभाव्य वाहतूक अपघातांच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक गुरुवारी (दि. २९ जानेवारी २०२६) दुपारी ३.३० वाजता नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या दालनात पार पडली.

बैठकीस नगरपरिषद मुख्याधिकारी मुगाजी काकडे, पोलीस प्रशासनाचे प्रतिनिधी पोलीस उपनिरीक्षक झाडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव तसेच किनवट शहरातील अश्ववर्गीय प्राण्यांचे पशुपालक उपस्थित होते.

मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या वाहतूक अपघातांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने पशुपालकांना त्यांच्या जनावरांना रस्त्यावर मोकाट फिरू न देता कामानंतर निश्चित ठिकाणी बांधून ठेवण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच जनावरे ज्या ठिकाणी बांधून ठेवली जातील, त्या ठिकाणाची माहिती प्रशासनास देणे बंधनकारक राहील, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. यापुढे रस्त्यावर कोणतेही मोकाट गाढव किंवा खेचर आढळून आल्यास महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायत अधिनियम १९६५ अन्वये कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा नगरपरिषद व पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला. संबंधित पशुपालकांना आवश्यक उपाययोजना करण्यासाठी ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

बैठकीदरम्यान पशुपालकांनी मांडलेल्या सूचनांची प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली. ही बैठक शांततेत व यशस्वीरीत्या पार पडली असून, किनवट शहरातील मोकाट जनावरांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पशुपालक व नगरपरिषद प्रशासनाने समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.




**नांदेड-** विमानतळ रोडच्या सर्वांगीन विकासासाठी आसना मार्निंग वॉक ग्रुपच्या वतिने विमानतळ गार्डन चैतन्य नगर येथे विविध मागण्यासाठी आनंद कल्याणकर यांचे वतिने लाक्षणिक उपोषण करण्यात आले यावेळी खा. प्रा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, राजेश पावडे, महेश देशमुख, ॲड. सुरेंद्र घोडजकर, विठ्ठल पावडे, बालाजी चव्हाण, स. दिपकसिंघ हुजूरीया, नागेश सुलगेकर, विक्रम ठाकूर, सत्यजित टिप्रेसवार, श्रीनिवास मोरे, केदार पाटील साळुंके, तथा परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते (छाया- करणसिह बैस)

## प्रो. डॉ.दिलीप सावंत यांचा आज सेवापूर्ती सत्कार सोहळा

**कंधार** - श्री शिवाजी कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख, माजी एनसीसी विभाग प्रमुख, प्रोफेसर डॉ.दिलीप सावंत यांचा सेवापूर्ती सत्कार व



'अस्मितेच्या पाऊलवाटा' या गौरव ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शनिवार, दि.३१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता श्री शिवाजी कॉलेज, कंधार येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार गुरुनाथराव कुरुडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधारचे अध्यक्ष प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे, सहसचिव ॲड.मुक्तेश्वर धोंडगे, उपाध्यक्ष माधवराव पेठकर, अहमदपूरच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार, अंबाजोगाईच्या खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री शिवाजी कॉलेज, कंधारचे प्रभारी प्राचार्य डॉ.रमाकांत जोगदंड आदींसह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आमरण उपोषण मागे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३० जानेवारी-**

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित व जिव्हाळ्यांच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते . लोकप्रतिनिधी प्रशासनाच्या समन्वयातून सकारात्मक तोडगा काढून लेखी आश्वासन देण्यात आल्याने उपोषणकर्ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद पवार निवघेकर यांनी आमरण उपोषण मागे घेतले आहे .



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद वेंकटराव पवार यांनी प्रजासत्ताक दिनापासून तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात आमरण उपोषण सुरू केले होते. शेतकऱ्यांच्या जनहिताच्या निगडित अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासाठी लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमरण उपोषणात बसले होते . यामध्ये शेतकऱ्यांना सिंगल फेजच्या माध्यमातून २४ तास वीज पुरवठा मिळावा ग्रामीण रस्त्याच्या प्रश्न मार्गी लावण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा . वन्य प्राण्यांचे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी संरक्षणात्मक उपायोजना राबवाव्यात शिवपांदण रस्ते , बांध रस्ते , मोकळे करून देण्यात यावे या प्रमुख मागण्या होत्या .

चार दिवसापासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाशी दखल भोकर विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी घेतली आहे . याबाबत संबंधित प्रशासनाशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत . आमदार श्रीजया चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख बारडकर , माजी सभापती लक्ष्मण जाधव यांनी आमरण उपोषणकर्त्याची भेट घेऊन चर्चा केली . नायब तहसीलदार मारोती जगताप यांनी उपोषण स्थळास भेट देऊन सकारात्मक चर्चा करत प्रश्न मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन दिले आहे . आमदार श्रीजया चव्हाण यांच्या शेतकऱ्यांच्या आमरण उपोषणाची तातडीने दखल घेतल्याने प्रशासनाच्या सकारात्मक निर्णयातून अखेर उपोषण मागे घेण्यात आले आहे . यावेळी नायब तहसीलदार मारोती जगताप , निलेश देशमुख बारडकर , मारोतराव पवार , सरपंच प्रतिनिधी रमेश लखे , शामराव लखे यांच्यासह आदींची उपस्थिती होती . लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयातून तोडगा काढल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे .

**आ. श्रीजया चव्हाण यांची महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा**

आमदार श्रीजया चव्हाण यानी शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाची दखल घेऊन महावितरण कंपनीशी चर्चा करून निवघा ३३ केवी उपकेंद्रा अंतर्गत सिंगल फेजिंग लाईन सुरू केली आहे . यासोबत वनविभागाअंतर्गत वन प्राण्यांमूळे झालेल्या नुकसानीच्या आर्थिक मदतीचे धनादेश तातडीने देण्याच्या सूचना वन विभागाला दिली आहे . यासोबतच पांदण रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे आमरण उपोषण तुर्त शेतकऱ्यांनी परत घेतले आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## धाराशिव ज्येष्ठ नागरिक संस्थेची नुतन कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**
येथील सेवाभवन, ज्येष्ठ नागरिक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा माजी अध्यक्ष ॲड. विनायकराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या सभेत संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नुतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

यावेळी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दत्तात्रय चौरे यांची नियुक्ती करण्यात आली होती. संस्थेच्या अध्यक्षपदी दिलीप पाटील यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्ष म्हणून भा.न. शेळके आणि पद्मिनी वाघमारे यांची निवड झाली आहे. कार्याध्यक्षपदी ॲड. रमेश वट्टे यांची जबाबदारी देण्यात आली आहे. सचिव म्हणून अनिल पाटील, सहसचिव म्हणून डॉ. मधुकर हजरे तर प्रबंधकपदी दत्तात्रय चौरे यांची निवड करण्यात आली.

संघटक म्हणून राजेंद्र अत्रे, कोषाध्यक्ष म्हणून हनुमंत राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मार्गदर्शकपदी भास्कर नायगावकर व उमाकांत नायगावकर यांची निवड करण्यात आली असून सल्लागार म्हणून ॲड. विनायकराव देशमुख, जयकुमार नायगावकर, आनंद वेदपाठक आणि प्रेमनाथ दळवी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### परंड्यात उपमुख्यमंत्री पवार यांच्या नेतृत्वास सर्वपक्षीय अभिवादन

**परंडा, दि.३० जानेवारी -**
महाराष्ट्राच्या राजकारणातील धाडसी व निर्णयक्षम नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्य व नेतृत्वगुणांना अभिवादन करण्यासाठी परंडा येथे सर्वपक्षीय उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बावची चौक येथील अनुपसिंह सद्दिवाल (पवार) कॉम्प्लेक्स येथे सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास ॲड. दादासाहेब खरसडे, जनार्दन मेहेर, ॲड. संदीप पाटील, उपनगराध्यक्ष समरजित ठाकूर, विकास कुलकर्णी, पोपट गटकुळ, भाऊसाहेब खरसडे, राहुल बनसोडे, ॲड. सुजित देवकते, रामभाऊ पवार, धनंजय मोरे, अरविंद रगडे, रमेशसिंह परदेशी, बंडू रगडे, राजाभाऊ पाटील, महेश खुळे, हनुमंत गायकवाड, भैय्या वाघमोडे, नाना पवार, नसीर शहा बर्फीवाले, मलिक सय्यद, ॲड. सुहास पाटील, सचिन पाटील, पिंटू कोकाटे, समीर पठाण, श्रीहरी नायकवडी, नंदू शिंदे, भगवान रगडे, संतोष जकताप, अमोल जकताप, घनश्याम शिंदे, प्रा. राहुल गरड, जीवन बनसोडे, ज्ञानेश्वर काळे, कृष्णा चौधरी, अमोल भोजने, महेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### निखील हुंडेकर यांची भाजप युवा मोर्चाच्या सरचिटणीसपदी निवड

**धाराशिव, दि.३० जानेवारी -**
येथील निखील सुनिल हुंडेकर यांची धाराशिव भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या



जिल्हा सरचिटणीसपदी निवड झाली आहे. या निवडीचे पत्र धाराशिव भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी शुक्रवार दि.३० जानेवारी रोजी दिले आहे. मुळ तुळजापूर येथील असलेले निखील हुंडेकर हे एमबीए फायनान्स असून, २०१३ पासून त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम चालू केले होते. महाविद्यालयीन अध्यक्ष, शहरमंत्री, जिल्हा संयोजक, महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री व परभणी जिल्ह्याचे दोन वर्ष पूर्णवेळ संघटनमंत्री म्हणून काम केले आहे.

### कोंडीबा जाधव यांचे निधन

**नळदुर्ग, दि.३० जानेवारी -**
नळदुर्ग येथील भाजपचे नगरसेवक तानाजी जाधव यांचे वडील कोंडीबा जाधव (वय



८०) यांचे मंगळवार दि.२९ जानेवारी रोजी रात्री नऊ ते साडेनऊ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. दि.३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता नळदुर्ग येथील आलियाबाद स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांसह पत्रकार बांधव उपस्थित होते. त्यांच्या पश्चात चार मुले, चार विवाहित मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### भारत मोळवणे यांचे निधन

**नळदुर्ग, दि.३० जानेवारी -**
वाशी येथील जय हनुमान तालीम संघाचे अध्यक्ष भारतबप्पा रामलिंग मोळवणे (वय ७८)



यांचे दि.२९ जानेवारी रोजी पहाटे तीन वाजता अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या मागे भाऊ, दोन मुले, एक मुलगी, पुतण्या, नातवंडे असा परिवार आहे. ते ज्येष्ठ व्यापारी होते तसेच जेष्ठ नागरिक महासंघाचे पदाधिकारी होते. शहरातील धार्मिक सामाजिक उपक्रमात सतत सहभागी असायचे. व्यापारी संघटनेचे उपाध्यक्ष सूर्यकांत मोळवणे यांचे वडील होते.

## जळकोट गटात भाजपचे वर्चस्व; शिवसेना-काँग्रेस आघाडीसमोर आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० जानेवारी -**
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा अंतिम टप्पा सुरू झाला असून तुळजापूर तालुक्यातील जळकोट जिल्हा परिषद गटात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या गटात भाजप विरुद्ध शिवसेना ठाकरे गट व काँग्रेस आघाडी अशी चुरशीची लढत होत असली, तरी सध्याची राजकीय समीकरणे पाहता भाजपचे पारडे जड असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

जळकोट जिल्हा परिषद गट हा एकेकाळी शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. माजी जि.प. सदस्य गणेश सोनटक्के यांच्या नेतृत्वामुळे या गटावर शिवसेनेचे वर्चस्व होते. मात्र मागील जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार प्रकाश चव्हाण यांनी गणेश सोनटक्के यांचा पराभव करून या मतदारसंघात काँग्रेसचे वर्चस्व प्रस्थापित केले होते. परंतु कालांतराने या गटातील राजकीय परिस्थिती पूर्णतः बदलली आहे.

माजी जि.प. सदस्य गणेश सोनटक्के यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करून आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्याचप्रमाणे काँग्रेसचे माजी जि.प. सदस्य प्रकाश चव्हाण तसेच जळकोटचे माजी सरपंच अशोक पाटील यांनीही आपल्या समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केल्याने काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या पक्षप्रवेशांमुळे तुळजापूर तालुक्यात



काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात आले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

जळकोट जिल्हा परिषद गटात एकूण २१ हजार ३८० मतदार असून हा गट सर्वसाधारण महिला वर्गासाठी राखीव आहे. भाजपकडून नुकतेच काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या माजी जि.प. सदस्य प्रकाश चव्हाण यांच्या पत्नी ज्योती चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या विरोधात शिवसेना ठाकरे गट व काँग्रेस आघाडीकडून प्रतीक्षा गोपाळ सुरवसे निवडणूक लढवीत आहेत. या गटात दुरंगी लढत होत असली, तरी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी केलेली विकासकामे तसेच गणेश सोनटक्के व प्रकाश चव्हाण हे दोघेही भाजपमध्ये असल्यामुळे भाजपची राजकीय ताकद कमालीची वाढली आहे.

जळकोट जि.प. गटातील जळकोट गणात भाजपने तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. आशिष सोनटक्के यांना उमेदवारी दिली आहे.

त्यांच्या विरोधात काँग्रेसकडून मोहन चव्हाण, तर शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून ब्रह्मानंद कदम निवडणूक लढवीत आहेत. येथे तिरंगी लढत असली तरी भाजपचे प्राबल्य पाहता ॲड. आशिष सोनटक्के यांची बाजू भक्कम मानली जात आहे. जळकोट गणात एकूण ११ हजार १३९ मतदार आहेत.

होर्टी गणात भाजपकडून सुकेशिनी मोटे, काँग्रेसकडून सुवर्णा गुंजोटे तर यशवंत सेनेकडून शीतल हाके या निवडणूक रिंगणात आहेत. होर्टी गणात १० हजार २४१ मतदार असून येथेही तिरंगी लढतीचे चित्र आहे. मात्र काँग्रेसच्या अनेक दिग्गज कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे महाविकास आघाडीची ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येत आहे.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेली विकासकामे, भाजप नेते सुनील चव्हाण यांना मानणारा मोठा कार्यकर्ता वर्ग, तसेच माजी जि.प. सदस्य गणेश सोनटक्के यांची गटावर असलेली मजबूत पकड यामुळे जळकोट जिल्हा परिषद गटासह जळकोट व होर्टी गणात भाजपचे वर्चस्व स्पष्टपणे जाणवत आहे. निवडणूक चुरशीची भासली तरी भाजपच्या उमेदवारांना विजय मिळवताना फारशी अडचण येईल, असे चित्र सध्या तरी दिसत नाही.

## अणदूर जि.प. व पं.स. महायुती उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३० जानेवारी -**
अणदूर जिल्हा परिषद गटातील भारतीय जनता पक्ष-महायुतीचे उमेदवार दीपक आलूरे तसेच अणदूर पंचायत समिती गणातील उमेदवार रणवीर चव्हाण यांच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ पावणारा येथील श्री गणपती मंदिरात नारळ फोडून करण्यात आला. अणदूर सोसायटीचे माजी चेअरमन सिद्राम शेटे यांच्या हस्ते हा शुभारंभ पार पडला.

या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रचाराच्या प्रारंभी वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

यावेळी बोलताना जिल्हा परिषद गटाचे उमेदवार दीपक आलूरे म्हणाले की, ही निवडणूक आम्ही पूर्णतः विकासाच्या मुद्द्यावर लढवीत असून अणदूर जिल्हा परिषद मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी भाजप व महायुतीच्या उमेदवारांना बहुमताने निवडून देण्याचे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

पंचायत समिती गणाचे उमेदवार रणवीर चव्हाण म्हणाले की, चव्हाण यांनी सुरू केलेल्या विकासाच्या रथाला पुढे नेण्यासाठी आम्ही ही निवडणूक लढवीत आहोत. जनतेच्या विश्वासावर आम्ही खरे उतरू, त्यामुळे सर्व मतदारांनी आम्हाला मतदान करून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सुनील चव्हाण, दत्ता बंडगर, दीपक घोडके, साहेबराव घुगे, संगप्पा हगलगुंडे, धनराज मुळे, दयानंद मुडके, धीरज आलूरे, प्रवीण घोडके, गुंडेशा गोवे, रमाकांत माने, विक्रांत दूधाळकर, सिद्धेश्वर मुळे, बाबुराव मुळे, गणेश सूर्यवंशी, उमाकांत करपे, महावीर कंदले, सुधीर ठाकूर, दत्ता आलूरे, अनिल करपे, मनोज मुळे, बालाजी मोकाशे, प्रवीण मुळे, गौरीशंकर लंगडे, रोहित शेळके, अक्षय करपे, आनंद घोडके, गजानन मोकाशे आदी मान्यवरांसह नागरिक व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचाराच्या शुभारंभामुळे अणदूर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात निवडणुकीची रणधुमाळी अधिकच वेग घेण्याची चिन्हे दिसत आहेत.

## अभिषेक पूजेच्या वेळी व्हीआयपी गेटद्वारे थेट प्रवेश; जनसंपर्क अधिकाऱ्यावर गैरवापराचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० जानेवारी -**
अभिषेक पूजेच्या वेळी व्हीआयपी पास बंद असताना व्हीआयपी गेटद्वारे व्हीआयपींना गाभाऱ्यात सोडण्यात येते. श्री तुळजाभवानी मातेच्या अभिषेक पूजेच्या वेळी थेट प्रवेश देत जनसंपर्क अधिकारी त्यांच्या पदाचा गैरवापर करत असल्याची तक्रार निवेदन तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने यांना भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष विजय भोसले यांनी दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हणले आहे की, श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे, त्याच बरोबर अभिषेक पुजेच्या वेळी जनसंपर्क अधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करत अभिषेक पूजेच्या वेळी व्हीआयपी पास बंद असताना मंदिर संस्थानच्या नियमाचे उल्लंघन करत केवळ फोनद्वारे बोगस व्हीआयपी भाविक मोठ्या प्रमाणात व्हीआयपी गेटद्वारे सोडले जात आहेत. मंदिरात उघड उघड काळाबाजार सुरू आहे असे म्हणणे गैर ठरणार नाही. पूर्वी चार ते पाच अधिकारी मंदिरात सर्व सोयी सुविधा कंट्रोल मध्ये ठेवत होते, मंदिरात अभिषेक पूजेच्या



वेळी व्हीआयपी संपूर्णतः बंद असायचे आता या नवीन सेवा भरतीतून आलेले अधिकारी विशेषतः जनसंपर्क अधिकारी मंदिरातील समस्या वाढवत आहेत. या अधिकारी एजंट लोकांसोबत आर्थिक लाभ घेत आहेत का याची चौकशी करावी. व मंदिरात मुख्य गेटवर कायम पारदर्शी अधिकारी नियुक्त करावे व सुरक्षा रक्षकास नेमप्ले लावण्यास सक्ती करावी. व सर्व सुरक्षा रक्षकांच्या सर्व गुगल पे-फोन पे व इतर बँक ॲप तपासून ते मंदिरात गैरमार्गाने आर्थिक लाभ घेत आहेत का याची चौकशी करावी. मंदिरात अभिषेक पूजेच्या वेळी पूर्वीप्रमाणे संपूर्णतः व्हीआयपी पास देणे बंद करावे.

शाकंभरी नवरात्र उत्सवामध्ये व्हीआयपी गेटद्वारे सोडण्यात आलेले भाविकांच्या रजिस्टर नोंदी आहेत का? याची सीसीटीव्ही फुटेज तपासून चौकशी करावी. योग्य चौकशी न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

## विशाल सूर्यवंशी वक्तृत्व स्पर्धेत मराठवाड्यात अव्वल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**
महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिक्षक, अधिकारी व कर्मचारी वक्तृत्व स्पर्धेत जि.प. सांजा शाळेतील शिक्षक विशाल सूर्यवंशी यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत त्यांनी मराठवाडा विभागातून प्रथम येण्याचा मान मिळवला असून, संपूर्ण महाराष्ट्रात चौथा क्रमांक पटकावला आहे.

या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्रभरातून जवळपास ४० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. शिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर स्पर्धकांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. कडव्या स्पर्धेतही विशाल सूर्यवंशी यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वशैली, विषयावरील सखोल अभ्यास, स्पष्ट मांडणी व आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.



त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य, जिल्हा शिक्षण अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विविध शिक्षक संघटना, शिक्षकवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## निवडणूक कामांतून परिक्षार्थ्यांना सुट मिळावी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जानेवारी -**
जि.प. व पं.स. साठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान होत असून केंद्रीय शिक्षक पात्रता परिक्षा देशभर ७ व ८ फेब्रुवारी रोजी होत असून या परिक्षेसाठी पात्र असणारे शिक्षक निवडणूक कर्मचाऱ्यांना निवडणूक कामांतून सुट मिळावी यासाठी जिल्हाधिकारी यांना अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.



## जवाहरच्या हरीओम कोरेचे पथसंचलनाबद्दल अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३० जानेवारी -**
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक कोरे हरीओम सुधीर (बी. एस्सी. द्वितीय) ची २६ जानेवारी रोजी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन (परेड) करिता निवड झाली होती.

दि.१७ ते २६ जानेवारीपर्यंत दहा दिवसाच्या कालावधीत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स विद्यानगरी, कलिना मुंबई येथे तालीम शिबिरात सहभागी होवून प्रजासत्ताक दिन संचलन यशस्वी पार पाडल्या बद्दल शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे सचिव रामचंद्र आलुरे यांनी त्याचे कौतुक केले.

## तरुणांनी उद्योजक बनून रोजगारनिर्मिती करावी : दीपक आदटराव

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० जानेवारी -**
महाविद्यालयीन तरुण जोपर्यंत उद्योजक बनत नाहीत, तोपर्यंत देश महासत्ता होऊ शकत नाही. यासाठी शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करून त्यांचा लाभ घेत उद्योजक होण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन बँक ऑफ महाराष्ट्रचे शाखाधिकारी दीपक आदटराव यांनी केले.



बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव मा. उल्हास बोरगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य विभागातर्फे उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र, तुळजापूर शाखेचे अधिकारी दीपक आदटराव उपस्थित होते.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. नेताजी काळे, उपप्राचार्य डॉ. प्रवीण भाले, नॅक समन्वयक डॉ. मनोज झाडे, प्रा. निलेश एकदंते, डॉ. नितीन बिराजदार आदिंची उपस्थिती होती. प्रारंभी उपप्राचार्य डॉ. प्रवीण भाले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अमोद जोशी, प्रा. नितीन बिराजदार, डॉ. अभिजीत बाबरे व डॉ. शिवतेज भोसले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

उद्घाटनपर भाषणात दीपक आदटराव यांनी सांगितले की, राष्ट्रीयकृत बँका विविध उद्योगांना कर्जपुरवठ्यासाठी तयार आहेत. विद्यार्थ्यांनी मनाची खंबीर तयारी करून उद्योग उभारणीसाठी शासनाच्या योजनांचा अभ्यास करावा. पहिल्या सत्रात डॉ. नेताजी काळे यांनी 'झेपटो' या भागीदारी कंपनीच्या उदाहरणातून उद्योग उभारणीची प्रक्रिया स्पष्ट केली. दुसऱ्या सत्रात प्रा. निलेश एकदंते यांनी उद्योजकता विकासात व्यावसायिक कौशल्याचे महत्त्व स्पष्ट केले.

दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सूत्रसंचालन डॉ. शिवाजी जेटीथोर यांनी केले, तर आभारप्रदर्शन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. नितीन बिराजदार यांनी केले.


## चिवरी येथील श्री महालक्ष्मी (आई) यात्रेला 3 फेब्रुवारीपासून प्रारंभ

**श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.३० जानेवारी -**
महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तुळजापूर तालुक्यातील चिवरी येथील श्री महालक्ष्मी (आई) यात्रेला मंगळवार दि.३ फेब्रुवारीपासून प्रारंभ होत आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून परिसर भक्तिमय वातावरणाने भारून जाणार आहे.

माघ पौर्णिमेनंतर येणाऱ्या मंगळवारी श्री महालक्ष्मी यात्रेला सुरुवात होते. यानिमित्त काळजाते देवीच्या पुजाऱ्यांच्या घरातून श्री महालक्ष्मी देवीची मूर्ती वाजत-गाजत गावातून मिरवणूक काढून पहाटे मंदिरात आणली जाते. त्यानंतर देवीची विधिवत पूजा, महाअभिषेक व काकड आरती करण्यात येते. दिवसभर भाविक नवसपूर्ती करीत देवीचे दर्शन घेतात. नवसाला पावणारी आई म्हणून श्री महालक्ष्मी देवीची विशेष ओळख आहे.

या यात्रेसाठी उस्मानाबाद, लातूर, बीड, सोलापूर, पुणे, मुंबईसह राज्याबाहेरूनही भाविक मोठ्या संख्येने येतात. देवीचे मंदिर डोंगराळ व निसर्गरम्य परिसरात असून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मनःशांतीचा अनुभव मिळतो. मंदिराजवळ असलेल्या छोट्या कुंडात स्नान करून ओल्या कपड्याने देवीस पाणी अर्पण केल्यास ईडा-पीडा दूर होतात व शनी दोष निघून जातो, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

पूर्वी देवीसमोरील दैत्यास नैवेद्य अर्पण करण्यासाठी पशुहत्येची प्रथा होती, मात्र सध्या यात्रा काळात ही प्रथा बंद करण्यात आली आहे. मंगळवारी यात्रेच्या दिवशी गावातील प्रत्येक घरातून देवीला दही-भात, पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची परंपरा आजही पाळली जाते. मंदिराच्या समोरील डोंगरावर देवीचे स्नानगृह असून मंगळवारी रात्री मोठ्या भक्तिमय वातावरणात देवीचा छबिना निघतो. यावेळी गावातील मानकरी व भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. आई राजा उदो-उदो, चिवरी आईचा चांगभल या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून जातो. यात्रेच्या दिवशी देवीसमोर पोतराज व आराधनीचा मेळा भरतो, तर गोधळी गीतांनी परिसर भारावून जातो. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांच्या वतीने कुस्त्यांचा आखाडा भरविला जातो. चिवरीची यात्रा ही कायऱ्याची यात्रा म्हणून ओळखली जाते. बुधवारी सायंकाळी सहा वाजता यात्रेची सांगता होते. बुधवारी रात्री मंदिर परिसरात कोणीही राहत नाही, कारण त्या रात्री भुतांची जत्रा भरते, अशी लोककथा प्रचलित आहे.



ट्रस्टच्या वतीने भक्तासाठी सर्व सोईसुविधा पूर्ण...

यात्रेनिमित्त मंदिर समिती व ग्रामपंचायतीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी पाणी, वीज, स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

चिवरी हे गाव हैद्राबाद-सोलापूर मार्गावरील अणदूर गावापासून सुमारे ७ कि.मी. अंतरावर असून नळदुर्ग-तुळजापूर रस्त्यापासून ४ कि.मी. अंतरावर आहे.